अभ्यासक्रम आणि भाषा

लेखक : डॉ. कविता साळुंके, डॉ. भूषण कर्डिले, डॉ. एस. के. सूर्यवंशी, डॉ. एम. एस. उबाळे, डॉ. दत्तात्रेय तापकीर, प्रा. विजयकुमार पाईकराव, श्रीम.ज्योती लष्करी, डॉ. पी. बी. दराडे, डॉ. एस. बी. वाळके, श्री. सचिन पोरे

घटक १ :	शालेय विद्यार्थ्यांची भाषिक पार्श्वभूमी	०१
घटक २ :	वर्गातील भाषिक अभिव्यक्तीचे स्वरूप	३५
घटक ३ :	माहितीचे अवांतर वाचन व लेखन	६८

यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक

कुलगुरू : प्रा. (डॉ.) ई. वायुनंदन

प्र. संचालक : डॉ. कविता साळुंके

शिक्षणशास्त्र विद्याशाखा परिषद सदस्य

डॉ. कविता साळुंके
प्र. संचालक, शिक्षणशास्त्र विद्याशाखा
य.च.म.मुक्त विद्यापीठ, नाशिक

प्राचार्य डॉ. आर. बी. मानेकर
शासकीय अध्यापक महाविद्यालय
अकोल

डॉ. हेमंत राजगुरू
सहयोगी प्राध्यापक, शैक्षणिक सेवा विभाग
य.च.म.मुक्त विद्यापीठ, नाशिक

प्रा. विजयकुमार पाईकराव
सहयोगी प्राध्यापक, शिक्षणशास्त्र विद्याशाखा
य.च.म.मुक्त विद्यापीठ, नाशिक

प्राचार्य विजय जवळेकर
अध्यापक महाविद्यालय
मुंबई

प्राचार्य चंद्रकांत बोरसे
अध्यापक महाविद्यालय
नाशिक

प्राचार्य उर्मिला धूत
शासकीय अध्यापक महाविद्यालय
परभणी

डॉ. सुरेश पाटील
प्र. संचालक, मूल्यमापन विभाग
य.च.म.मुक्त विद्यापीठ, नाशिक

डॉ. डी. डी. पवार
सहायक प्राध्यापक, शिक्षणशास्त्र विद्याशाखा
य.च.म.मुक्त विद्यापीठ, नाशिक

डॉ. जयदीप निकम
प्र. संचालक, आरोग्य विद्याशाखा
य.च.म.मुक्त विद्यापीठ, नाशिक

डॉ. विजया पाटील
सहयोगी प्राध्यापक, शिक्षणशास्त्र विद्याशाखा
य.च.म.मुक्त विद्यापीठ, नाशिक

श्री. एस. व्ही. चौधरी
माजी संचालक, इग्नो
दिल्ली

प्रा. माधव पळशीकर
सहयोगी प्राध्यापक, संगणकशास्त्र विद्याशाखा
य.च.म.मुक्त विद्यापीठ, नाशिक

डॉ. संजीवनी महाले
सहयोगी प्राध्यापक, शिक्षणशास्त्र विद्याशाखा
य.च.म.मुक्त विद्यापीठ, नाशिक

डॉ. एस. एस. सोनुने
सहायक प्राध्यापक, शिक्षणशास्त्र विद्याशाखा
य.च.म.मुक्त विद्यापीठ, नाशिक

तज्ज्ञ सल्लागार समिती

डॉ. कविता साळुंके
प्र. संचालक, शिक्षणशास्त्र विद्याशाखा
य.च.म.मुक्त विद्यापीठ, नाशिक

डॉ. अनंत जोशी
माजी संचालक, नाशिक

माजी प्राचार्य डॉ. शांताराम बुटे
अकोला

डॉ. नीलिमा सप्रे
सेवानिवृत्त प्राध्यापक, कोल्हापूर

प्राचार्य चंद्रकांत बोरसे
नाशिक

डॉ. चित्रा सोहनी
सेवानिवृत्त प्राध्यापक, पुणे

प्राचार्य वनिता काळे
अकोला

डॉ. के. एम. भांडारकर
नागपूर

डॉ. संजीवनी महाले
सहयोगी प्राध्यापक, शिक्षणशास्त्र विद्याशाखा
य.च.म.मुक्त विद्यापीठ, नाशिक

प्राचार्य डॉ. संजीवनी मुळे
बीड

प्राचार्य डॉ. पी. आर. गायकवाड
औरंगाबाद

प्राचार्य डॉ. मीना कुटे
मुंबई

प्राचार्य डॉ. गजानन गुल्हाणे
शिक्षणशास्त्र विभाग, अमरावती

प्राचार्य डॉ. ह. ना. जगताप
सोलापूर

डॉ. संजीव सोनवणे
शिक्षणशास्त्र विभाग प्रमुख, पुणे

डॉ. सुरेश पाटील
संचालक, मूल्यमापन विभाग, नाशिक

डॉ. वैजयंता पाटील
शिक्षणशास्त्र विभाग प्रमुख, नांदेड

प्राचार्य डॉ. सुनीता मगरे
मुंबई

प्राचार्य डॉ. ए. आर. राणे
जळगाव

प्राचार्य डॉ. रेखा टोपकर
सांगली

डॉ. पद्मिनी एम.
शिक्षणशास्त्र विभाग प्रमुख, कोल्हापूर

डॉ. विजया पाटील
सहयोगी प्राध्यापक, शिक्षणशास्त्र विद्याशाखा
य.च.म.मुक्त विद्यापीठ, नाशिक

पाठ्यक्रम विकसन समिती

डॉ. कविता साळुंके
नाशिक

प्राचार्य निर्मला तापकीर
पुणे

डॉ. लता मोरे
नवापूर

डॉ. रमा भोसले
धुळे

डॉ. संध्या सामुद्रे
पनवेल

प्रा. विजयकुमार पाईकराव
नाशिक

डॉ. पद्मिनी एम.
कोल्हापूर

डॉ. दत्तात्रेय तापकीर
पुणे

डॉ. संचीवनी महाले
नाशिक

डॉ. पी. बी. दराडे
सोलापूर

डॉ. डी. डी. पवार
नाशिक

श्री. सचिन अशोक पोरे
नाशिक

डॉ. विजया पाटील
नाशिक

डॉ. सुचेता संकपाळ
नाशिक

डॉ. एस. एस. सोनुने
नाशिक

श्रीमती ज्योती आर. लष्करी
नाशिक

लेखन समिती

घटक क्र. 1
डॉ. कविता साळुंके
नाशिक

डॉ. भूषण कर्डिले
नाशिक

डॉ. एस. के. सूर्यवंशी
सोलापूर

डॉ. एम. एस. उभाळे
उस्मानाबाद

श्री. सचीन पोरे
नाशिक

घटक क्र. 2
डॉ. दत्तात्रेय तापकीर
पुणे

प्राचार्य निर्मला तापकीर
पुणे

डॉ. संजीवनी महाले
नाशिक

प्रा. विजयकुमार पाईकराव
नाशिक

श्रीमती ज्योती लष्करी
नाशिक

घटक क्र. 3
डॉ. एस. के. सूर्यवंशी
सोलापूर

डॉ. पी. बी. दराडे
गारगोटी

डॉ. एस. बी. वाळके
नाशिक

श्री. सचीन पोरे
नाशिक

संपादन समिती (आशय, भाषा व अनुदेशन)

डॉ. अनंत जोशी
माजी संचालक, शिक्षणशास्त्र विद्याशाखा
य.च.म.मुक्त विद्यापीठ, नाशिक

डॉ. कविता साळुंके
प्र.संचालक, व संयोजक शिक्षणशास्त्र विद्याशाखा
य.च.म.मुक्त विद्यापीठ, नाशिक

डॉ. बी. एस. वाळके
इंग्लिश ॲकेडमी
नाशिक

निर्मिती

श्री. आनंद यादव
व्यवस्थापक, ग्रंथनिर्मिती केंद्र
य.च.म.मुक्त विद्यापीठ, नाशिक ४२२ २२२

© 2020, यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक

❑ **प्रथम प्रकाशन** : ऑक्टोबर 2020 ❑ **प्रकाशन क्रमांक :**

❑ **अक्षरजुळणी** : ॲकोसिस, नाशिक – 10

❑ **मुद्रक** :

❑ **प्रकाशक** : डॉ. दिनेश भोंडे, कुलसचिव, यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक ४२२ २२२

B-18-19-108 (EDU 403)

घटक ३ : माहितीचे अवांतर वाचन आणि लेखन

अनुक्रमणिका

३.० उद्दिष्टे

३.१ प्रास्ताविक

३.२ विषय-विवेचन

- ३.२.१ विद्याशाखा अर्थ व स्वरूप
- ३.२.२ विद्याशाखा उदय, विकास
- ३.२.३ विविध विद्याशाखेतील मूक व प्रकट वाचन
- ३.२.४ वाचनाच्या कार्यनिती, टिप्पणी लेखन, सारांशलेखन
- ३.२.५ ग्रंथालयातील संदर्भ ग्रंथवाचन व विमर्षण
- ३.२.६ मजकूराचे स्वरूप
- ३.२.७ आशय रचना
- ३.२.८ वाचन व लेखनातील संबंध जोडणी
- ३.२.९ सहेतुक लेखन

३.३ सारांश

३.४ पारिभाषिक शब्द, शब्दार्थ

३.५ क्षेत्रीय कार्य

३.६ अधिक वाचनासाठी पुस्तके

३.० उद्दिष्टे

ह्या घटकाचा अभ्यास केल्यानंतर आपण –

- ★ विविध विद्याशाखेतील आशयाचे मूक व प्रकट वाचन करू शकाल.
- ★ वाचनाच्या कार्यनीती स्पष्ट करू शकाल.
- ★ आशयाचे सारांश लेखन व विमर्षण करू शकाल.
- ★ ग्रंथालयातील संदर्भग्रंथांचे वाचन करून त्यावर विमर्षण करू शकाल.
- ★ वाचन करावयाच्या आशयाचे स्वरूप व रचना जाणून घेऊ शकाल.
- ★ वाचन व लेखनातील संबंध जोडणी करू शकाल.
- ★ सहेतुक लेखन करू शकाल.

३.१ प्रास्ताविक

मित्रहो वाचन ही सहेतुक क्रिया आहे. वाचतांना केवळ डोळ्यांनी पाहून अक्षर, शब्द वा वाक्य ओळखणे

एवढेच अभिप्रेत नसून त्या छापलेल्या मजकूराचा अर्थ समजणे महत्त्वाचे असते. मजकूराचा अर्थ कळणेसाठी आपल्या मेंदुमध्ये संदेशग्रहण, सांकेतिकरण (Coding) व अर्थान्वेषण (decoding) इत्यादी क्रिया घडतात रॉबिन्सन यांच्या अर्थबोध प्रतिमानानुसार शब्दबोध, आशयग्रहण, प्रतिसादात्मक अर्थ (Associative meaning) तादात्म्य या चार स्तराद्वारे वाचलेल्या मजकूराला अर्थप्राप्ती होते. अर्थान्वेशनाचे कार्ये ही मेंदूतील गुंतागुंतीची प्रक्रिया आहे. ही क्रिया आपल्या नवमस्तिक मेंदूत (Neocortix) घडते. यासच मोठा मेंदू असे म्हणतात. वाचन कौशल्याच्या विकासात एकूण शिक्षण प्रक्रियेत मोठा मेंदू महत्त्वाची भूमिका बजावतो. यामध्ये भाषाशिक्षण, निर्मितीसमता, विचार करणे, आठवणे इत्यादी बाबींचे नियंत्रण केले जाते. या मेंदूचे डावामेंदू व उजवा मेंदू असे दोन भाग असतात. भाषा आकलनक्षमता, कारणमीमांसा, सकारात्मक व सुसंगत विचार इत्यादींचे नियंत्रण उजवा मेंदू करतो. तर वाचलेल्या मजकूराचे आकलन होण्यासाठी ग्रहण, संवेदन, अवबोध व उपयोजन याद्वारे आकलन करण्याची प्रक्रिया आपला डावा मेंदू करतो या प्रकरणात माहितीचे वाचन लेखन व अर्थ समजावून घेणे या गोष्टी समजावून घेऊ या.

३.२ विषय–विवेचन

३.२.१ विद्याशाखा अर्थ व स्वरूप

ज्ञान ही निसर्गतःच एकजीव असणारी यंत्रणा आहे. या यंत्रणेच्या निरनिराळ्या भागांचे त्यांच्या वैशिष्ट्यांनुसार वर्गीकरण करून त्यांना आपण विद्याशाखांची नावे दिली. पण तरीही त्यातील मूळ एकत्वाचा विचार सोडून देता येत नाही. तंत्रविज्ञानाच्या भाषेत बोलायचे झाले तर 'ज्ञान ही एक महाप्रणाली असून विद्याशाखा ह्या तिच्या प्रणाली आहेत असे म्हणता येईल. तसेच जेव्हा एखादा पाठ्यांश आपण शिकवतो तेव्हा तो स्वतंत्र नसतो तर अप्रत्यक्षपणे इतर ज्ञानशाखांशी जोडलेला असतो हे प्रत्येक शिक्षकाने लक्षात ठेवायला हवे. अध्यापन आशय घटकाचे इतर ज्ञानशाखांबरोबर एकात्मीकरण करायला हवे. विद्यार्थ्यांनाही ज्ञान हे तुकड्या तुकड्यात नसून एकत्वाने असते याची कल्पना द्यायला हवी. ज्ञान एकत्वाने असले तरी प्रत्येक शिक्षकाला आपल्या ज्ञानशाखेची वैशिष्ट्ये ज्ञात असावीत ज्यामुळे त्याच्या अध्यापनात ते परावर्तीत होऊ शकतील.

३.२.२ विद्याशाखा उदय, विकास

प्राचीन काळी म्हणजे ग्रीक संस्कृतीच्या काळात तत्त्वज्ञान ही एकमेव विद्याशाखा होती. त्यातून भाषा, साहित्य आणि गणित ह्या विद्याशाखा काही काळाने वेगळ्या झाल्या. मात्र विज्ञान, रसायनशास्त्र, वनस्पतिशास्त्र, प्राणिशास्त्र, इत्यादी विद्याशाखा त्या वेळी नैसर्गिक तत्त्वज्ञान ह्या तत्त्वज्ञानाच्या उपशाखेतच समाविष्ट होत्या. तसेच राज्यशास्त्र, समाजशास्त्र, अर्थशास्त्र ही सामाजिकशास्त्रे नैतिक तत्त्वज्ञान या उपशाखेत होती. मानसशास्त्र हे मानसिक तत्त्वज्ञान या तत्त्वज्ञानाच्या उपशाखेचा भाग होते. विद्येचे पुनरुज्जीवन आणि धार्मिक सुधारणेनंतर, अनेक नव्या वैज्ञानिक शोधांमुळे तसेच तंत्रविज्ञानातील प्रगतीमुळे ज्ञानाच्या वाढीला मोठी चालना मिळाली. फ्रान्सिस बेकन ह्यांच्या उद्‌गामी पद्धतीमुळे समाजजीवन व भौतिक, नैसर्गिक पर्यावरणाच्या अभ्यासात आमूलाग्र बदल झाला. छपाईच्या शोधामुळे ज्ञानाची निर्मिती, वितरण, प्रसार व साठा करणे सहज शक्य झाले. ज्ञानाच्या ह्या विस्तारामुळे तसेच संग्रहामुळे ज्ञानाचे पद्धतशीरपणे संघटन करणे शक्य झाले आणि त्यातून नव्या विद्याशाखा उदयास आल्या. विज्ञान, रसायनशास्त्र, वनस्पतिशास्त्र, प्राणिशास्त्र, भूगर्भशास्त्रे अशी भौतिक व नैसर्गिकशास्त्रे विकसित झाली. तसेच मानसशास्त्र, समाजशास्त्र, अर्थशास्त्र, राज्यशास्त्र ही शास्त्रे तत्त्वज्ञानापासून अलग झाली. आज ज्या विद्याशाखा उपलब्ध आहेत त्यांचे सर्वसाधारणपणे तीन गटांमध्ये वर्गीकरण केले जाते. भौतिक व नैसर्गिकशास्त्रे, सामाजिकशास्त्रे आणि मानव्यविद्या असे ते तीन गट आहेत. त्यांपैकी मानव्यविद्येत विविध

भाषा, ललित कला, इत्यादींचा समावेश होतो. भौतिक व नैसर्गिकशास्त्रात पर्यावरणातील अज्ञात परस्परसंबंधांचा शोध घेतला जातो. उदाहरणार्थ, घटना, प्रक्रिया घडतच असतात. त्या केवळ आपणांस माहीत नसतात. विज्ञानातील शोधांमुळे त्या ज्ञात होतात म्हणून त्याला Discovery असे म्हटले जाते. गणित ही पूर्णतः मानवरचित व अमूर्त अशी विद्याशाखा आहे. ती मानवाने (Invent) केलेली असून ती सर्वप्रथम तत्त्वज्ञानापासून विलग झाली ह्याचा उल्लेख पूर्वी केलेलाच आहे. पूर्वीच्या विद्याशाखेत सातत्याने नवीन भर पडत जात आहे. उदाहरणार्थ, शिक्षणशास्त्र. ही तुलनेने नवी विद्याशाखा आहे. तसेच आजही नवनव्या विद्याशाखा उदयास येत आहेत.

अशा नवीन विद्याशाखा तीन कारणांमुळे उदयास येतात.

- ★ वास्तवाच्या नव्या क्षेत्रातील संशोधनामुळे नवीन विद्याशाखा उदयास येऊ शकते. उदाहरणार्थ, समुद्राचा अभ्यास करणारी विद्याशाखा ओशोनोग्राफी. ही अशीच नवीन क्षेत्रामुळे उदयाला आलेली विद्याशाखा आहे.
- ★ अस्तित्वात असलेल्या क्षेत्राकडे नवीन दृष्टिकोनातून पाहिले जाते. उदाहरणार्थ, शिक्षणाच्या प्रक्रियेचा तंत्रविज्ञानाच्या दृष्टिकोनातून अभ्यास सुरू झाल्याने शैक्षणिक तंत्रज्ञानाची नवी ज्ञानशाखा उदयास आली. कदाचित त्या ज्ञानशाखेचे पुढील काळात स्वतंत्र ज्ञानशाखेतही रूपांतर होऊ शकेल.
- ★ नवीन विद्याशाखा उदयास येण्यामागील तिसरे कारण म्हणजे नवीन प्रकारचे ज्ञान व कौशल्ये विकसित करण्याची गरज निर्माण होणे. उदाहरणार्थ, संगणकाच्या उदयानंतर त्याविषयीचे ज्ञान आणि कौशल्ये निर्माण करण्याची तसेच प्राप्त करण्याची गरज निर्माण झाल्याने संगणकशास्त्र ही नवीन विद्याशाखा तयार झाली.

विद्याशाखेचा उदय होताना सुरुवातीस नवीन विद्याशाखा ही मूळ विद्याशाखेची एक उपशाखा म्हणून उदयास येते किंवा एकापेक्षा जास्त विद्याशाखा एकत्र येऊन एखाद्या क्षेत्राचा अभ्यास करतात व नवीन आंतरज्ञानशाखीय विद्याशाखा तयार होते. काही वेळेस एकापेक्षा जास्त विद्याशाखा एकत्र येऊन अन्य स्वतंत्र विद्याशाखेत रूपांतर होण्यासाठी किंवा स्वतंत्र स्थान मिळविण्यासाठी काही खास वैशिष्ट्ये प्राप्त करावी लागतात. ह्याच वैशिष्ट्यांनुसार विद्याशाखेची व्याख्या करण्याचा प्रयत्न केला जातो. काही व्याख्या पुढे दिलेल्या आहेत.

(क) विद्याशाखेच्या व्याख्या

- ★ आशयक्षेत्रे, पद्धती, कार्यपद्धती, प्रशिक्षण, शिक्षण ह्यांविषयीची स्वतःची खास पार्श्वभूमी असलेल्या विशिष्ट अध्यापनयोग्य ज्ञानाचय संचयास विद्याशाखा असे म्हणतात.
- ★ विशिष्ट आशयघटक, क्रिया किंवा घटना आणि नियम यांच्या संरचनेला विद्याशाखा म्हटले जाते.
- ★ विद्याशाखा म्हणजे विशिष्ट ज्ञानाचे क्षेत्र आणि ते ज्ञान निर्माण करण्याची विशिष्ट पद्धती होय.

ह्या तिन्ही व्याख्यांवरून एक गोष्ट स्पष्ट होते ती म्हणजे, 'विद्याशाखा ही अभ्यासाच्या सोयीसाठी केलेली व्यवस्था आहे. या व्यवस्थेमुळे ज्ञान एका पिढीतून दुसऱ्या पिढीकडे संक्रमित होण्यास मदत होते. शिवाय या क्षेत्रातून संशोधनही सुकर होते.

विद्याशाखेच्या या तीन व्याख्यांवरून विद्याशाखेची काही वैशिष्ट्ये सांगता येतात.

(ख) विद्याशाखेची वैशिष्ट्ये

- ★ प्रत्येक विद्याशाखा ही सुनिश्चित अशा आशय वस्तूचा अभ्यास करते. त्यामुळे विशिष्ट घटना, वस्तू, क्रियाप्रक्रिया, जीवनाचे किंवा समाजाचे घटक यांचाही ती विद्याशाखा अभ्यास करत असते.

★ समस्यांचे व गरजांचे स्वरूप आणि अर्थनिर्वचनाच्या कृती यांविषयी त्या त्या विद्याशाखेची गृहीतके असतात.

★ प्रत्येक क्रियेचा मूलभूत गृहीतकाशी संबंध लावण्याची प्रमाणके आणि कार्यपद्धती असतात.

★ प्रत्येक विद्याशाखेची विशिष्ट बौद्धिक किंवा सामाजिक अशी विहित कार्ये असतात.

★ प्रत्येक विद्याशाखेकडे स्वतःची पृच्छा, ज्ञाननिर्मिती, संशोधनाची साधने, मार्ग, आणि पद्धती असतात.

★ आपल्या पृच्छा पद्धतींचा वापर करून विविध घटना का घडतात याचा अंदाज बांधणारे किंवा त्या घटना का घडतात याचे स्पष्टीकरण देणारे नियम विद्याशाखा निर्माण करतात.

★ या पृच्छेतून विविध संकल्पना, सामान्यीकरणे आणि उपपत्ती तयार होतात किंवा मांडल्या जातात. या सर्वांचे अत्यंत पद्धतशीर रितीने सुसंघटन केले जाते.

त्यातून विद्याशाखेची स्वतःची आशय संरचना तयार होते.

विद्याशाखेची पृच्छा पद्धती आणि संरचना ह्या अध्यापन व संशोधनास पोषक होतील अशा दृष्टीने केलेल्या असतात.

विद्याशाखेच्या वैशिष्ट्यांचे निरीक्षण केले असता ती वैशिष्ट्ये तीन अंगांशी संबंधित आहेत हे तुमच्या लक्षात येईल. ती अंगे म्हणजे –

(I) विद्याशाखेची स्वतःची खास अशी विषयवस्तू,

(II) स्वतःची गृहीतके,

(III) स्वतःची पृच्छा पद्धती आणि संरचना.

(I) विषयवस्तू : प्रत्येक विद्याशाखेच्या विषयवस्तू त्या त्या विद्याशाखेच्या व्याख्येतून स्पष्ट होतात. त्यातून त्या विद्याशाखेची व्याप्ती निश्चित होते. त्या विद्याशाखेच्या अभ्यासात कोणत्या विषयवस्तूचा समावेश होतो किंवा ती विद्याशाखा कशाचा अभ्यास करते हे 'विषयवस्तू' ह्या अंगामुळे स्पष्ट होत असते.

उदाहरणार्थ, 'जीवशास्त्र' ह्या शास्त्राच्या व्याख्येनुसार सजीवांचा अभ्यास करणारे शास्त्र म्हणजे जीवशास्त्र. 'अर्थशास्त्र' म्हणजे राष्ट्राच्या संपत्तीचे स्वरूप व कारणे यांची पृच्छा करणारे शास्त्र असे ॲडम्स स्मिथ म्हणतो.

भूतकालीन घटनांची व घडामोडींची कारणे व परिणाम यांची संगतवार मांडणी व वर्णन म्हणजे इतिहास.

तर शिक्षणशास्त्र हे मानवाने हेतुपूर्वक आयोजिलेल्या शिक्षणप्रक्रियेचा तसेच समाजाची एक उपप्रणाली म्हणून शिक्षणप्रणालीचा अभ्यास करते. ह्या शिक्षणप्रक्रियेत ज्ञान आणि संस्कृतीचे पुढील पिढीला संक्रमण करणे, नवीन ज्ञान निर्माण करणे, नवीन ज्ञान निर्माण करण्याच्या क्षमता विकसित करणे आणि मानवी मध्यस्थामार्फत समाज व वास्तव जगात बदल घडवणे, इत्यादींचा समावेश होतो.

(II) गृहीतके : प्रत्येक विद्याशाखेचा आपल्या विषयवस्तूकडे पाहण्याचा दृष्टिकोन आणि पृच्छेच्या पद्धती गृहीतकांवर आधारलेल्या असतात. उदाहरणार्थ, विज्ञान ह्या विद्याशाखेची गृहीतके पुढीलप्रमाणे आहेत.

★ आपण ज्या जगतात वावरतो ते जग वास्तव आहे व ते जाणता येण्याजोगे आहे.

★ निसर्गात समानता असून एके ठिकाणी जे घडते, ते तशाच परिस्थितीत बऱ्याच अंशी त्याचप्रकारे घडण्याची शक्यता असते.

★ वैज्ञानिक सिद्धांत / तत्त्वांची सत्यता, पुराव्यासह निरीक्षणांद्वारे पडताळून पाहता येते.

★ विश्वात घडणाऱ्या गोष्टींमध्ये एक नियमितपणा व क्रमबद्धता असते.

तशीच सामाजिकशास्त्रांचीही वेगवेगळी गृहीतके असू शकतात. ती आपणांस माहीत हवीत.

या संदर्भात पुढील कृती करून पाहा.

कृती – २

तुम्ही अध्यापन करीत असलेल्या शालेय विषयाची गृहीतके कोणती आहेत ते पुढील चौकटीत मांडा.

(III) पृच्छा पद्धती : ज्ञाननिर्मितीत शोधाच्या किंवा अर्थनिर्वचनाच्या पद्धती हे विद्याशाखेचे आणखी एक महत्त्वाचे अंग आहे. वेगवेगळी भौतिक किंवा नैसर्गिक विज्ञाने प्रामुख्याने वैज्ञानिक पद्धतीने ज्ञानाचा वेध घेतात. तत्त्वज्ञान हे तर्कशास्त्राचा आधार घेते, इतिहास भूतकाळातील अनेक साधनांची चिकित्सा करून त्याआधारे त्यांचा अर्थ लावते आणि भूतकालीन घटनांचा शोध घेते. ह्या स्थूल रूपाने काही पद्धती सांगितल्या तरी प्रत्येक विद्याशाखेच्या संशोधनाच्या विशिष्ट अशा पद्धती असतात. त्यातून त्या त्या विद्याशाखांचे ज्ञान वाढीस लागते. उदाहरणादाखल काही विद्याशाखांच्या पृच्छा पद्धती पुढील तक्त्यात दिलेल्या आहेत.

विद्याशाखांचे ज्ञाननिर्मितीचे मार्ग

क्र.	*विद्याशाखा*	*ज्ञाननिर्मितीचे मार्ग*
(१)	गणित	उद्‌गामी–अवगामी, समस्या निराकरण.
(२)	विज्ञान	वैज्ञानिक पद्धती, निरीक्षणे, प्रयोग.
(३)	समाजशास्त्र व राज्यशास्त्र	संशोधने, कार्यालयीन कागदपत्रांचा अभ्यास, मुलाखती, सामाजिक व राजकीय घडामोडी, सामाजिक अभ्यास, गुणात्मक तसेच वस्तुनिष्ठ व वैज्ञानिक पद्धतींचा शोध.
(४)	मानसशास्त्र	मानवी वर्तनाचे निरीक्षण, वर्णनात्मक निरीक्षण, व्यक्तिअभ्यास, समस्या निराकरण आणि विविध प्रयोग / प्रयोगात्मक पद्धती.
(५)	इतिहास	माहिती, एकत्रीकरण, अर्थनिर्वचन, शोध घेणे, पुरावा, उत्खननात आढळलेल्या प्राचीन वस्तू, अवशेष यांची जुळणी, अनुभव, प्रवासवर्णन, ऐतिहासिक वर्णने, प्रशासन नोंदी, शिल्प, लेणी, मंदिरे, स्तूप, इत्यादींचा अभ्यास
(६)	भूगोल	सर्वेक्षण, विषय अभ्यास, प्रादेशिक अभ्यास, सैद्धांतिक अभ्यास, नकाशावाचन.
(७)	मराठी	आत्मचरित्रे, व्यक्तिचित्रे, आठवणी, प्रवासवर्णने, लघुनिबंध (ललित गद्यप्रकार) तसेच कथा कादंबऱ्या, आत्मकथन, इत्यादी आत्माविष्कार व सर्जनशीलता, संकेत, परंपरा, चिन्हांचा अभ्यास.

(ग) ज्ञाननिर्मितीच्या विविध पद्धती

ज्ञाननिर्मितीच्या विविध पद्धती म्हणजे वेगवेगळ्या विषयांतील संशोधनाच्या किंवा सर्जनशीलतेच्या पद्धती होय. आशययुक्त अध्यापनावरील प्रत्येक विषयाच्या पुस्तकात आपण त्या पाहणार आहोतच. पण येथे त्यांचा आपण थोडक्यात परिचय करून घेणार आहोत.

★ **समस्या निराकरण**

एखादी समस्या असेल तर ती कशामुळे निर्माण झाली, त्या समस्येतील घटक कोणते, ती कशी सोडवता येईल, त्याला पर्याय कोणते, त्याचा चांगला परिणाम कोणतो, याचा शास्त्रशुद्ध विचार म्हणजे समस्या निराकरण होय.

★ **उद्‌गामी–अवगामी**

उद्‌गामी म्हणजे विशेषाकडून सर्वसामान्यांकडे जाणे, मूर्ताकडून अमूर्ताकडे जाणे किंवा उदाहरणाकडून नियमाकडे जाणे होय.

अवगामी म्हणजे सर्वसामान्यांकडून विशेषाकडे जाणे. अवगामी पद्धतीने तर्क वा विचार करतात.

★ **प्रयोगात्मक पद्धती**

एखाद्या विशिष्ट गोष्टीचा नेमका काय परिणाम होतो ते प्रयोग करून तपासून पाहणे म्हणजे प्रयोगात्मक पद्धीत होय.

★ **वैज्ञानिक शोध**

काही गृहीतके, परिकल्पना यांच्या आधारे एखाद्या गोष्टीचा शोध लावणे म्हणजे वैज्ञानिक शोध होय.

★ **निरीक्षण**

एखादी गोष्ट घडताना ती का व कशी घडते, तिचा परिणाम सांगून ते विशिष्ट पद्धतीने मांडणे.

★ **शोध घेणे**

विशिष्ट घटना का घडली त्याचा विविध अंगांनी आढावा घेतला जातो किंवा परिणामकारकता तपासली जाते.

★ **कागदपत्रांचा अभ्यास**

प्रशासकीय कार्यालयातून किंवा इतर प्राथमिक स्रोतातून एखाद्या घटनेसंदर्भात प्राप्त कागदपत्रांचे विश्लेषण आणि तर्कसंगत विचार करून अर्थ लावणे व त्यातून एकत्रितपणे प्राप्त माहिती मांडणे होय.

★ **मुलाखती**

विशिष्ट हेतू साध्यतेसाठी त्या क्षेत्राची माहिती असलेल्या किंवा त्यात प्रत्यक्ष सहभागी व्यक्तीला काही प्रश्न विचारून माहिती प्राप्त करणे होय.

★ **सामाजिक व राजकीय घडामोडींचा अभ्यास**

समाजात घडणाऱ्या विशिष्ट घटना का व कशा घडल्या या संदर्भातील अभ्यास.

★ **मानवी वर्तन निरीक्षण**

एखादे मानवी वर्तन केव्हा, कसे व का घडले यांचे वेगवेगळ्या परिस्थितीत निरीक्षण केल्यास त्याची

मांडणी करता येते व एखाद्या विशिष्ट परिस्थितीत विशिष्ट स्वभावाची व्यक्ती कशी वागेल याचा अंदाज घेता येतो.

★ **वर्णनात्मक निरीक्षण**

यात एखादी घटना कशी घडली किंवा एखाद्या गोष्टीची निर्मिती कशी झाली, इत्यादींचे केलेले निरीक्षण वर्णन स्वरूपात मांडले जाते.

★ **व्यक्तिअभ्यास**

सर्वसामान्यांपेक्षा वेगळ्या असणाऱ्या व्यक्ती, संस्था ह्यांचा विविध वैशिष्ट्यांनुसार, विविध अंगांनी विचार केला जातो. त्याविषयी अनेक पद्धतीने माहिती प्राप्त करून निष्कर्ष नोंदवले जातात.

★ **माहितीचे वर्गीकरण**

प्राप्त माहिती विखुरलेली असते. तिचे विशिष्ट नमुन्यामध्ये, विशिष्ट मुद्याअंतर्गत एकत्रीकरण करून वर्गीकरण केले जाते.

★ **माहितीचे अर्थनिर्वचन**

एखादी घटना घडते तेव्हा तिच्या खुणा किंवा संकेत वेगवेगळ्या स्वरूपात प्राप्त होतात किंवा प्राप्त माहितीचा तर्कसंगत विचार करून अर्थ लावला जातो.

★ **पुरावा**

घडलेल्या घटनेसंदर्भात प्रत्यक्ष पुरावे प्राप्त केले जातात. त्यांचा उपयोग करून काही साधार गोष्टी मांडण्यात येतात. ह्यात प्राचीन वस्तू, अवशेष, लेणी, शिलालेख, स्तूप, दस्तऐवज, इत्यादींचा समावेश होतो.

★ **अनुभव**

प्रत्यक्ष पाहणाऱ्या, साक्षी असणाऱ्या व्यक्तीचे अनुभव लेखन, कथन हे ज्ञाननिर्मितीस उपयुक्त ठरते. ते संघटित होऊन पिढ्यान्‌पिढ्या संक्रमित होते.

★ **सर्वेक्षण**

वर्तमानकाळातील एखादी घटना कशी घडली, तिचा संबंधित घटकावर काय परिणाम झाला याचा पडताळा घेण्यासाठी त्याविषयी व्यापक माहिती मिळविण्याचे कार्य सर्वेक्षणात केले जाते.

★ **विषय अभ्यास**

एखाद्या विशिष्ट विषयाच्या विशिष्ट प्रश्नांना अनुसरून सखोल वाचनातून नवे ज्ञान प्राप्त होऊ शकते.

★ **प्रवासवर्णन**

एखादा प्रवास मग तो कोणत्याही मार्गाने केला असेल आणि त्यातून प्राप्त होणाऱ्या ज्ञानाची, माहितीची नोंद केली असेल तर ते उपयुक्त साधन ठरेल.

★ **प्रादेशिक अभ्यास**

जगात नैसर्गिक बदलांमुळे प्रादेशिक बदल झालेले दिसतात. तेथील हवामान, ऋतू यांच्या अभ्यासातून, निरीक्षणातून नवे ज्ञान निर्माण होते.

या संदर्भात पुढील कृती करा.

पुढे एक तक्ता दिलेला आहे. त्यात त्या विशिष्ट पद्धतीने निर्मित ज्ञानाचे किमान एक उदाहरण लिहा.

ज्ञाननिर्मिती पद्धती	*कोणत्याही विषयातील निर्माण ज्ञानाचे उदाहरण*
(०१) समस्या निराकरण	
(०२) उद्‌गामी-अवगामी	
(०३) प्रयोगात्मक पद्धती	
(०४) वैज्ञानिक शोध	
(०५) निरीक्षण	
(०६) शोध घेणे	
(०७) कागदपत्रांचा अभ्यास	
(०८) मुलाखती	
(०९) सामाजिक व राजकीय घडामोडींचा अभ्यास	
(१०) मानवी वर्तन निरीक्षण	
(११) वर्णनात्मक निरीक्षण	
(१२) व्यक्तिअभ्यास	
(१३) माहितीचे वर्गीकरण	
(१४) माहितीचे अर्थनिर्वचन	
(१५) पुरावा	
(१६) अनुभव	
(१७) सर्वेक्षण	
(१८) विषय अभ्यास	
(१९) प्रवासवर्णन	
(२०) प्रादेशिक अभ्यास	

महत्त्वाचे

प्रत्येक विद्याशाखेची काही गृहीतके असतात आणि आशय वैशिष्ट्यांनुसार पृच्छा पद्धती असतात. त्या पृच्छा पद्धतींनी ती ती विद्याशाखा समृद्ध होत जाते. शिक्षकाला आपल्या विषयासंदर्भात ही माहिती जाणून घेणे आवश्यक आहे.

वेगवेगळ्या पृच्छा पद्धतींच्या वापरातून प्रत्येक विद्याशाखा मोठ्या प्रमाणात ज्ञाननिर्मिती करत असते. या ज्ञानात तपशील, संकल्पना, तत्त्वे, सिद्धांत, नियम, सूत्रे, संकेत, आत्माविष्कार, रचना, प्रक्रिया, पद्धती, मध्यवर्ती कल्पना, कौशल्ये, अर्थनिर्वचने आणि सृजनात्मक निर्मिती, इत्यादी गोष्टी समाविष्ट होतात. येथे अत्यंत व्यापक अशा ज्ञान संचयाची पद्धतशीररित्या रचना करणे आवश्यक असते. त्यामुळे ते ज्ञान नवीन पिढीत

संक्रमित करणे सोपे जाते किंवा संशोधनाद्वारे त्या ज्ञानात भर टाकण्यास मदत होते.

एका पिढीकडून दुसऱ्या पिढीकडे ज्ञान संक्रमित करण्यासाठी या ज्ञानाच्या संचयातील कोणत्या गोष्टी महत्त्वाच्या असा प्रश्न उपस्थित होतो.

जेरोम ब्रुनरच्या मते, 'तपशील किंवा माहितीपेक्षा संकल्पना, तत्त्वे, मध्यवर्ती कल्पना आणि त्यांच्यातील परस्परसंबंध याला अध्यापनात जास्त महत्त्व असले पाहिजे'.

एखाद्या विद्याशाखेच्या मूलभूत कल्पना, संकल्पना, विविध संकल्पनांतील परस्परसंबंध आणि तत्त्वे यांच्या आधारे ज्ञानाची मांडणी केली जाते तिला संरचना असे म्हणतात. या संरचनेच्या मांडणीतून मूलभूत कल्पना संकल्पना आणि तत्त्वे शिकल्यामुळे त्यांचा उपयोग विद्यार्थी एकापेक्षा अधिक घटक शिकण्यासाठी करू शकतात आणि परिणामकारक अध्ययनास मदत होते.

३.२.३ विद्याशाखेच्या आशयाचे मूक व प्रकट वाचन


(क) वाचन अर्थ व स्वरूप

- ★ वाचन म्हणजे लिखित संकेताचा अर्थपूर्ण अवबोध श. कृ. सोहनी (शैक्षणिक टिपाकोश)
- ★ वाचन क्षमता म्हणजे भाषेचे छापील अथवा लेखी स्वरूपात असलेले घटक ओळखणे व त्यांचा योग्य तो अर्थ लावणे. *(डिक्शनरी ऑफ एज्युकेशन)*
- ★ अक्षरे उच्चारणे किंवा पठण करणे याला वाचन असे म्हटले जाते. *(महाराष्ट्र शब्दकोश (भाग ६)*
- ★ नैसर्गिक चिन्ह व संवादाचे संकेत या चेतकामध्ये बौद्धिक पातळीवर समाजयोजन साधनारी प्रक्रिया म्हणजे वाचन. *(ग्रे Gray)*
- ★ वाक्य, उतारा यांच्यातून मोठ्या कौशल्याचे सूक्ष्म अर्थाचे सूत्र काढणे आणि आपल्या व्यक्तिमत्त्वात त्यांची गुंफण करणे म्हणजे वाचन होय. *(ऑर्टली Artly)*

(ख) विविध विद्याशाखाचे स्वरूप

शिक्षण हा समाजाचा प्राणवायू आहे. शिक्षण क्षेत्रात आज नवनवीन विचार प्रवाह किंवा ज्ञानशाखांचा समावेश होत आहे. शिक्षणक्षेत्रात अध्ययन अध्यापनाची तंत्रे बदलत आहेत. आज समाजाच्या गरजा बदलत आहेत. शिक्षणाकडून अपेक्षा वाढत आहेत. त्यामधूनच नवनवीन विद्याशाखा उगम पावत आहेत.

खालील आकृतीवरून विद्याशाखा व त्याचे स्वरूप लक्षात येईल.



(ग) विद्याशाखाच्या आशयाचे मूक व प्रकट वाचन

वाचन अर्थ व स्वरूप – 'वच्' या संस्कृत धातूपासून 'वाचन'

- ★ वाचन म्हणजे लिखित संकेतांचा अर्थपूर्ण अवबोध

  डॉ. श. कृ सोहोनी कृत – *शैक्षणिक टिपाकोश*

वरील व्याख्या वाचनातून अनेक अर्थछटा बाहेर येतात. (ग्रे Gray) यांच्या मते साहित्य वस्तुचा भिन्न भिन्न अर्थ 'ध्वनित होऊ शकतो. वाचक त्याच्या पूर्वानुभवाच्या आधारे साहित्य वस्तूचा अर्थ लावत असतो. विशेषतः काव्य कथा, कादंबरी अशा कलाकृतींचा अर्थबोध अथवा रसग्रहण हे वाचकनिहाय भिन्न असू शकते. अर्थ स्तराचे ग्रे काही प्रकार पडतात ते असे –

★ शाब्दिक अर्थ : जो शब्दशः घेतला जातो.
अभिप्रायात्मक अर्थ : जो उपयोजनात्मक पातळीवर घेतला जातो.

★ मूल्यमापनात्मक : साहित्य वस्तूला स्वतःच्या भाषेत दिलेला प्रतिसाद.

वाचनाचे चार स्तर

★ शब्दबोध ⟶ शब्दांची ओळख व अर्थाचा समावेश


★ आशयग्रहण ⟶ अर्थ व उपयोजनात्मक अर्थ

★ प्रतिसादात्मक अर्थ ⟶ बोद्धिक निर्णय

★ तादात्म्य ⟶

वाचन ही पुनर्निर्मितीच्या अंगाने जाणारी प्रक्रिया आहे. आपण वाचतो म्हणजे नवा अनुभव घेत असतो व आपल्या पूर्वानुभवाशी नवा अनुभव पडताळून पाहता पाहत असतो.

वाचन कौशल्यात अनेक उपकौशल्ये समाविष्ट असतात. त्यामुळे वाचन ही गुंतागुंतीची प्रक्रिया आहे. ती खालील आकृतीद्वारे दाखवायचा प्रयत्न केला आहे.



अवस्था आकृती क्र. : वाचन प्रक्रिया

उपरोक्त आकृत्या सात घटक दिसत असले तरी वाचन प्रक्रिया प्रामुख्याने चार भागात गुंफलेली दिसून येते. ते चार घटक म्हणजे 'संवेदना, अवबोध, अर्थग्रहण, उपयोजन.

★ संवेदना

संवेदना ही एक मानसिक प्रक्रिया आहे. आपल्या शरीराच्या बाह्य नसा ज्यावेळी उत्तेजित होतात त्यावेळी हा अनुभव मेंदूपर्यंत जातो व अशा वेळी संवेदना घडते. संवेदना म्हणजे प्रत्यक्ष बोध नव्हे; पण बोधाला लागणारी कच्ची सामग्री संवेदना पुरवीत असते. पंचेंद्रियांमार्फत आपणास संवेदना प्राप्त होतात. वाचनप्रक्रियेत अक्षर संकेतावरील प्रकाशकिरणे, डोळ्यांच्या चतुर्थपटलावर पडतात आणि नससंस्थेमार्फत त्या संवेदना मेंदूपर्यंत पोहोचविल्या जातात.

★ अवबोध

ज्ञानेंद्रियांना निरनिराळ्या संवेदना होतात. डोळ्याला प्रकाश, कानाला सूर, त्वचेला स्पर्श या संवेदनेला अर्थ लावण्याचे काम मेंदू करतो. शब्द व शब्द समूहांना अर्थ लावण्याची जी प्रक्रिया वाचनात घडून येते त्याला अवबोध म्हणतात.

★ **अर्थग्रहण**

अर्थ समजून घेणे, मनात अर्थप्रतीत होणे, दृश्य संकेतांना अर्थ लावून तो समजून घेणे असे अर्थाचे अनेक स्तर असतात. संदर्भानुसार योग्य अर्थग्रहण झाले पाहिजे. वाचनातील अर्थग्रहण यावर मागे आपण सविस्तर विवेचन केले आहे. त्यात अर्थाचे अनेक स्तर वर्णन केले आहेत. वाचनप्रक्रियेत अर्थग्रहणाला अनन्यसाधारण महत्त्व आहे.

★ **उपयोजन**

आशयग्रहणाचा पुढील टप्पा उपयोजन होय. आशयग्रहण करताना शब्दशः अर्थ आणि उपयोजनात्मक अर्थ त्यात समाविष्ट असतात. संदर्भानुसार व उपयोजनेच्या पातळीवर व्यक्ती अर्थग्रहण करते. असे हे उपयोजन वाचनप्रक्रियेत दिसून येते.

कृती

एखाद्या विशिष्ट मुद्याचे वाचन करा आणि त्यात वरिलपैकी कोणत्या गोष्टी घडल्यास ते उदाहरण स्पष्ट करा.

(I) भाषेचे मूक व प्रकटवाचन

आपण वाचीत असतो, कधी मोठ्याने, कधी मनात, कधी सहज दुकानांच्या पाट्या, जाहिराती दिसल्या म्हणून वाचतो, कधी जाणीवपूर्वक आवश्यक म्हणून वाचतो, तर कधी फारशी गरज नसतानाही वाचतो. अशा वाचनाचे वाचकाच्या हेतूनुसार, स्वरूपानुसार प्रकार पाडता येतात.

आपण वाचतो ते का आणि कशासाठी याचे स्वतःच्या मनाशीच विश्लेषण केले की, वाचनात सुधारणा होते. आपण कसे वाचतो व कसे वाचावे यासंबंधी आत्मपरीक्षण केल्यास वाचन अध्ययनप्रवण होईल. यासाठी वाचन प्रकाराचा परिचय करून घेणे गरजेचे आहे.

वाचनाचे प्रक्रियेनुसार दोन प्रकार पडतात. (अ) प्रकट वाचन (ब) मूक वाचन

(अ) प्रकट वाचन

दुसऱ्याला कळेल अशा रीतीने स्पष्ट व मोठ्याने केलेले वाचन म्हणजे प्रकट वाचन. प्रकट वाचन जसे दुसऱ्यासाठी करावयाचे तसे लेखकाचे विचार भावना, कल्पना त्यांच्यापर्यंत पोहोचविण्यासाठीही करावयाचे असते. वाचक हा मध्यस्थ असतो. म्हणूनच चांगल्या मध्यस्थाने लेखकाचे विचार समजून घेऊन, शब्दाशब्दांचे परस्परसंबंध लक्षात घेऊन विरामचिन्हे व योग्य आघातांसह स्पष्ट शुद्ध वाचले पाहिजे. अशा वाचनकौशल्यांचा उपयोग शिक्षक, वक्ता, नट, वकील दुभाषिक, वृत्तनिवेदक, संदेशवाचक, पत्रवाचक अशा अनेक व्यावसायिकांना होतो. तसा तो सामान्य वाचकालाही होतो. काही गोष्टी, कविता, गद्य उतारे, स्वगते, पत्र, संदेश मोठ्याने वाचले तरच ते परिणामकारक वाटतात.

प्रकट वाचन म्हणजे लेखकाने लिहिलेले विचार, कल्पना, भावना योग्य त्या विराम चिन्हांसह, योग्य ठिकाणी आघात देत, स्वरांच्या चढउतारासह शुद्ध उच्चार करीत श्रोत्यांपर्यंत पोहोचविणे.

प्रकट वाचनाच्या या व्याख्येनुसार हे कौशल्य आत्मसात होण्यासाठी अभ्यासकाने पुढील गोष्टींकडे लक्ष देणे आवश्यक आहे.

- ★ लेखकाच्या कल्पना, भावना, विचार, जाणून घेऊन त्या व्यक्त करता येणे यावर भर द्यावा.
- ★ आपल्या श्वासोच्छ्वासाचा उच्चारांशी असणारा संबंध लक्षात घ्यावा.
- ★ अनेक वेळा वाक्याचा उत्तरार्थ खालच्या पट्टीत उच्चाराला जातो. तसा तो न उच्चारता स्पष्ट उच्चारावा.
- ★ वाचन करताना विराम चिन्हांची दखल द्यावी.

(ब) मूकवाचन

मूकवाचन म्हणजे मनातल्या मनात केलेले वाचन होय. हे वाचन वाचक स्वतःसाठीच करीत असतो. अर्थग्रहणासाठी आनंदासाठी, अभ्यासासाठी असे वाचन उपयुक्त ठरते. हे वाचन करताना ओठांच्या हालचाली उच्चारणासाठी लागणारा वेळ खर्च होत नसतो. मूक वाचनात डोळा आणि मेंदू यांच्याशिवाय इतर अवयव शांत असतात. शब्दाच्या उच्चाराला जो वेळ लागतो तो तेथे वाचतो. तसेच शब्दाचे उच्चारण करताना आघात, चढउतार यांकडे जेवढे जाणीवपूर्वक लक्ष द्यावे लागते तेवढे अशा वाचनात फारसे देण्याची गरज नसते. मूळ वाचनात कौशल्याचा उपयोग अभ्यासक, सामान्य वाचक, लेखक, संशोधक, शिक्षक अशा ज्यांना खूप वाचावयाचे असते. त्यांना होतो. काही गोष्टी मोठ्याने वाचण्यापेक्षा मनात वाचूनच अधिक चांगल्या कळतात.

उदाहरणार्थ, कादंबरी, खाजगी पत्रे, वैचारिक लेखन, माहितीपूर्ण लेखन, इत्यादी.

मूक वाचन म्हणजे वाचकाने मनातल्या मनात अर्थ ग्रहणासाठी, आकलनासाठी आनंदासाठी केलेले जलद वाचन होय.

मूक वाचनातील महत्त्वाचे घटक

मूक वाचनाचे हे कौशल्य आत्मसात होण्यासाठी वाचकाने पुढील गोष्टींकडे अधिक लक्ष द्यावे.

- ★ मजकूराचा अर्थ ध्यानात घेण्याकडे अधिक लक्ष द्यावे.
- ★ मूळ वाचनाने नजरेचा आवाका अधिक वाढवून वाचन गतिमान कसे होईल ते बघावे.
- ★ मोठ्या टाइपावरून बारीक टाइप असलेल्या मजकूराकडे क्रमाने येत गेल्यास वाचनवेग वाढतो.
- ★ अर्थाने आकलन तपासण्यासाठी वाचन झाल्यावर स्वतःलाच, जमले तर दुसऱ्याला प्रश्न विचारून त्वरित ग्रहण व आकलन कसे होईल ते पाहावे.
- ★ बाह्य शांतता, मनाची एकाग्रता व आंतरिक गरज ही मूकवाचन अर्थपूर्ण व वेगवान होण्यास मदत करतात.

कृती

वर्गात भाषेच्या एका पाठाचे प्रकटवाचन करा व येणाऱ्या समस्या शोधा.

(II) सामाजिक शास्त्राचे प्रकट व मूकवाचन

सामाजिक शास्त्राच्या विविध शाखा आहेत. त्यामध्ये प्रत्येक ज्ञानशाखा सामाजिक शास्त्राबरोबर जोडलेली आहे. ही ज्ञानशाखा व्यक्ती आणि समाज यांच्यामधील संबंध कशाप्रकारे असले पाहिजेत याची मांडणी करते. त्याचप्रमाणे अर्थशास्त्र, मानवी भूगोल, समाजशास्त्र, नागरिकशास्त्र, इतिहास, मानववंशशास्त्र पुरातत्व शास्त्र या विद्याशाखेचा संबंध सुद्धा व्यक्ती आणि समाज यांच्याशी असतो.

सामाजिक शास्त्राचे वाचन करताना भाषेप्रमाणे त्याचे मूक व प्रकट वाचन केंद्रबिंदू पद्धतीने केले जात नाही. त्यात घटकांचा समावेश दिसतो. विश्लेषणात्मक पद्धतीचा अवंलब केला जातो. यात दहा पायऱ्या येतात. त्या म्हणजे –

- ★ घटक / आशयाचा हेतू निश्चित करून पूर्वाअनुभव गुणवैशिष्ट्ये यांचा विचार करावा.
- ★ आशय घटकातील परस्परसंबंध, मांडणी, कौशल्य यांचा विचार करावा.
- ★ घटना, प्रसंग, क्रिया घडतात तेव्हा त्यात परस्परसंबंध असतो. त्या घटनेचे स्पष्टीकरण काही नियम, तत्त्वांच्या आधारे करावे.
- ★ सामाजिक शास्त्रातील विषयात काही अमूर्त कल्पना असतात. त्यात काही तांत्रिक शब्दांचे आकलन न होणे आवश्यक असते.
- ★ नैसर्गिक साधन संपत्तीचा विकास करून ती सामंजस्याने वापरण्याबाबत जागृती निर्माण करावी.
- ★ सामाजिक शास्त्रामध्ये सामाजिक बांधिलकी आणि कृती यांचा समावेश करावा.
- ★ सामाजिक शास्त्राच्या वाचनातून व्यक्तिगत कल्याण व सार्वजनिक कल्याण यांमधील एक प्रकारचे सर्जनशील साहचर्य निर्माण करावे.
- ★ चिकित्सक चिंतन शक्य होण्यासाठी मूकवाचन करणे गरजेचे असते.
- ★ स्वातंत्र्य, न्याय आणि बहुविधतेचा आदर आदी शांतता – केंद्री मूल्ये निर्माण व्हावीत व लोकांमध्ये त्यांचा पाया विस्तारला जावा अशी एक मूल्यात्मक जबाबदारी ही सामाजिक शास्त्राच्या वाचनातून यावी.
- ★ सामाजिक शास्त्राच्या वाचनामुळे मूलांमध्ये त्याचे / तिचे व्यक्तिमत्त्वही दुरवू न देता नैतिक व मानसिक ऊर्जेचे वर्धन व्हावे व त्यातून त्यांच्यामध्ये स्वतंत्र विचार करण्याची व या मूल्यांना धोका पोहचवणाऱ्या सामाजिक शक्तींना भिडण्याची क्षमता विकसित व्हावी यासाठी प्रयत्नशील व्हावे.

सामाजिक शास्त्राचे वाचन


सामाजिक शास्त्राचे शिक्षक वर्गात प्रकट वाचन करत नाही. परंतु अध्यापनपूर्व तयारीमध्ये तो सामाजिक शास्त्रातील घटक, उपघटक व मुद्दे यांचा विचार करून अभ्यास करून वर्ग अध्यापनात ते मुद्दे दैनंदिन जीवनाशी सांगड घालत अध्ययन–अनुभव विद्यार्थ्यांपर्यंत पोहचवत असतो.

सामाजिक शास्त्रात वाचनाला महत्त्वाचे स्थान आहे. यात विद्यार्थी गटामध्ये विभागून काही मुद्दे देऊन त्याचे वाचन करताना तसेच ते करताना उपघटकातील आशयाबाबत योग्य विश्लेषण क्षमता पुराव्याची पडताळणी गृहितकाची तपासणी, कारणे व परिणाम यातील संबंध व त्यावर चर्चा याबाबी घडवून आणणे.

कृती

सामाजिक शास्त्रातील एका घटकाचे वाचन करून तुमचा वाचनाचा अनुभव नोंदवा.

सामाजिक शास्त्रामध्ये विश्लेषणात्मक सहसंबंध जोडण्यासाठी संशोधनात्मक प्रश्नाच्या माध्यमातून आशयात कोणत्या गोष्टीची चर्चा केली आहे हे तपासणे आवश्यक असते. यासाठी खालील पायऱ्या उपयुक्त ठरतात – त्यात एकूण चार पायऱ्याचा समावेश यामध्ये होतो.



(III) गणित – विषयाचे प्रकट व मूकवाचन

★ गणित ही प्रामुख्याने तर्काधिष्ठित विचार प्रक्रिया आहे.

★ गणित म्हणजे तर्क – रसेल व व्हाईट हेड

★ गणित हा विषय केवळ मोजमापनाचा किंवा आकडेमोडीचा नसून, तर्कशुद्ध विचार, विश्लेषण, संश्लेषण करण्याची शक्ती विकसित करण्याचे एक साधन आहे.

★ गणितामुळे मानसिक क्षमतांचा विकास व्हावा, अमूर्त विचारसरणी विकसित व्हावी, त्याप्रमाणे उच्च शिक्षणातही सुसंवाद व्हावे याचा विचार करून बीजगणित आणि भूमिती असे गणिताचे दोन स्वतंत्र्य भाग करण्यात आले आहेत.


गणित विषयातील नियम, सूत्रे, सिद्धांताच्या अचूक वाचनामुळे त्यातील विचार समजतात. उदाहरणार्थ, विमर्षी चिंतन, तर्क, विश्लेषण, अनुमान तर्कशुद्ध संबंध जोडण्याची क्षमता निर्माण होते.

भूमितीतील काही गुणधर्म सत्य म्हणून मानले जातात किंवा गृहीत धरले जातात, त्यांना गृहीतके म्हणतात. त्यांच्या आधारावरच विविध गुणधर्माची सत्य असत्यता पडताळून पाहिली जाते, निष्कर्ष काढले जातात.

(IV) विज्ञान विषयाचे प्रकट व मूकवाचन

आपल्या भोवतालच्या जगातील वास्तवाचा शोध घेताना विज्ञानाचा वस्तुनिष्ठतेवर भर आहे हे लक्षात येते. निरीक्षण, प्रयोग, परिकल्पना मांडणी, चाचणी, पडताळणी आणि त्यातून सुयोग्य सुसंबद्ध निष्कर्ष याद्वारे विज्ञानातील वस्तुनिष्ठता निश्चित होते.

विज्ञान ही पृच्छाप्रक्रिया आहे. तथ्य, तत्त्वे, सिद्धांत, संबंध यांची घटकात मांडणी कशी केली आहे. यासाठी विज्ञानाचे वाचन आवश्यक ठरते.



प्रकट व मूकवाचन केल्यामुळे समस्या जाणीव होऊन तिची फोड / विश्लेषण करता येते.

समस्या सोडविण्यासाठी योग्य पद्धतीची निवड करता येते.

निरीक्षण, प्रयोगाच्या सहाय्याने संबंधित गोष्टी ज्ञात होतात.

थोडक्यात

मूक व प्रकट वाचन ह्या अध्ययनातील महत्त्वपूर्ण प्रक्रिया आहे. विषय वैशिष्ट्यांनुसार त्या वाचनाची प्रक्रिया बदलते. त्याचा विचार करून मुलांना वाचनास प्रवृत्त करणे महत्त्वपूर्ण ठरेल.


३.२.४ वाचनाच्या कार्यनीती – टिप्पणीलेखन व सारांशलेखन

सैनिक क्षेत्रात सेनापती एखादे लक्ष्य गाठण्यासाठी निश्चित अशी रचना किंवा लक्ष्यव्यूह टिपतो त्याला कार्यनिती असे म्हणतात.

Reading strategies are deliberate, goal - directes attempts to control and modify the reader's efforts to decode text understand words and construct meaning of text.

(Afferbach et al 2008).

वाचन आकलनाच्या दृष्टिने वाचन कार्यनीतीचा विचार केला जात असल्यामुळे वाचनाचे कार्यनीतीनुसार काही प्रकार पडतात.



(क) टिप्पणी लेखन


शाळेत वरच्या इयत्तांमध्ये किंवा महाविद्यालयामध्ये गेल्यावर शिक्षकांनी आशय उतरवून देणे अपेक्षित नसते. तर विद्यार्थ्यांनीच स्वतः टिपणे काढावीत अशी अपेक्षा असते. परंतु बऱ्याचदा मुलांना टिपणे काढणे म्हणजे काय? हे समजत नाही. त्यामुळे ते पूर्ण पाठच जवळजवळ पुन्हा उतरवून काढतात. त्यात वेळ जातो. अशा टिप्पणाचा परीक्षेसाठी उपयोग होत नाही.

टिपणी तयार करणे ही पद्धती विद्यार्थी, पत्रकार, कर्मचारी व उद्योजक यांना उपयुक्त आहे. महत्त्वाचे मुद्दे लिहून पुन्हा मुद्यांचा विस्तार केला असता त्याचा फायदा विद्यार्थ्यांना होतो. नोट्स तयार करत असताना फक्त मुद्दा घ्यावा. त्यामध्ये कर्ता अगर क्रियापद असू नये.

टिपणे काढण्यासंदर्भात काही नियम / सूचना

- ★ विद्यार्थ्यांना एक धडा, कथा अगर परिच्छेद वाचल्यानंतर त्यातील प्रमुख आणि महत्त्वाचे मुद्दे कोणते सापडतात ते पाहण्याचा व विचार करण्याचा सराव द्यावा.
- ★ टिपण काढताना पूर्ण वाक्ये न लिहिता त्यातले प्रमुख शब्द शोधणे आणि त्याचा परस्परसंबंध व्यक्त होईल अशा रीतीने मांडणी करून टिपणे घेणे उपयुक्त ठरते.

★ मांडणी वर्गीकरण तक्त्याप्रमाणे असावी




★ परिच्छेदाचे पूर्ण आकलन झाल्याशिवाय मुद्दे काढू नये.

★ काही वेळा एखादी प्रक्रिया किंवा कृती लक्षात ठेवायची असते. साबण तयार करण्याची कृती, काच तयार करण्याची प्रक्रिया, प्रकाश संश्लेषण प्रक्रिया, निवडणूक प्रक्रिया, नकाशा तयार करण्याच्या पद्धती अशा विविध गोष्टी लक्षात ठेवण्यासाठी ओघतक्ता स्वरूपात मांडणी करता येते.

★ काही वेळा सारणी तयार करता येते. उदाहरणार्थ, आम्ल आम्लकारीची तुलना, मातीच्या प्रकारातील फरक, विविध देशांची तुलना यासाठी सारणी उपयोगी ठरते.


★ एखाद्या पाठातले अनेक मुद्दे दृष्टिक्षेपात लक्षात ठेवण्यासाठी संघटन तक्ता तयार करता येतो.

टिपणे काढणे उदाहरणार्थ १



संघटन तक्ता

कल्पनाशक्तीचा उपयोग करणारा



(ख) सारांश लेखन

दिवसेंदिवस मनुष्याचे जीवन इतके घाईचे व धांदलीचे होत चालले आहे, की त्याला निवांतपणा फारसा मिळत नाही त्यातून थोडा वेळ मिळतो तो वाचनात घालवायचा असे त्याने ठरविल्यास कमीत कमी शब्दांत कुठे काय सांगितले आहे तिकडे त्याचे लक्ष असते. भल्या मोठ्या कांदबरीऐवजी तो एखादी लघुकथा किंवा लघुतमकथा पसंत करतो. अगदी सर्व पाठ शिकवून झाल्यानंतर शिक्षकालाही अगदी थोडक्यात सांगावे लागते.

अगदी असेच काही वर्तमानपत्रात संपादक त्याचा गोषवारा देतो. ज्यामुळे वर्तमानपत्र वाचनीय होते. या सर्व गोष्टी आपणास समजून घेण्यासाठी एक गोष्ट येणे आवश्यक असते ते म्हणजे सारांशलेखन.

व्यवहारात उगीच पाल्हाळ न लावता, आवश्यक तेवढ्याच गोष्टींचा उल्लेख करून आपण आपले म्हणणे मांडतो. हा जो संक्षेप करावा लागतो यालाच 'सारांश' असे म्हणतात. आपले विचार संक्षेपाने कसे मांडावेत. व्यक्त करावेत याचे शिक्षण विद्यार्थ्यांना विद्यार्थी दशेत देणे उचित ठरते. यालाच 'सारांशलेखन' असे म्हणतात.


'सारांश' या शब्दाची फोड 'सार+अंश' अशी आहे. 'सार' म्हणजे त्या उताऱ्याचा गाभा, मुख्य विचार मध्यवर्ती असा विचार त्या उताऱ्यातील सार अंशरूपाने मांडणे, थोडक्यात मांडणे, मूळ उताऱ्यातील मुख्य विचार उपविचार, सारांशरूपात यावेत. मूळ विचाराचे स्पष्टीकरण दाखले व त्याचे स्पष्टीकरण अलंकरण वजा करून मुख्य विचार सांगता येणे ही कला आहे.

सारांश लेखनाचे महत्त्व व उपयोग

जगातील ज्ञान स्मरणात ठेवण्यासाठी आत्मसात करायला व आपले वेगळेपण स्पष्ट करायला सारांशाचे तत्त्व उपयोगी पडते.

माहितीचे संकलन, संवर्धन, सारांशामुळेच शक्य होते. आपल्या आकलनाचा पडताळा सारांशाहूनच घेता येतो.

स्वयं-अध्ययनाबरोबर भाषणाच्या टिप्पणी घेणे, बातमी, वृत्त यांचे पुनर्लेखन करणे, नोट्टा तयार करणे, यासाठी सारांशलेखन कौशल्याचा उपयोग होतो. त्यासाठी काही तंत्रे वापरली जातात ती पुढे आकृतीत दाखवली आहेत.



सारांश करण्याची पद्धती

- ★ सारांशलेखनासाठी एखादा उतारा दिला जातो. या उताऱ्याच्या लांबीच्या एक तृतीयांश या प्रमाणात त्या लेखकाचे विचार विद्यार्थ्याने आपल्या भाषेत सलग रीतीने लिहून दाखवावे ही अपेक्षा असते.
- ★ शब्द काटेकोरपणे मोजून लिहिण्याचे कारण नाही.
- ★ सारांश लिहिण्यापूर्वी विद्यार्थ्याने उतारा प्रथम वाचावा त्यात कोणकोणत्या मुद्यांवर विवेचन आहे ते मुद्दे क्रमाने कागदावर मांडावेत.
- ★ मूळ उताऱ्यातील भाषेत सारांश न सांगता स्वतःच्या भाषेत मांडावे.
- ★ लेखकाचा विचार पहिल्या वाचनाने कळला नसेल तर मूळ उतारा दोनदा-तीनदा देखील वाचावा.
- ★ सारांशाचा विस्तार मूळ उताऱ्याच्या एक तृतीयांश इतपतच झाला आहे ना ते पाहावे. तसा नसल्यास काटछाट करून तो सुधारावा.
- ★ मूळ उताऱ्यात विवेचन करताना वापरलेले अलंकार विशेषणे, वर्णन इ. गोषवारा सांगताना अनावश्यक वाटत असतील तर ती काढून टाकावीत.

थोडक्यात

वाचनाच्या कार्यनीती हा मुद्दा आपण पहिला यात टिपणी लेखन व सारांश लेखन या दोन कार्यनिती अभ्यासल्या. टिपणी लेखन वाचन आकलनाच्या दृष्टिने उपयुक्त ठरते. तर सारांश लेखनाच्या साहाय्याने मूळ उताऱ्यातले विचार स्वतःच्या भाषेत सलगपणे सांगता येतात.

३.२.५ ग्रंथालयातील संदर्भग्रंथ वाचन व विमर्षण

'संदर्भ' या शब्दाचा इंग्रजीत Reference असा समानार्थी शब्द आहे. संदर्भ किंवा Reference या शब्दाचा पुढीलप्रमाणे अनेक अर्थ आहेत.

(i) एखाद्या गोष्टीचा किंवा व्यक्तीचा उल्लेख
(The act of mentioning something or someone)

- ★ संस्थेच्या अहवालात त्याच्या कामाचा संदर्भ होता.
- ★ आपल्या भाषणात त्याने अनेकांचा संदर्भ दिला.

(ii) एखाद्या गोष्टीकडे माहिती मिळविण्याच्या दृष्टीने पाहाणे.
(The act of looking at something for information)

★ आपल्या संदर्भासाठी हे २-३ महत्त्वाचे फोन नंबर लिहून दे.

★ ऐतिहासिक संदर्भासाठी हे पुस्तक फारच उपयोगी दिसते.

(iii) एखादी माहिती कुठे पाहता येईल किंवा कुठून मिळविता या संबंधीची टीप, संदर्भ टीप
(a note that tells you where certain information can be found or came from)

★ प्रत्येक प्रकरणाच्या शेवटी आवश्यक त्या संदर्भ टिपा दिल्या आहेत.

★ हा संदर्भ नरहर कुरूंदकरांच्या 'जागर' या पुस्तकात पान १३५ वर पाहावा.

(iv) औपचारिक पत्राचा जावक क्रमांक
(Coutward no. on formal letters)

★ पत्रव्यवहार करताना कृपया संबंधित पत्राचा संदर्भ द्यावा.

★ संदर्भ तुमचे जा. क्र. ५०७/१५.५.२०१८ चे पत्र.

(v) व्यक्तीचे चारित्र्य व क्षमता याबद्दलचे प्रशस्तीपत्र
(a letter or a certificate describing a person's character and ability)

★ आमच्या कंपनीच्या मॅनेजरनी मला चांगले संदर्भपत्र दिले.

★ संदर्भासाठी मी सध्या जेथे नोकरी करतो तेथील पत्र.

(vi) नोकरीसाठीच्या तुमच्या अर्जात तुम्हाला ओळखणाऱ्या व्यक्तीचा उल्लेख
(a person who allows you to mention their name in your application for job)

★ मी एका कंपनीत नोकरीसाठी अर्ज करतोच. संदर्भ म्हणून तुमचे नाव देऊ का?

★ संदर्भ : श्री. ज. म. शर्मा
उद्योगपती
संपर्क - ९४७२३६४५२८

(vii) विशिष्ट गोष्टीची पार्श्वभूमी
(The context of something or somebody)

★ संदर्भासहित स्पष्टीकरण करा.
''स्वराज्य हा माझा जन्मसिद्ध हक्क आहे आणि तो मी मिळविनच.''

★ पुढील ओळींचा संदर्भ स्पष्ट करा.
''कुणी घर देतं का घर .....''

(viii) एखाद्या विषयासंबंधीची विशिष्ट माहिती
(a specific piece of information related to something)

★ १९६२ च्या भारत-चीनी युद्धाचा संदर्भ मला कोठे मिळेल?

★ परग्रहावर जीवसृष्टी आहे काय? याबद्दलचे संशोधन जगात कुणी कुणी केले त्याचा संदर्भ मी शोधतोच.

संदर्भग्रंथ वाचनासंबंधीची चर्चा करण्यासाठी II, III, V, VII आणि VIII या अर्थांचा आपल्याला विचार करावा लागेल हे तुमच्या लक्षात आले असेलच.

लक्षात ठेवा

एखाद्या गोष्टीबद्दल विचार करताना, लिहिताना, चर्चा करताना आपल्याकडे आवश्यक त्या माहितीचा अभाव असेल किंवा आपली माहिती अपूरी असेल किंवा आहे त्यापेक्षा अधिक माहिती हवी असेल त्यासाठी आपण शोधाशोध करतो. अशा जाणीवपूर्वक शोधून मिळविलेल्या माहितीला संदर्भ म्हणता येईल.

(क) संदर्भग्रंथ वाचन

एखाद्या गोष्टीबद्दल अचूक, शास्त्रशुद्ध, नेमकी व आवश्यक ती सर्व माहिती ज्या ग्रंथात दिलेली असते त्याला संदर्भग्रंथ म्हणता येईल.

उदाहरणार्थ, यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाबद्दलच्या एखाद्या ग्रंथात पुढीलप्रमाणे माहिती असू शकते.

- ★ विद्यापीठाच्या नावाचा इतिहास
- ★ विद्यापीठाची उद्दिष्टे, ध्येय-धोरणे
- ★ विविध अभ्यासक्रम व अभ्यासक्रम पूरक कार्यक्रम
- ★ देश व आंतरराष्ट्रीय पातळीवरील तज्ज्ञांच्या भेटी व त्यांचे मार्गदर्शन
- ★ परंपरागत विद्यापीठांपेक्षा य.च.म. मुक्त विद्यापीठाचे वेगळेपण, खास वैशिष्ट्ये
- ★ आत्तापर्यंत राबविलेले विशेष कार्यक्रम

असा माहितीपूर्ण ग्रंथ म्हणजे आपल्या विद्यापीठाचा संदर्भग्रंथच म्हणता येईल. कारण विद्यापीठाची अशी एकत्रित सर्व माहिती अन्यत्र मिळणे कठीण.

आपल्या विद्यापीठासंबंधी कुठलीही माहिती कुणालाही हवी असेल तर ती या स्वरूपाच्या संदर्भ ग्रंथात उपलब्ध होईल. कुठल्याही संस्थेबद्दल किंवा व्यक्तीबद्दल विस्तृत आणि व्यापक माहिती देणाऱ्या ग्रंथाला त्या संस्थेचा किंवा व्यक्तीचा संदर्भग्रंथ म्हणता येईल.

अर्थात 'संदर्भग्रंथ' या संकल्पनेची व्याप्ती याहून खूप मोठी आहे.

जगातील अनेक विषयांची माहिती देणाऱ्या ग्रंथास इंग्रजीत encyclopedia (एनसायक्लोपीडीया) म्हणतात. मराठीत त्याला आपण विश्वकोश किंवा ज्ञानकोश म्हणतो. विश्वकोशाचे अनेक खंड ही असू शकतात. त्यातील विषयांची मांडणी वर्णक्रमाने असते. उदाहरणार्थ, इंग्रजीत A ते Z तर मराठीत अ ते ह प्रमाणे.

महाराष्ट्र राज्य मराठी विश्वकोश निर्मिती मंडळाने २० खंड असलेला मराठी विश्वकोश केला आहे. हा विश्वकोश म्हणजे ज्ञानाचा महासागर आहे. त्यातील नोंदी विषयानुसार तसेच आद्याक्षरानुसार केलेल्या आहेत. हा विश्वकोश सर्व ज्ञानशाखांना स्पर्श करणारा आहे. त्याच्या निर्मितीमुळे मराठी माणसांना ज्ञानाचे एक प्रचंड दालन खुले झाले आहे. हा विश्वकोश ऑनलाईन देखील उपलब्ध आहे. मराठी विश्वकोशाप्रमाणेच 'हिंदुधर्म विश्वकोश', 'भारतीय संविधान विश्वकोश', 'समाजशास्त्र विश्वकोश' असे अनेक ज्ञानभंडार असलेले संदर्भकोश उपलब्ध आहेत. विविध शब्दकोश (dictionaries) हे एक प्रकारचे संदर्भग्रंथ आहेत.

या ठिकाणी तुमच्या लक्षात आले असेल की, संदर्भग्रंथ हे काही पहिल्या पानापासून शेवटच्या पानापर्यंत सलग वाचण्यासाठीचे पुस्तक नाही. तो विविध माहितीचा खजिना आहे आणि जेव्हा आपल्याला जी माहिती हवी असते त्यावेळेला आपल्याला ती मिळू शकते. समजा तुम्हाला 'सिंहस्थ' या संबंधी माहिती हवी किंवा 'मंगळ' या ग्रहाची माहिती हवी तर तुम्ही 'स' आणि 'म' मध्ये जाऊन ती माहिती शोधू शकता. विश्वकोशाच्या शेवटी 'सिंहस्थ' किंवा 'मंगळ' कुठल्या पानावर असेल याची माहिती 'इंडेक्स' च्या रूपाने सहज उपलब्ध असते.

'संदर्भग्रंथ वाचन' या संकल्पनेचा विचार करण्यापूर्वी 'संदर्भ' आणि 'संदर्भग्रंथ' म्हणजे काय हे समजावून घेणे आवश्यक होते म्हणून ही चर्चा.

लक्षात ठेवा

ज्या ग्रंथात विविध विषयांसंबंधीच्या माहितीचे भांडार असते त्याला संदर्भग्रंथ म्हणतात.

संदर्भग्रंथातून, उदा. विश्वकोशातून आपल्याला हवा तो संदर्भ मिळू शकतो. हे खरे असले तरी ज्या

पुस्तकातून आपण संदर्भ घेतो ते पुस्तक संदर्भग्रंथच असेल असे नाही. संस्थांचे वार्षिक अहवाल, व्यक्तींचे जीवनवृत्तांत, सरकारी गॅझेट, मनोखा इयर बुक, इंडियाज् हुज् हू इत्यादी अनेक ठिकाणाहून आपल्याला संदर्भ मिळू शकतात.

संदर्भग्रंथा व्यतिरिक्त ज्या पुस्तकातून, माहिती पत्रकातून किंवा वृत्तपत्रातून आपल्याला संदर्भ मिळू शकतो किंवा आपल्या संदर्भासाठी त्यांचा आपण वापर करू शकतो त्यांना 'संदर्भस्रोत' म्हणता येईल. संदर्भग्रंथ किंवा ज्ञानकोश हा ग्रंथाचा प्रकार असून त्याची काही खास वैशिष्ट्ये असतात. ती पुढीलप्रमाणे सांगता येतील.

संदर्भग्रंथाची वैशिष्ट्ये

- ★ संदर्भग्रंथामध्ये विविध विषयावर माहिती दिलेली असते.
- ★ एखाद्याच विषयाला वाहिलेला विश्वकोश असेल, उदाहरण 'हिंदूधर्म विश्वकोश' तर त्या विषयाच्या विविध पैलूंवरची आवश्यक ती सर्व माहिती दिलेली असते.
- ★ संदर्भग्रंथात दिलेली माहिती आवश्यक तेवढी पण सर्व स्पर्शी व अचूक असावी असे गृहीत धरलेले असते.
- ★ संदर्भग्रंथातील माहिती खरी (genuine), विश्वसनीय (reliable) आणि अधिक प्रमाणित किंवा अस्सल (authentic) असते असे मानले जाते.
- ★ संदर्भग्रंथातील ज्ञानसामग्रीचा भर माहिती (Information) आणि सत्यता (Facts) यावर असतो.
- ★ दिलेली माहिती तटस्थ किंवा त्रयस्थपणे (impartial) आणि वस्तुनिष्ठ दृष्टिकोनातून (objectively) दिलेली असते. त्यामुळे वैयक्तिक भाव-भावना, व्यक्तिगत मते किंवा समजुती यांना संदर्भग्रंथात थारा नसतो.
- ★ संदर्भग्रंथ हा माहितीचा महासागर असल्याने कथा, कादंबरी किंवा सर्वसाधारण पुस्तकासारखे सलग वाचनाची गरज नसते. आपल्याला हवी तेवढी माहिती शोधण्यापुरताच संदर्भग्रंथाचा उपयोग केला जातो.
- ★ संदर्भग्रंथाची रचना किंवा मांडणी विशिष्ट प्रकारची असते. माहिती विषयानुसार आणि आद्याक्षरानुसार दिलेली असते. शेवटी विषयसुची (कुठला विषय कोणत्या पानावर आहे.) असते. त्यामुळे हवी असलेली माहिती फारसा विलंब न लावता मिळू शकते.
- ★ प्रचंड माहितीची खाण असल्यामुळे संदर्भग्रंथाचे एकापेक्षा जास्त खंडही असू शकतात.
- ★ ग्रंथालयामध्ये संदर्भग्रंथांचा एक खास विभाग असतो.
- ★ संदर्भग्रंथांच्या ज्ञानमूल्यामुळे तसेच आर्थिक मूल्यामुळे आणि काही ग्रंथ दुर्मीळ असल्यामुळे ग्रंथालयाबाहेर नेऊ दिले जात नाहीत. संदर्भग्रंथ ग्रंथालयातच पाहायचे असतात. ते हाताळताना खराब होणार नाहीत याचीही विशेष काळजी घ्यावी लागते.
- ★ संशोधन करण्यासाठी, शोधनिबंध लिहिण्यासाठी, अभ्यासपूर्ण लेखन करण्यासाठी किंवा भाषण अथवा सादरीकरणासाठी संदर्भग्रंथाचा विशेष उपयोग होतो.
- ★ संदर्भग्रंथातील माहिती निर्विवाद (unquestionable) असल्यामुळे तिच्या आधारामुळे (support) आपल्या बोलण्या-लिहिण्याला, विचार करण्याला, मत किंवा दृष्टिकोन मांडण्याला पुष्टी मिळते.

संदर्भग्रंथासंबंधी ही सर्व माहिती घेतल्यानंतर संदर्भग्रंथाचे वाचन कसे करावे याची कल्पना तुम्हाला आली असेल.

संदर्भग्रंथ वाचनाबद्दल तुम्ही काही गोष्टी लक्षात घेणे गरजेचे आहे. त्याअगोदर संदर्भग्रंथवाचन व इतर (कथा-कादंबऱ्या, प्रवासवर्णने, आत्मचरित्रे, पत्रव्यवहार, रिपोर्टस इत्यादी) वाचन यातील फरक लक्षात घ्यावा लागेल.

संदर्भग्रंथ व इतर वाचनातील फरक

संदर्भग्रंथवाचन	*इतर वाचन : साहित्यिक कलाकृती, अभ्यासासंबंधीचे वाचन, पत्र व्यवहाराचे अहवाल इ.इ.*
१. सर्वसाधारणपणे आपल्याला जेव्हा एखादा संदर्भ हवा असेल तेव्हाच आपण संदर्भग्रंथाकडे किंवा संदर्भ स्रोताचा शोध घेतो.	१. जेव्हा जेव्हा आपल्याला वाचनाची इच्छा होते. झोपण्यापूर्वी, रात्रीच्या वेळी, मोकळ्या वेळेत, सुटीच्या दिवशी तेव्हा तेव्हा आपण वाचन करू शकतो.
२. बहुधा हे वाचन संदर्भापुरतेच मर्यादित असते. संदर्भ पाहता पाहता संदर्भग्रंथातील इतरही काही गोष्टी उत्सुकता म्हणून आणि वेळ असेल तर आपण वाचतो, चाळतो.	२. या वाचनाला मर्यादा नसते किंवा बंधनही नसते. आपल्या आवडीनुसार वाचनात रमतो तर कितीही वाचत राहू शकतो.
३. माहिती आणि संबंधित विषयाचा तपशीलाने बुद्धीला चालना मिळते. त्या तुलनेने भावनिक तादात्म्य फारच कमी असते किंवा अनेकदा नसतेही.	३. वाचनमजकूर जीवनातील अनुभवांशी संबंधित असल्याने वाचक त्याच्याशी एकरूप होतो. बुद्धिपेक्षा भावनांची चालवाचाळ मोठ्या प्रमाणात असते. भावनिक सहभाग जास्ती असतो.
४. वाचकाचा लेखकाशी वाचतांना संबंध येत नाही.	४. लेखक प्रत्यक्ष-अप्रत्यक्षरित्या वाचन मजकूरात दिसतो व त्याचा वाचकावर प्रभाव पडत राहतो.
५. बहुतांश मजकूर माहितीवजा असल्याने वैचारिक चिंतनाचा भाग कमी असतो.	५. वाचत मजकूरात विचारांना चालना देणाऱ्या अनेक गोष्टी असू शकतात. वाचतांना आणि वाचल्यानंतर मनात चाललेल्या चिंतनाचा भाग व प्रभाव मोठा असतो.
६. वाचन मजकूर ग्रंथालयात जाऊनच बघावा लागतो. त्यासाठी वेळ काढणे, वेळेचे नियोजन करावे लागते. अर्थात मजकूर ऑनलाईन उपलब्ध असेल तर सहज पाहता येतो.	६. वाचन मजकूर सहज उपलब्ध असू शकतो. उपलब्धता (accessibility) ही अडचण नसते.

संदर्भग्रंथवाचन व इतर प्रकारचे वाचन यातून निर्माण होणारे विमर्षण कुठल्या स्वरूपाचे असते? त्याची काही वेगळी वैशिष्ट्ये असतात का? याचा विचार आपण यानंतर करणार आहोत.

(ख) विमर्षण : अर्थ व प्रक्रिया

'विमर्षण' म्हणजे एखाद्या गोष्टीचा खोलवर, सांगोपांग, सर्व स्पर्शी विचार करणे.

विमर्षण ही वाचनातून निर्माण होणारी अपरिहार्य गोष्ट आहे. वाचन आणि विमर्षण या एकाच नाण्याच्या दोन बाजू आहेत. त्या वेगळ्या करता येणे कठीण आहे. वाचन आणि विमर्षण एकमेकांना पूरक आणि एकमेकांवर अवलंबून आहेत. विमर्षणा अभावी वाचन असू शकत नाही आणि वाचन म्हटले की, विमर्षण आलेच. वाचनाने विमर्षणाची प्रक्रिया सुरू होते आणि विमर्षणामुळे वाचन समृद्ध होते, वाचन मजकूराच्या आशयाबद्दलची आपली समज वाढीस लागते.

एखाद्या संदर्भाचे वाचन करताना आणि लेखकाच्या प्रतिभेतून निर्माण झालेले लेखन वाचताना विमर्षण होतेच. हे विमर्षण या दोन्ही वाचनात पूर्णपणे वेगळे असते असे नाही पण त्यांचे स्वरूप नीट समजाऊन घ्यायला हवे.

संदर्भ मजकूरात माहितीकेंद्रित गोष्टी असतात. त्यात भावभावना किंवा विचार, अनुभव, संवेदना यांना फारशी जागा नसते. उदाहरण आपण एखाद्या संस्थेचा, व्यक्तीचा किंवा संकल्पनेचा संदर्भ शोधला तर आपले विमर्षण त्याभोवतीच फिरत राहील. ताजमहाल कुणी बांधला? मुंबईचे 'मुंबई' हे नाव कसे पडले? या विश्वाचा विस्तार किती आहे? अलबर्ट आईन्स्टाईनसारखा महान शास्त्रज्ञ शाळेत पहिला आला होता का? इत्यादी स्वरूपाच्या संदर्भ शोधनानिमित्त निर्माण होणारे विमर्षण त्या त्या संदर्भाशी संबंधित राहील. म्हणजे आपला विचार त्या संदर्भापुरता राहील. पण श्यामच्या आईने श्यामवर कसे संस्कार केले किंवा जिजामातेने शिवाजी महाराजांचे व्यक्तिमत्त्व कसे घडविले याचे वाचन करताना लेखकाने मांडलेला कलात्मक अनुभव आपल्या मनाचे आकाश व्यापून टाकतो आणि त्या निमित्त होणारे विमर्षण बराच काळ सक्रिय असते.

आता विमर्षण आणि विमर्षण प्रक्रियेच्या विविध अंगांचा आपण विचार करू.

★ विमर्षण म्हणजे काय?

विमर्षण म्हणजे एखाद्या गोष्टीचा सखोल व सर्वांगीण विचार.

★ विमर्षण आणि वाचन यांचा संबंध

विमर्षणाचा प्रारंभ वाचनाने होतो व विमर्षणामुळे वाचन समृद्ध होते. म्हणजे वाचनमजकूराचा आपण जेवढा खोलवर व सर्वबाजूंनी विचार करू तेवढा वाचन मजकूराच्या आशयाबद्दलचा आपला समज (Understanding) वाढतो. या अर्थाने वाचन व विमर्षण एकमेकांना पूरक आहेत.

वाचन आणि विमर्षण या दोन्ही प्रक्रिया एकमेकांमध्ये एवढ्या मिसळून गेलेल्या असतात की, त्यांना वेगळ करणे जवळजवळ अशक्य असते.

★ विमर्षणाची प्रक्रिया कधी व कशी सुरू होते?

वाचन सुरू होताच विमर्षण प्रक्रिया सुरू होते. वाचन करीत असताना विमर्षण सुरूच असते. बऱ्याच वेळा वाचन संपल्यानंतरही विमर्षण प्रक्रिया कार्यरत असू शकते.

विमर्षण प्रक्रिया कशी सुरू होते हे अनुभवण्यासाठी पुढील मजकूर वाचा.

''शिक्षकाकडून विद्यार्थ्यांकडे ज्ञान जायचे असेल तर दोघेही समान पातळीवर असणे आवश्यक असते. शिकवणारा आणि शिकणारा यांच्यातील वहनमार्ग वरखाली असेल तर ज्ञानाचे वहन होऊ शकणार नाही. ज्ञान प्रवाहित होण्यासाठी समान पातळी ही पूर्वसह असते.''

या संदर्भात विमर्षणप्रक्रिया कशी होते याचे निरीक्षण करूया.

- ★ पहिल्या शब्दाच्या वाचनापासून आपली विचारप्रक्रिया सुरू होते.
- ★ मजकूराचा विषय शिक्षक व विद्यार्थी यासंबंधी आहे हे आपल्या लक्षात येते.
- ★ शिक्षक आणि विद्यार्थी यांच्यातील नाते अध्यापन आणि अध्ययन यांच्याशी संबंधित आहे हेही आपल्याला समजते.
- ★ आपण जसे पुढे वाचत जातो तेव्हा अधिक विचार करू लागतो. शिकण्या-शिकविण्याच्या प्रक्रियेशी समानतेचे तत्त्व निगडित प्रक्रिया समानतेच्या भावनेशिवाय अध्ययन-अध्यापनाची प्रक्रिया होऊ शकत नाही.
- ★ आपला विचार अधिक खोलवर जाऊ शकतो. शिक्षक व विद्यार्थी यांच्यातील अध्ययन-अध्यापनासाठी आवश्यक असलेले समानतेचे नाते म्हणजे काय?

★ या नात्यात भीती (fear) कणभरही नसते. भयावह वाटावे असे काहीही असू शकत नाही.

★ एकमेकांबदद्दल कुठलीही शंका (suspicion) नसते.

★ एकमेकांच्या आस्तित्त्वामुळे अवघडल्यासारखे (awkwardness) होत नाही किंवा मानसिक ताण (mental strain) नसतो.

★ या गोष्टीमुळे दोघांच्या नात्यात एक मोकळेपणा असतो.

★ मोकळेपणामुळे शिकणारी व्यक्ती आपल्या मनातील प्रश्न निर्भयपणे विचारू शकते.

★ या सर्वांमुळे अध्ययन-अध्यापन प्रक्रिया आनंददायी होते.

विमर्षण

कुठलीही आनंददायी गोष्ट माणूस मनापासून करतो आणि कुठलीही मनापासून केलेली गोष्ट माणसाला समृद्ध करते. शिकण्या-शिकविण्याची प्रक्रिया अर्थपूर्ण होते आणि जगण्यालाही त्यामुळे अर्थ निर्माण होतो, विचारांना, कृतीला दिशा मिळते आणि जगणे एक आनंदोत्सव होऊन जातो.

पाण्याचा प्रवाह आणि समपातळीचा शास्त्रसिद्ध नियम यामुळे 'ज्ञानाचे प्रवाहित होणे' शिक्षक आणि विद्यार्थी यांचे 'समपातळीवर असणे' यावर अवलंबून असते हे आपल्याला पटते. विषमता असेल तेथे ज्ञानवहनाच्या प्रक्रियेला सारखे अडथळे निर्माण होत राहतील आणि ज्ञानाचा साठा प्रवाहित नसेल तर त्याचा काही उपयोग नाही. तो तसाच राहिला तर काही दिवसांनी त्याचा वास येणार.

ज्ञान प्रवाहित राहण्यासाठी, खेळते, वाहते राहण्यासाठी समानपातळीची आवश्यकता आहे. समान-पातळीमुळे ज्ञानप्रवाह ताजा, स्वच्छ व समृद्ध करणारा राहतो. ही समानपातळी निर्माण करायची असेल तर शिकवणारा व शिकणारा यांच्यातील समानतेला तडा देणारे सर्व घटक निर्दयपणे बाजूला सारायला हवेत.

विमर्षण प्रक्रियेत बऱ्याचदा वाचक सर्वसाधारण विचार-भावनेनंतर स्वतःकडेही बघू लागतो. उदाहरण

मला गणित विषय कधीच सोपा वाटला नाही. अरेच्या! कशामुळे? कारण गणिताचे शिक्षक मला कधीच आवडले नाही. समान जागा कधीच निर्माण झाली नाही. ते काय सांगायचे ते मला कधी समजले नाही आणि मी त्यांना काय विचारायचो ते त्यांना कधी कळले नाही. लेखक म्हणतो ते बरोबरच आहे. शिक्षक-विद्यार्थी एका समानपातळीवर आल्याशिवाय ज्ञानाची, विचारांची देवाण-घेवाण शक्यच नाही.

अबब! किती विमर्षण : किती विचार?

अर्थात, प्रत्येक वाचक असाच विचार करेल असे नव्हे किंवा इतका लांबवर, खोलवर विचार करेलच असे नाही. पण वाचक कसा विचार करू शकेल याचा हा एक नमुना तुमच्यापुढे ठेवला आहे. या उदाहरणामुळे विमर्षण प्रक्रियेची तुम्हाला कल्पना आली असेल.

★ विमर्षण प्रक्रियेचे घटक कोणते?

ताजमहाल या जगातील सात आश्चर्यांपैकी एक असलेले संदर्भ तुम्ही विश्वकोशात वाचता आहात असे गृहीत धरा.

''शहाजहान (१६२८-१६५३) या मोगल सम्राटाने आपली प्रिय पत्नी मुमताज महल हीच्या स्मरणार्थ तिच्या मृत्युनंतर (मृत्यू १६३१) १६३२ मध्ये ताजमहालाचे बांध काम सुरू केले. ताजमहाल आग्रा या शहराच्या दक्षिणेकडून वाहणाऱ्या यमुनेच्या तिरावर असून तो पूर्णपणे संगमरवरही आहे. त्याची उंची २४० फूट असून २०,००० कारागिर अथकपणे १२ ते १५ वर्षे काम करत होते. चंद्रप्रकाशात तर ताजमहालाचे सौंदर्य अद्‌भूत वाटते. त्याचे मनोरे, घुमट, समोरची प्रचंड बाग, रंगसंगती, कोरीव कामाची नजाकत, सारे काही मोगल वास्तुकलेचा अप्रतिम नमुना म्हणावा लागेल. ताजमहाल जगातील सात आश्चर्यांपैकी एक मानला जातो.''

ही माहिती वाचल्यानंतर तुमच्या मनात काय विचारप्रवाह सुरू झाले? सुरुवात कशी झाली? तुमच्या मनात कोणत्या गोष्टी आल्या? आपण कसा विचार करतो किंवा वाचन करताना / केल्यावर विमर्षण कसे होते याच्या नोंदी (in general) सर्वसाधारणपणे करू यात.

★ पहिल्या वाक्यापासून विचारचक्र सुरू 'पत्नीच्या स्मरणार्थ' ताजमहाल बांधला. व्वा! काय प्रेम!

★ आश्चर्य : २०,००० कारागीर! १२ ते १५ वर्षे? सुरुवातीला आपले विचारचक्र मजकूरातील माहितीभोवतीच फिरत असते.

★ ताजमहालाच्या इतर माहितीतून ताजमहालाचे चित्र डोळ्यासमोर उभे राहिले.

★ मनाचा प्रवास मनाने आपण १७ व्या शतकात जातो आणि आणखी विचार मनात येऊ लागतात. कल्पनाशक्ती अधिक सृजनशील होते.

★ शहाजहानने या बांधकामाचे व्यवस्थापन कसे केले असेल. शिवाय विटावर विटा रचण्याचे काम नव्हते. कलात्मक, जबाबदारीचे काम होते.

★ संपूर्ण ताजमहालाच्या रचनेत, कोरीव कामात, रंग देण्यात १ लक्षांश मिलिमीटरची चूक न करता काम करणारे कारागीर कोण असतील आणि ते सुद्धा विस हजार.

★ या २०,००० कारागिरांची राहण्या-खाण्याची, औषध-पाण्याची, मुलाबाळांची सोय कोठे, कशी केली असेल.

★ या बांधकामाचे डिझाईन कुणी कसे केले असेल?

★ या २०,००० कारागीरांचे रोजचे कामाचे नियोजन कोण, कसे करीत असेल?


★ कुठे गेले हे सर्व कारागीर?

★ अशा स्वरूपाचे बांधकाम देशात, जगात कोठे असेल का याचाही आपण विचार करतो, आपण जे वाचले त्यासारखे काही असेल ते शोधण्याचा आपण प्रयत्न करतो. म्हणजेच बाजूच्या परिसराचा विचार करतो.

★ या निमित्त वाचक स्वतःमध्येही डोकावून पाहतो. शहाजहानने आपल्या पत्नीसाठी ताजमहाल बांधला. मी माझ्या पत्नीसाठी काय करतो?

★ या सगळ्यांचा एकत्रित परिणाम म्हणजे आशयाचे आकलन होणे.

★ **विमर्षण प्रक्रियेचे घटक –**



आकृती ३.१ : विमर्षण प्रक्रिया

वरील सगळ्या घटकांचा एकत्रित परिणाम : आशयाचे आकलन


प्रत्येक वाचकाचे संबंधित वाचन मजकूराविषयीचे विमर्षण वरील क्रमानुसारच होईल असे नाही. किंवा वरील सगळ्याच घटकांचे प्रतिबिंब संबंधित विमर्षण प्रक्रियेत पडेल असेही नाही. कारण विमर्षण प्रक्रिया मानसिक व बौद्धिक क्षमतांशी (cognitive abilities) संबंधित असते. त्यामुळे व्यक्तिनुरूप ती वेगळी असू शकते. याशिवाय विमर्षणाचे मोजमाप किंवा मूल्यमापन करण्याचे निकष ठरविणेही कठीण आहे.

विमर्षण ही विचारप्रक्रिया असली तरी बऱ्याचदा विचार भरकटत जाऊ शकतात किंवा वाचक कल्पनेच्या जगात रममाणदेखील होऊ शकतो. तथापि विमर्षणामुळे आपली विचारशक्ती वाढते यात शंका नाही शिवाय आपण जे वाचतो त्यासंबंधीची आपली आकलनशक्तीदेखील वाढते.

विमर्षण प्रक्रियेत अनेकदा भावनांचाही सहभाग असतो हे आपण लक्षात घेतले पाहिजे. वाचनामुळे विचार निर्माण होतात त्याचप्रमाणे भावनांच्या लहरी किंवा भावनांचा कल्लोळ अथवा भावनांचे वादळही निर्माण होऊ शकते.

★ विमर्षण पैलू

विमर्षणाचे विविध पैलू पुढीलप्रमाणे दाखविता येतील.




यावरून तुमच्या हेही लक्षात आले असेल की, विमर्षण सकारात्मक तसेच नकारात्मकही असू शकते.

सकारात्मक विमर्षण (positive thinking) हे आशादायी, दिशादर्शक, रचनात्मक असते तर नकारात्मक विमर्षण (negative thinking) हे दिशाहीन, बेजबाबदार व निराशा दर्शविणारे असते.

विमर्षण ही विचारप्रक्रिया असली तरी वाचनाच्या संदर्भात या प्रक्रियेचा उगम वाचनातून होतो. या ठिकाणी वाचन उद्दीपकाचे (stimulus) काम करते व विमर्षण (comprehensive thinking) हे त्या उद्दीपकाला प्रतिक्रिया (reaction) किंवा प्रतिसाद (response) म्हणून काम करते.

(comprehensive thinking)



हा प्रतिसाद वाचनमजकूराच्या संदर्भात असतो हे लक्षात घेतले पाहिजे. विमर्षण प्रक्रियेत प्रतिसाद मूळ आशय (content) किंवा माहिती (information) यापासून दूर जाऊ शकतो, कल्पनेच्या अथवा प्रतिभेच्या जगात जाऊ शकतो हे आपण यापूर्वी पाहिले आहे. अवास्तवतेच्या स्वप्ननगरीतही वाचक रममाण होऊ शकतो. या अर्थाने विमर्षणाची मर्यादा आखणे कठीण आहे. त्याचप्रमाणे विमर्षणाच्या गुणवत्तेचे मोजमाप ठरविणेही कठीण आहे. कुठले विमर्षण योग्य, अयोग्य, चांगले, वाईट ठरविणे सोपे नाही.

तरीदेखील सकारात्मक (positive) विशिष्ट उद्देश (aim) असलेले, तर्कसंगत (logical), शास्त्रशुद्ध (scientific) आणि शिस्तबद्ध (disciplined), विमर्षण हे विषय आकलन (content comphrehension) आणि आपली समज (understanding) वाढण्यासाठी पूरक असते यात शंका नाही. या उलट नकारात्मक (negative), हेतूरहीत (aimless) तर्कविसंगत (illogical), अशास्त्रीय (unscientific) आणि बेशिस्त (indisciplined) विमर्षणातून फारसे काही निर्माण होत नाही. (without any outcome) वाचनातून निर्माण होणारे विमर्षण म्हणजे विचाराने, मनाने, भावनेने कुठेही वाहवत जायचे, काहीही तर्क करायचा किंवा भावनेने भिजून जायचे असे नाही. विमर्षण आपली आकलन शक्ती वाढविणारे असले पाहिजे, आपली बुद्धी तेजस्वी करणारे पाहिजे, आपल्या मनाची ताकद वाढविणारे व आपले व्यक्तिमत्त्व समृद्ध करणारे पाहिजे, आपले जीवन आनंददायी करणारे पाहिजे. विमर्षणामुळे आपला आत्मविश्वास सदैव वाढत राहिला पाहिजे. असे विमर्षण होण्यासाठी वाचनाचा छंद जोपासायला हवा.

★ **विमर्षणाची गुणवत्ता (**quality richness**) कशावर अवलंबून असते?**

वाचनातून होणारे विमर्षण किंवा वाचनामुळे होणारे विमर्षण वाचकाला किती फायद्याचे असू शकते किंवा नाही हे अनेक गोष्टींवर अवलंबून असते.

★ **आशय प्रकार / किंवा विषय**

विषय सोपा, कठीण, आवडता, नावडता, दैनंदिन जीवनात उपयोगी पडणारा याचा विमर्षणावर प्रभाव पडणारच. एखादा विनोदसुद्धा किती समजला यावर आपला हसण्याचा प्रतिसाद अवलंबून असतो.

★ **भाषिक काठिण्य**

मोठमोठे शब्द, लांबलचक वाक्ये, न समजणाऱ्या संकल्पना विमर्षणातील अडथळे ठरतात. भाषेचा अडसर वाटू लागला तर वाचक वाचनाला रामराम करतो. सोपे, सुटसुटीत, सहज कळणारे लेखन वाचकाचा हुरूप वाढविते.

★ **वाचकाला मिळणारा वेळ व त्याची मानसिकता**

वाचनमजुकराचा एखादा भाग किंवा तुकडा परिपूर्ण वाचण्यासाठी, समजून घेण्यासाठी आवश्यक तेवढा वेळ लागतो. तो नसेल तर वाचन अर्धवट होते. कारण वाचन ही एक घटना नाही ती एक प्रक्रिया असते. शिवाय वाचन समयी वाचकाची मानसिक किंवा भावनिक स्थिती कशी असेल यावरही विमर्षणाचे बरेच काही अवलंबून असते. कोंदट आणि अंधारलेल्या मनात कुठलेही बी उगवत नाही. त्यासाठी प्रकाश व हवेची गरज असते. विमर्षणासाठी मानसिक आरोग्य महत्त्वाचे असते.

★ **वाचकाची पार्श्वभूमी, पालनपोषण व जडणघडण**

वाचकाचे बालपण, शाळा, महाविद्यालय, घरची स्थिती, सामाजिक व सांस्कृतिक पार्श्वभूमी, विचारांची जडणघडण, भावनिक जग, आयुष्यात आलेले अनुभव, भोगलेली सुख-दुःख, भेटलेली माणसे, मिळालेले मार्गदर्शन या सर्वांवर त्याची जीवनाबद्दलची समज (maturity) अवलंबून असते. वाचक किती परिपक्व आहे, प्रगल्भ आहे. वैचारिक दृष्ट्या, भावनिक दृष्ट्या किती विकसित आहे यावर विमर्षणाची गुणवत्ता अवलंबून असते. वाचकाची जीवनदृष्टी विमर्षणाला दिशा देत असते.

★ **वाचकाचे भाषेवरील प्रभुत्त्व**

भाषेमुळे विचार, भावनांच्या अभिव्यक्तीला मर्यादा पडतात असे म्हणतात. कारण भाषा हे विचार

करण्याचे माध्यम आहे. भाषेशिवाय विचार करणे कठीण वाटते. ज्याचे भाषेवर वर्चस्व आहे तो विचारांवर नियंत्रण करू शकतो, विचारांचे आदान-प्रदान करू शकतो. जेवढी भाषेची समज जास्त तेवढी वैचारिक स्पष्टता जास्त.

महत्त्वाचे

(१) 'संदर्भ' म्हणजे विशिष्ट कारणासाठी आपल्याला हवी असलेली आवश्यक ती माहिती.

(२) अनेक गोष्टींबद्दलची अचूक, शास्त्रशुद्ध, नेमकी व आवश्यक माहितीचे भांडार ज्या ग्रंथात असते त्याला संदर्भग्रंथ म्हणतात.

(३) एखाद्या गोष्टीचा सर्वांगीण, सर्वस्पर्शी व खोलवर विचार करणे म्हणजे विमर्षण होय.

(४) वाचनाने विमर्षण होते आणि विमर्षणामुळे वाचन समृद्ध होते.

(५) विमर्षण प्रक्रियेचे घटक

- ★ वाचन सुरू होताच विमर्षण प्रक्रियेचा प्रारंभ.
- ★ सुरुवातीला विचारप्रक्रिया वाचनमजकूराशी मर्यादित.
- ★ मजकूरानुसार डोळ्यापुढे चित्र उभे राहणे.
- ★ कल्पनाशक्तीच्या आधारे विचारांचा विस्तार.
- ★ मजकूरातील माहिती व तत्वसंबंधी आपल्या परिसराची मनाने तपासणी.
- ★ मजकूराच्या माहिती संदर्भात स्वतःकडे पाहणे, स्वअनुभवाशी तुलना करणे इत्यादी.

सरावासाठी प्रश्न

(१) संदर्भग्रंथाची वैशिष्ट्ये सांगा.

(२) सर्वसाधारण वाचन व संदर्भग्रंथाचे वाचन यातील फरक स्पष्ट करा.

(३) खाली दिलेला मजकूर वाचा आणि विमर्षण प्रक्रिया कशी घडत जाते याच्या नोंदी करा.

मजकूर

''परवा त्या रिक्षेत बसण्याचा प्रसंग आला. रिक्षावाला अशी काही रिक्षा चालवत होता की मला कळतच नव्हते की, मी रिक्षात आहे की, अंतरिक्षात आहे, की माझा अंत रिक्षात आहे.''

(४) विमर्षणाच्या विविध पैलूंवर थोडक्यात लिहा.

(५) सकारात्मक व नकारात्मक विमर्षण म्हणजे काय हे उदाहरणासह स्पष्ट करा.

(६) विमर्षणाच्या संदर्भात उद्दिपक (stimulus) आणि प्रतिसाद (response) यांचा संबंध उदाहरणासह स्पष्ट करा.

(७) विमर्षणाची गुणवत्ता कोणत्या घटकांवर अवलंबून असते?

३.२.६ मजकूराचे स्वरूप

वाचनासाठी जे काही छापील किंवा लिखित स्वरूपात किंवा इलेक्ट्रानिक मीडियाच्या माध्यमातून उपलब्ध आहे ते सर्व 'वाचन-मजकूर' म्हणून म्हणता येईल. कथा, कादंबऱ्या, नाटके, कविता, शरीर स्वास्थ्यावरील पुस्तके, खाद्य पदार्थावरील पुस्तके, अभ्यासाची पुस्तके, वृत्तपत्रे, मासिके, सरकारी परिपत्रके, फेसबुक व वॉट्स्ॲपवर येणारे लिखाण, गुगल किंवा नेटवर मिळणारे लिखाण इ. सर्वांना वाचन-मजकूर म्हणता येईल.

(क) मजकूर अर्थ व स्वरूप

★ वाचन अर्थ

जे आपण वाचू शकतो तो मजकूर असे म्हटले तर या अर्थाने वाचन-मजकूर अमर्याद आहे. मित्राने पाठविलेला वॉटस्ॲपवरचा मजकूर वाचनासाठीच असतो. नव्या ठिकाणी आपण फिरतो. तेव्हा दुकानावरच्या पाट्या आपण वाचतो. वाचन दरवेळेस गंभीरच असले पाहिजे असे नाही. लहान मुलांच्या मासिकातील एखादा विनोद वाचल्यानेदेखील आनंद होतो.

विविध प्रकारचा वाचन मजकूर असतो. तो जीवनाच्या अनेक अंगांना स्पर्श करणारा असतो. मोठ्या प्रमाणात उपलब्ध वाचन मजकूर खूप मोठ्या प्रमाणात उपलब्ध असतो. खरं म्हणजे वाचन-मजकूराचा डोंगरच आपल्या समोर असतो. त्यातून आपल्याला हव्या असलेल्या मजकूराचा शोध घेऊन त्याचे वाचन करणे हे जबाबदार वाचकाला आव्हानच असते. छापील, लिखित स्वरूपाचे किंवा इलेक्ट्रॉनिक मीडियावर उपलब्ध असलेले सर्वकाही 'वाचन-साहित्यच' असते. हे वाचन साहित्य विविध प्रकारचे असले तरी त्याची विभागणी करता येऊ शकते. ज्यामुळे ते समजून घेणे सुलभ होते.

ज्या मजकूराकडे आपण कलावृत्ती म्हणून बघतो ते साहित्य यात कथा, कादंबऱ्या, नाटके, कविता, चरित्रे, आत्मचरित्रे, प्रवास वर्णने इत्यादीचा समावेश होतो. शिल्पकला, चित्रकला, नृत्यकला, संगीत व साहित्य या अभिजात कला आहेत. साहित्य अनुभवातून निर्माण होते व त्याला प्रतिभेचा परिसस्पर्श झालेला असतो.

वाचन-मजकूराच्या प्रकारानुसार वाचन प्रक्रियेतदेखील मोठा फरक दिसतो. उदा. एखादी कथा किंवा कविता वाचणे वेगळे आणि वृत्तपत्रातील बातमी वाचणे वेगळे.

साहित्य आपल्या वाचन मजकूराचा एक मोठा भाग आहे. साहित्य आपल्याला विचार करायला लावते, आपल्या भावनांचा ठाव घेते, स्फूर्ती देते आणि आपले जीवन समृद्ध करते. साहित्याचे वाचन हा आनंददायी अनुभव असतो.

साहित्यिक वाचन-मजकूराबद्दल अजून बरेच काही सांगता येईल पण तूर्तास येवढे पुरे.


धार्मिक साहित्याचा घाट वेगळा असला तरी त्यालाही वाङ्मयीन मूल्य असते. तुकारामाचे अभंग, एकनाथांचे भारुड, रामायण, महाभारतासारखे ग्रंथ यांना साहित्यिक मूल्य आहेच. अध्यात्म, तत्त्वज्ञान या संबंधीचे ग्रंथ गंभीर असू शकतात आणि त्या मजकूराचे वाचन हा वेगळा अनुभव असतो. गीता, ज्ञानेश्वरी याला अभिजात साहित्य म्हणता येईल. पोथी, पुराणे, वेद यांचे वाचन करणारी भरपूर माणसे आपण पाहतो.

दैनंदिन जीवनात आपण अनेक प्रकारचा मजकूर वाचत असतो. उदा. वृत्तपत्र, त्यातील बातम्या, जाहिराती, लेख, संपादकीय इत्यादी. काही वेळा आपण प्रासंगिक वाचन करतो. उदा. औषध विकत घेतले तर त्यासंबंधीचे बाटलीच्या पॅकमध्ये येणारे माहितीपत्र, विविध निमंत्रण पत्रिका, वॉशिंग मशीन किंवा मिक्सर घेतला तर त्याबद्दलची माहिती, सोशल मीडियावरचे लिखाण, संबंधितांनी पाठवलेले पत्र किंवा चिठ्ठी इत्यादी

याशिवाय विज्ञान-साहित्य, नवनवे शोधाबद्दल, सामाजिक उपक्रमात, संस्था इ. संदर्भातही बराच वाचन-मजकूर उपलब्ध असतो. तसेच संदर्भग्रंथ, घरचा डॉक्टर, योग आणि सूर्यनमस्कार, समाधानी जीवनाचा मंत्र, खाद्य पदार्थ, भटकंतीला कोठे जावे अशा असंख्य गोष्टीसंबंधी मजकूर उपलब्ध असतो.

★ वाचन साहित्य

वाचन-साहित्याची (reading materials) मांडणी पुढील प्रमाणे करता येईल.



लक्षात ठेवा

वाचनासाठी जे उपलब्ध आहे व जे आपण वाचू शकतो त्या सर्व मजकूराला वाचन-साहित्य म्हणता येईल. वाचन-साहित्य विविध प्रकारचे व विविध अंगी असते. आपल्याला हव्या असलेल्या वाचन मजकूराची निवड या वाचन-साहित्यातून आपण करतो.

वरील चर्चेवरून 'वाचन-साहित्य' आणि 'वाचन-मजकूर' या दोन संकल्पना एकमेकांशी संबंधित असल्या तरी त्या वेगळ्या आहेत हे तुमच्या लक्षात आले असेल. कथासंग्रह हे वाचन-साहित्य आहे. त्यातील प्रत्येक कथेचा मजकूर वेगळा असतो. मोबाईलवर येणारे सर्व लेखन एका वर्गात टाकता येईल. उदाहरण 'वॉटस्ॲप साहित्य' (लेखन) पण त्यातीलही प्रत्येक मजकूर वेगळा असतो. उदा. वॉशिंग मशीन बद्दल माहिती देणारे व कंप्युटरबद्दल माहिती देणारे साहित्य एकाच प्रकारचे म्हणता येईल व त्याचे 'माहितीपर साहित्य' असे वर्गीकरण करता येईल. तथापि यातील प्रत्येकाचा मजकूर वेगळा असेल. त्याची मांडणी वेगळी असेल. भाषा वेगळी असेल. म्हणजेच आपण जे काही वाचायला घेतो किंवा वाचतो त्याचे स्वरूप वेगळे असते. पंडित जवाहरलाल नेहरूंनी इंदिरा गांधींना लिहिले त्या पत्रांचे एक पुस्तक असले तरी त्यातील प्रत्येक पत्राचा मजकूर वेगळा असणार. सर्व पत्रांमध्ये एक समान वैचारिक किंवा भावनिक धागा असला तरी आशयाच्या दृष्टीने प्रत्येक पत्र वेगळे म्हणता येते. वेगळेपणानुसार मजकूराचे स्वरूप ठरवता येऊ शकते.

कुठल्याही मजकूराचे स्वरूप त्यातील आशयावर अवलंबून असते. 'कब्बड्डी कशी खेळावी' आणि 'मी जिंकणारच' या दोन्ही विषयांच्या मजकूराची मांडणी वेगळी असणार त्यातील भाषा, उदाहरणे, स्पष्टीकरणे इत्यादी सर्व भिन्न असणार कारण त्यांचा आशय भिन्न आहे. पोथीमधील मजकूर वेगळा आणि नाशिकमधील मंदिरांची माहिती देणारा मजकूर वेगळा.

मजकूर आणि त्याचा आशय वेगळा करता येणे कठीण असते. आशय किंवा लिखाणाचा हेतू मजकूराचे स्वरूप ठरवतो तर मजकूराच्या मांडणीतून विषयाची उकल होते. मजकूराची मांडणी योग्य नसेल, आशयाला साजेशी नसेल तर आशय स्पष्ट होत नाही. आशयाला न्याय मिळत नाही. आशय भरभक्कम नसेल तर त्याची मांडणी कितीही चांगली केली तरी तो मजकूर वाचनीय होणार नाही. मजकूराचे स्वरूप आणि त्यातील आशय

यांचा संबंध महत्त्वाचा असतो आणि तो समजाऊन घेणे वाचकाच्या हिताचे असते. मजकूराचे स्वरूप व आशयाचे स्वरूप यांचा विचार करण्याची सवय लागली तर आपल्या वाचन कौशल्याची क्षमता (competence) निश्चितच वाढू शकते.

तथापि आशयानुसार मजकूराचे स्वरूप ठरविणे वाटते तितके सोपे नाही. 'आई' या विषयावर मराठीमध्ये बरेच लेखन झालेले आहे. विषय एकच असला तरी प्रत्येक मजकूराची मांडणी वेगळी आहे. 'यशस्वी होण्याचे मार्ग', 'आनंदी जीवनाचे रहस्य', 'आनंदाच्या शोधात' या व अशा पुस्तकांच्या आशयात साम्य असले तरी त्यासंबंधीचा मजकूर वेगवेगळाच असणार यात शंका नाही. तरीही ढोबळमानाने मजकूराच्या स्वरूपाचे वर्गीकरण करता येईल. उदा. मजकूराचे स्वरूप वर्णनात्मक, विश्लेषणात्मक किंवा स्पष्टीकरणात्मक असू शकते. काही मजकूराचे स्वरूप तात्कालिक असते तर काही मजकूर चिंतनात्मक असतो.

लक्षात ठेवा

- ★ मजकूराचे स्वरूप व त्यातील आशय हे एकमेकांपासून वेगळे करता येत नाही त्यांच्यात असणारा संबंध महत्त्वाचा असतो.
- ★ आशयानुसार मजकूराचे स्वरूप ठरते आणि मजकूराच्या मांडणीतून आशय स्पष्ट होत जातो.
- ★ मजकूराची मांडणी आशयाला साजेशी नसेल तर आशयाला स्पष्टता येणार नाही. या उलट आशय सशक्त नसेल तर मांडणीची सजावट कितीही केली तरी मजकूराला वजन येत नाही.
- ★ वाचन कौशल्याची क्षमता वाढविण्यासाठी मजकूराचे स्वरूप व आशयाचे स्वरूप यांचा विचार करण्याची सवय जोपासायला हवी.
- ★ वेगवेगळ्या आशयाप्रमाणे मजकूराचे स्वरूप वेगळे असतेच पण काही वेळा आशय एकच असतो तरी त्यासंबंधीच्या मजकूराचे स्वरूप वेगवेगळे असते.

(ख) वर्णनात्मक विरूद्ध स्पष्टीकरणात्मकतेचे स्वरूप

★ वर्णनात्मक मजकूर

वर्णनात्मक मजकूरात एखाद्या गोष्टीचे वर्णन केलेले असते. एखादी व्यक्ती कशी दिसते. तिची शरीर यष्टी, चेहऱ्यावरचे हावभाव, बोलण्या-चालण्याची ढब इत्यादीचे वर्णन असते. एखाद्या मंदिराचे वर्णन असेल तर त्यात त्याचे खांब, त्यावरील कोरीव काम, मंदिराचा कळस व त्यावरील नक्षी, आजूबाजूचा परिसर, शांतता, पावित्र्य, गाभाऱ्यातील मूर्ती, येणारे जाणारे भक्त इत्यादी बद्दल वर्णन असू शकते. सहलीला म्हणून जाता येईल अशा एखाद्या निसर्गरम्य ठिकाणाच्या वर्णनात भोवतालची वृक्षराजी, पशूपक्षी, पाण्याचे प्रवाह, आपल्याला वाटणारी प्रसन्नता, डोंगर, टेकड्या, वळणे घेत जाणारे रस्ते, एखादी दुसरी, झोपडी इत्यादी चे वर्णन असू शकते. रस्त्याचे, पक्षाचे, पाणवट्याचे, बस स्टँडचे, रेल्वे प्लॅटफार्मचे, गुंड किंवा सज्जन व्यक्तीचे, बागेचे अशा असंख्य गोष्टींचे वर्णन आपण करू शकतो. काही लेखक इतक्या बारकाईने वर्णन करतात की ज्याचे वर्णन ते करतात ती गोष्ट किंवा प्रसंग वाचकाच्या डोळ्यासमोर हुबेहुब येतो. प्रसिद्ध लेखक वि. स. खांडेकर त्यांच्या कथा कादंबऱ्यातून वर्णनात्मक लिखाणासाठी निष्णात होते. जिवंत वर्णनामुळे आणि नेमक्या शब्द निवडीमुळे त्यांच्या कथा-कादंबऱ्या, निबंध अत्यंत वाचणीय होतात. आता गुजरातमधील कच्छच्या वाळवंटातील (the run of kuch) 'व्हाईटडेझर्ट' (पांढरे वाळवंट) चे वर्णन वाचा.

''गुजरातमधील 'व्हाईटडेझर्ट' म्हणजे मिठाचे वाळवंट हे एक निसर्गनिर्मित मोठे आश्यर्च आहे. ऑक्टोबर ते फेब्रुवारी या हिवाळ्याच्या ऋतूत व्हाईटडेझर्टला भेट देणे म्हणजे एक अवर्णनीय अनुभव असतो. व्हाईट डेझर्ट म्हणजे मैलोमैल, नजरेला पुरेल तोपर्यंत सर्वत्र पांढरे स्वच्छ मीठ! वरती निळे आकाश आणि खाली चहूबाजूने पांढरे मीठ, अफाट नीळा रंग आणि अफाट पांढरा रंग यांच्या छाया-प्रकाशांची विविध रूप पाहणे तितकच

अफाट आनंददायी असते. व्हाईट रेझर्टमधील सूर्योदय तर बघायलाच हवा. भल्या पहाटेच कडाक्याच्या थंडीतदेखील पर्यटक तरुण, वयस्कर, लहान मुले, स्त्रिया असे सर्व प्रकारचे लोक येतात आणि सूर्योदयाची वाट पहात मीठाच्या पांढऱ्या स्वच्छ चादरीवर ठाण मांडून बसलेले असतात. म्हणजेच पूर्वेला पांढऱ्या समुद्रातून एक तांबूस छटा दिसू लागते आणि हळूहळू ती छटा पसरू लागते. सर्वांची उत्सुकता शिगेला पोहचते. सर्वत्र शांतताच शांतता असते. शुभ्र धवल पूर्वेतून जेव्हा सोन्याचा गोळा झेपावतो तेव्हा सर्वांच्या तोंडून एकच शब्द बाहेर पडतो 'व्वा! क्या बात है।' सोनेरी किरणे जेव्हा मीठाच्या पांढऱ्या पृष्ठभागावर पसरतात त्यावेळी वाटते की नीयतीने सोन्याचा महाहंडा पृथ्वीवर ओतलाय आणि खांब नसलेल्या प्रचंड सोनेरी महालात आपण बसलो आहोत. सूर्य मावळण्याचे दृष्टयही असेच मंतरलेले असते. व्हाईट डेझर्टमध्ये पौर्णिमेच्या दिवशी जाणे हा मंत्रमुग्ध करणारा अनुभव असतो तो शब्दात मांडणे केवळ अशक्य आहे. आकाशभर पौर्णिमेच्या चांदण्या आणि खाली मिठाच्या पांढऱ्या रेशमी वस्त्रावर पसरलेली चंद्राची शीतलता आहा! असे वाटते निसर्गाइतके सुंदर दुसरे काय असू शकते?''

कृती

(१) 'व्हाईट डेझर्ट' च्या या वर्णनात्मक मजकूराचा अभ्यास करा, त्यासाठी पुढील गोष्टी लक्षात घ्या.

- ★ वर्णन करण्यासाठीची शब्द योजना.
- ★ उपमा व अतिशयोक्तीचा कोठे वापर केला आहे काय?
- ★ लेखक आपल्या भावना कशा व्यक्त करतो?
- ★ 'पूर्वेला पांढऱ्या समुद्रातून एक तांबूस छटा दिसू लागते', 'नियतीने सोन्याचा महारंग पृथ्वीवर ओतल्यास आणि आपण खांब नसलेल्या प्रचंड सोनेरी महालात बसलो आहोत असे वाटते' या वाक्यातून लेखक कशाचे वर्णन करतो?
- ★ 'असे वाटते निसर्गाइतके सुंदर दुसरे काय असू शकते?' यातून लेखकाला काय सांगायचे आहे?

(२) पुढील पैकी एकावर वर्णनात्मक १५-२० ओळी लिहा.

- ★ वडाचे किंवा पिंपळाचे झाड
- ★ वादळवारा व विजेच्या कडकडांसह धो धो पडणारा पाऊस
- ★ भिकारी
- ★ मी पाहिलेला अपघात
- ★ बसस्टँड

(३) वृत्तपत्रे, मासिके, विविध पुस्तके यातून तुमच्या वाचनात येणाऱ्या वर्णनात्मक मजकूराच्या उताऱ्याचे झेरॉक्स करून त्यांचा संग्रह करा.

(४) ज्यांचे वर्णन करता येईल अशा विषयांची यादी खाली दिली आहे. तुम्हाला सुचणाऱ्या विषयांचा या यादीत समावेश करा व सर्व मिळून जास्तीत जास्त किती विषय होऊ शकतात ते पाहा.

रेल्वेचा डबा, मळ्यातले जेवण, बसचा प्रवास, माझ्या गावचा आठवडी बाजार, बगीचा, चौफुली, देवीचे मंदिर, आमची कॉलनी, नदी काठी, नदीला आलेला पूर, दोन दुचाकी स्वारांचे भांडण, कायम स्मरणात राहील असा अनुभव. संध्याकाळी दिसणारे डोंगर, लग्न सोहळा, क्रिकेट मॅच, ग्रंथालय, चांभार, बेकरी, हमाल, पारितोषिक वितरण समारंभ, माझी शाळा, पोष्ट ऑफिस, उन्हाळ्यातील नदी, मृत्युशी झुंजणारा ऋग्ण, डॉक्टर, लहान बाळ, कुत्रा, मोर, मंगळसूत्र, गाण्याचा कार्यक्रम, नृत्याचा कार्यक्रम, उसाचा रस विक्रेता, आंब्यांनी बहरलेले झाड, समुद्राच्या लाटा .....

वरील सर्व विषयांचे पुढील प्रमुख विषयांमध्ये वर्गीकरण करा.

★ व्यक्तीचे वर्णन

★ प्रसंगांचे किंवा घटनांचे वर्णन

★ निसर्गाचे वर्णन

★ स्थळांचे वर्णन

★ वास्तूचे वर्णन

★ पशुपक्ष्यांचे वर्णन

लक्षात ठेवा

आपल्याला भेटलेल्या व्यक्तीचे, पाहिलेल्या स्थळाचे, पशू पक्ष्यांचे, अनुभवलेल्या प्रसंगाचे किंवा घडलेल्या घटनेचे एखादी वास्तू किंवा निसर्गसौंदर्याचे शब्दात हुबेहुब जिवंत चित्र ज्यात रेखाटलेले असते त्याला वर्णनात्मक मजकूर म्हणतात.

वर्णनात्मक मजकूरात आपल्याला लेखकाची निरीक्षणशक्ती लक्षात येते. बाह्यात्कारी सूक्ष्म निरीक्षणा व्यतिरिक्त लेखकाच्या मनातील भावतरंगही आपल्याला भारावून टाकतात.

या ठिकाणी एक गोष्ट तुम्ही लक्षात घ्यायला हवी. ती म्हणजे लेखकाच्या कळत न कळतचा सहभाग मजकूरात असल्याशिवाय केलेले वर्णन निरस होईल. वर्णनात्मक मजकूर नेहमी कुठल्यातरी मजकूराचा भाग असतो. उदाहरणार्थ एखाद्या गुंडाचे किंवा सज्जन माणसाचे बोलण्या-चालण्याचे वर्णन संबंधित गोष्टीचा, कथेचा अथवा प्रवास अनुभवाचा भाग असतो. अगदी वर्तमानपत्रातील मिळकतीच्या नोटीसमधील मिळकतीचे वर्णन देखील नोटीस मजकूराचा अत्यंत महत्त्वाचा भाग असतो.

कुठल्याही शब्दचित्राला संबंधित विषयाचा किंवा आशयाचा संदर्भ असतोच. त्याशिवाय ते वर्णन अर्थपूर्ण होऊ शकत नाही. अपघाताचे वृत्तपत्रातील वर्णन वाचतांना अपघात कोठे झाला? कुणाला गंभीर दुखापत झाली? अपघातग्रस्त गाड्या कुठल्या होत्या? कोण ड्रायव्हर होते? कोठे चालले होते? इत्यादी माहिती आपल्याला महत्त्वाची वाटते. कारण त्याशिवाय नुसते वर्णन वाचण्यात आपल्याला फारसा रस वाटणार नाही. वर्णनात्मक मजकूरात छोट्या-मोठ्या प्रमाणात वाचकाचा भावनिक सहभाग असणे अगदी साहजिक आहे.

वर्णनात्मक मजकूर जेवढा व्यक्तीनिष्ठ तेवढा तो परिणामकारक होतो कारण व्यक्तीनिष्ठतेमुळे वर्णन वाचकाच्या हृदयाला भिडते. वर्णनात्मक मजकूरात लेखकाचे निरीक्षण, दृष्टिकोन किंवा अभिप्राय, प्रतिक्रिया मजकूराला एक नवीन दिशा देते.

★ स्पष्टीकरणात्मक मजकूर

स्पष्टीकरणात्मक मजकूरात एखाद्या गोष्टीचे किंवा संकल्पनेचे स्पष्टीकरण केलेले असते. स्पष्टीकरणाचा उद्देश्य मजकूरातील मूळ विषय वाचकाला कळावा हा असतो. उदाहरणार्थ, पुढील श्लोक समजण्यासाठी स्पष्टीकरणाची गरज लागेल.

सर्वेऽत्र सुखिनः सन्तु सेर्व सन्तु निरामयः।
'सारे सुखी असोत, सारे निरोगी असतो.'

'सर्व जण सुखी असोत, निरोगी असोत म्हणजे काय?' या वाक्याचेही बरेच स्पष्टीकरण देता येईल. सुख म्हणजे काय? पद, प्रसिद्धी की पैसा? की यापैकी काहीच नाही? जे आपल्याकडे नाही त्याचा विचार करणे

ते मिळविण्यासाठी प्रयत्न करणे म्हणजे सुखाचा शोध घेणे म्हणजेच जे या क्षणास माझ्याकडे आहे, मला मिळाले आहे त्याचा आनंद घेणे?

वरीलप्रमाणे आणखी सविस्तर वैचारिक स्पष्टीकरण देता येईल.

अस्तित्त्वात असलेल्या एखाद्या सत्य गोष्टीसंबंधी स्पष्टीकरण असू सकते. उदाहरणार्थ, पुढील एक कटू किंवा अप्रिय सामाजिक सत्य समजून घेण्यासाठी आणखी स्पष्टीकरणाची गरज वाटू शकेल.

उदाहरणार्थ,

★ ''भारतामध्ये सहा हजाराहून अधिक जाती सरकारी नोंदीत आढळून येतात. या सहा हजार जातीतील प्रत्येक जातीत सरासरी १५ ते २० पोटजाती आढळून येतात. माणसाचे एवढ्या प्रचंड प्रमाणात विभाजन दुसऱ्या कोणत्याही देशात झालेले नाही. जगामध्ये एकतरी वंशवाद, रंगभेद, धर्मद्वेष अशा समस्या पहायला मिळतात. पण भारतासारखी जाती व्यवस्था जगात कोठेही आढळून येत नाही. या जातीव्यवस्थेची पाळेमुळे इतकी घट्ट आहेत की, समाजामध्ये अनेक स्थित्यंतरे झाली, हजारो वर्षांचा काळ लोटला तरी ती टिकून आहे.'' आंतरजातीय विवाहातून जाती अंताकडे गिरीश, फोंडे, लोकमत १३ मे २०१८.

या स्पष्टीकरणात भारत व इतर देशांची तुलना करून जाती व्यवस्थेची भयानकता स्पष्ट केली आहे.

★ विज्ञान मजकूराच्या बाबतीत तर स्पष्टीकरण अत्यावश्यक असतेच. पुढील उतारा वाचा.

''सूर्याचा आकार खूपच मोठा आहे. पृथ्वीच्या आकाराच्या तुलनेने पाहिले तर सुमारे १०९ पृथ्वी एका रांगेत सरळ रेषेत ठेवल्या, तर जेवढे अंतर होईल, तेवढा सूर्याचा व्यास आहे. हा १३ लाख ९१ हजार चारशे किलोमीटर एवढा होतो. एवढ्या व्यासाच्या आकाराचा लाडूसारखा गोळा म्हणजे सूर्य. तुम्ही बुंदीचा लाडू पाहिला आहे? आपली पृथ्वी म्हणजे एक बुंदी समजा. अशा एकूण दहा लाख बुंदीचा लाडू तयार केला तर? तसा दहा लाख पृथ्वीचा लाडू म्हणजे आपला सूर्य आहे!''

सूर्याची वादळवाट आनंद घैसास, सकाळ सप्तरंग १३ मे १८

सूर्याचा अवाढव्य आकार लक्षात येण्यासाठी लेखकाने दैनंदिन जीवनातील बुंदीच्या लाडूचे उदाहरण देऊन सर्वसामान्यांना कळेल असे स्पष्टीकरण केले आहे. बुंदीच्या उदाहरणामुळे सूर्याच्या आकाराची कल्पना स्पष्ट होते.

★ न समजणाऱ्या किंवा गोंधळात टाकणाऱ्या एखाद्या गोष्टीबद्दल स्वतःलाच प्रश्न विचारून त्या गोष्टीबाबत स्पष्टता आणता येते. उदाहरण.

ताणतणावांच्या उगमस्थानाचा शोध घेणे काही वेळा कठीण होऊन बसते मन अशांत असते. अस्वस्थतः वाढत असते पण हे सगळे कशामुळे होते हे लक्षात येत नाही. अशा वेळेस डॉ. विद्याधर बापट सांगतात : ''प्रथम मन शांत करून... आपल्या स्वतःला काही प्रश्न विचारता येतील....

★ मी नेमका कशामुळे अस्वस्थ आहे?

★ अस्वस्थतेमुळे मला शारीरिक आणि मानसिक काय त्रास होतो आहे?

★ कुठले नकारात्मक विचार मला त्रास देत आहेत?

★ ज्या गोष्टीमुळे मला ताण येतो त्याच्याकडे मला सकारात्मक दृष्टीने पाहता येईल का?

★ परिस्थिती सतत बदलत असते. ती बदलण्यासाठी आणि मला अनुकूल होण्यासाठी मी काय करु शकते?''

थोडं लाइटली घ्या! डॉ. विद्याधर बापट सकाळ

वरील प्रश्नांना उत्तरे शोधण्याचा प्रयत्न केल्यास आपली समस्या आपल्याला स्पष्ट होऊ लागते आणि ती सुटण्यालाही मदत होऊ शकते.

★ बऱ्याचदा आकडेवारी किंवा तत्सम माहिती देऊनही एखादा मुद्दा अधिक स्पष्ट करता येतो.

मणक्यांचा आजार हल्ली अनेक तरुण मंडळींनाही असतो. डॉ. जयदेव पंचवाघ म्हणतात की, या आजाराचे मूळ हे ''डिस्क'' च्या समस्येने असते. यासाठी दोन मणक्यामधल्या डिस्कचा दाब कसा बदलतो हे बघणे महत्त्वाचे आहे.

''कंबरेच्या मणक्याची डिस्कमधला दाब पुढीलप्रमाणे असतो असे संशोधन आहे.''

★ उताणा झोपलेल्या अवस्थेत (कापसाच्या घट्ट गादीवर) – २५ कि. ग्रॅ.

★ एका कुशीवर झोपल्यास ७५ कि. ग्रॅ.

★ सरळ उभे राहिल्यास १०० कि. ग्रॅ.

★ उभे राहून पुढे वाकल्यास १५० कि. ग्रॅ.

★ उभे राहिले असताना पुढे वाकून जाड वस्तू उचलताना २२५ कि. ग्रॅ.

★ मागे टेकून सरळ पाठ ठेवून बसल्यास १५० कि. ग्रॅ.

★ बसलेल्या अवस्थेत पुढे वाकून जड वस्तू उचलताना २७५ कि. ग्रॅ.

यावरून स्पष्ट दिसते की, बसलेल्या स्थितीत डिस्कमधला दाब सर्वाधिक असतो. पाठीत पोक काढून बसल्यास तर तो फारच वाढतो. खूप वेळ कम्प्यूटरवर काम करणाऱ्या व्यक्तीकडे बघितले तर तुमच्या लक्षात येईल की, संपूर्ण पाठीला नकळत पोक आलेला असतो. मान पुढे वाकलेली असते व कंबर मागे या स्थितीतच डिस्कचा दाब खूप वाढलेला असतो.

मणक्याचा स्पाँडिलेसिस डिस्कमधील दाब

डॉ. जयदेव पंचवाघ फॅमिली डॉक्टर ११ मे २०१८

निरनिराळ्या अवस्थेतील कंबरेच्या मणक्यातील डिस्कमधल्या दाबाची आकडेवारी दिल्याने कंबरेचा आजार आणि डिस्कची समस्या आपल्याला स्पष्टपणे लक्षात येते. ही आकडेवारी नसताना कंबरेच्या आजाराचा आणि मणक्यातील डिस्कचा दाबाचा संबंध आपल्या लक्षात येणे कठीण आहे. डिस्कमधील दाबाच्या माहितीमुळे या आजाराबद्दल आपल्या मनात स्वच्छ प्रकाश पडतो.

अनेकदा आकृती (diagram) आलेख, नकाशा किंवा चित्र यांच्याद्वारे स्पष्टीकरण चांगल्या प्रकारे करता येते.

लक्षात ठेवा

स्पष्टीकरणात्मक मजकूरामधील कठीण वाटणारा मुद्दा वाचकांना कळावा यासाठी स्पष्टीकरण देताना लेखक पुढील पूरक गोष्टींचा जाणीवपूर्वक उपयोग करतात असे दिसून येते.

(अ) एकच गोष्ट दुसऱ्या शब्दात सोपी करून सांगणे.

(ब) दोन समान किंवा सारख्या गोष्टींची तुलना करणे.

(क) दैनंदिन जीवनातील पटकन् समजतील अशी उदाहरणे देणे.

(ड) संबंधित समस्या किंवा संकल्पनेसंबंधी प्रश्न विचारणे.

(इ) आकडेवारी किंवा अधिक माहिती देणे.

(फ) आकृती, आलेख, नकाशा किंवा चित्र काढून स्पष्टीकरण करणे.

★ वर्णनात्मक व स्पष्टीकरणात्मक मजकूरातील फरक

वर्णनात्मक मजकूर व्यक्तीनिष्ठ (subjective) असतो व त्यात वाचकाच्या भाव-भावनांचा कळत नकळत सहभाग (direct or indirect emotional involvement) असतो. त्याचा विचार आपण यापूर्वीही केला आहे.

स्पष्टीकरणात्मक मजकूरात त्या तुलनेने भावनिक भाग कमी असतो. एखाद्या गोष्टीचे वर्णन वाचताना वाचक भावनाप्रधान होऊ शकतो पण स्पष्टीकरणात्मक मजकूर वाचताना तसे होईलच असे नाही कारण स्पष्टीकरण सर्वसाधारणपणे पुढील बाबतीत असू शकते.

★ एखाद्या नियमाचे स्पष्टीकरण. उदा. 'या नोकरीत तुम्हाला वर्षाकाठी १२ दिवसांची किरकोळ रजा मिळेल पण या रजेवर हक्क सांगता येणार नाही.'

★ एखाद्या शास्त्रीय घटनेचे स्पष्टीकरण. उदा. 'दिवस व रात्र कशी होतात?'

★ एखाद्या संकल्पनेचे स्पष्टीकरण. उदा. 'कुपोषण' म्हणजे काय?' ''एक शिक्षकी शाळा याचा अर्थ काय?'' 'रक्ताभिसरण कसे होते?'

संकल्पना हवा वैज्ञानिक, सामाजिक, शैक्षणिक, सांस्कृतिक किंवा ऐतिहासिकही असू शकतात.

★ एखादा मुद्दा पटवून देण्यासाठी स्पष्टीकरण. उदा. 'व्याकरण न शिकता भाषा शिकता येतेच!'

★ 'एखादे यंत्र कसे चालते व त्याची कशी काळजी घ्यावी' याबद्दलचे स्पष्टीकरण. उदा. पोळी करण्याचे यंत्र कसे कार्य करते व ते कसे वापरावे याचे आकृत्या, चित्रांसह स्पष्टीकरण.

★ एखाद्या ठिकाणी कसे पोहोचाल याचे स्पष्टीकरण. उदा. 'त्र्यंबकेश्वर (नाशिक) जवळील सापगाव येथील दुगारवाडीचा अप्रतिम धबधबा पाहण्यासाठी कसे जाल याबद्दलची माहिती वजा स्पष्टीकरण'.

★ एखादा मुद्दा पटवून सांगण्यासाठी दिलले स्पष्टीकरण. उदा. 'गप्पा मारणे ही एक मानसिक गरज आहे' हे पटवून देण्यासाठी स्पष्टीकरण देणे.

★ एखादी गोष्ट चूक की बरोबर या संबंधीचे स्पष्टीकरण उदाहरण 'मी नोकरी न करण्याचा घेतलेला निर्णय कसा बरोबर आहे याचे स्पष्टीकरण मी देऊ शकतो.'

किंवा 'रजेचा अर्ज न देता मी रजेवर राहिलो याबद्दलचे लेखी स्पष्टीकरण मी देत आहे.'

स्पष्टीकरणात्मक मजकूर असणाऱ्या अशा आणखी अनेक गोष्टी सांगता येतील. त्या त्या संदर्भानुसार 'स्पष्टीकरण देणे' चा अर्थ समजावून घ्यावा लागेल.

स्पष्टीकरणातील अर्थछटा

'स्पष्टीकरण देणे किंवा एखादी गोष्ट स्पष्ट करणे' (to explain) याच्या अर्थछटा पुढीलप्रमाणे असू शकतात.

★ एखादी गोष्ट स्पष्ट करून सांगणे किंवा ती समजायला सोपी करणे, विशद करणे, खुलासा करणे, समजावून सांगणे.

- प्रवेश परीक्षेचा फॉर्म कसा भरायचा हे त्यांनी स्पष्ट केले.
- मला या ओळींचा अर्थ समजत नाही हे तुम्ही जरा स्पष्ट करून सांगाल का?

★ एखाद्या गोष्टीसाठी कारण देणे. हे आपण वरती बघितलेच आहे.

- तुमची ऑर्डर वेळेवर का पूर्ण होऊ शकली नाही याचे स्पष्टीकरण विक्रेत्याने ग्राहकाला दिले.

★ आरोपाला उत्तर देणे, खुलासा करणे.

- काल दिनांक १०.६.१८ रोजी तुम्ही ऑफिसला वेळेवर आला नाही त्यामुळे ऑफिस कामाचा खोळंबा झाला. आपल्या या हलगर्जीपणाचे ताबडतोब लेखी स्पष्टीकरण द्या.

कृती

खालील वाक्यांचा अभ्यास करा.

(१) सर्वप्रथम या खेळाचे नियम मी तुम्हाला स्पष्ट करून सांगतो.

(२) माझी नेमकी काय अडचण होती हे तुम्हाला स्पष्ट करून सांगणे कठीण आहे.

(३) महाराष्ट्रातील ऐतिहासिक स्थळांबद्दल आवश्यक ते सर्व स्पष्टीकरण या पुस्तकात दिले आहे.

(४) हा अपघात कसा घडला याचे सविस्तर स्पष्टीकरण एका प्रत्यक्षदर्शीने दिले आहे.

(५) तिने काही गोष्टी स्पष्ट करण्याचा प्रयत्न केला पण तो ऐकण्याच्या मनःस्थितीत नव्हता.

(६) त्यावेळी तू मला फोन का केला नाहीत हे तुझ्या बोलण्यातून स्पष्ट होत नाही.

(७) विश्वाची निर्मिती कशी झाली याबद्दलचे शास्त्रशुद्ध स्पष्टीकरण देता येईल का?

(८) नोटाबंदीची गरज काय याचे स्पष्टीकरण अर्थतज्ज्ञच देऊ शकेल.

(९) मॅच अचानक का थांबवली याचे स्पष्टीकरण कुणालाही पटणारे नव्हते.

(१०) त्यांच्या गैरहजेरीबद्दल तो समाधानकारक स्पष्टीकरण देऊ शकला नाही.

(११) अधिक स्पष्टीकरणासाठी लेखाच्या शेवटी टीपा दिल्या आहेत त्या पाहाव्यात.

या वाक्यात तुम्हाला जाणवलेल्या छटा पुढील जागेत नोंदवा.

वरील सर्व चर्चेवरून आणि उदाहरणावरून तुमच्या लक्षात आले असेल की, स्पष्टीकरणात्मक मजकूर वस्तुनिष्ठ (objective) असतो व्यक्तिगत भावनांना त्यात फारसा वाव नसतो. स्पष्टीकरणात्मक मजकूरात तटस्थपणा (impartiality) असणे अपेक्षित असते. दिलेली कारणे किंवा केलेली कारणमिमांसा पटणारी असावी लागते. शिवाय मजकूराची मांडणीदेखील काळजीपूर्वक करावी लागते. स्पष्टीकरणात्मक मजकूरात नेमकेपणा असल्याने शब्दही मोजून मापून वापरलेले असतात. त्यात भावनेपेक्षा त्यातील तर्कसंगतपणा त्यानुसार केलेली मांडणी, मन आणि दृष्टिकोनाला जास्त महत्त्व असते.

या सर्व गोष्टींचा एकत्रित परिणाम म्हणजे 'स्पष्टीकरणात्मक मजकूर' होय. हा मजकूर सहज म्हणून (casually) वाचणे बऱ्याच वेळा शक्य नसते. तो मजकूर काहींसा गंभीरपणे (seriously) किंवा काळजीपूर्वकच (carefully) वाचावा लागतो.

वर्णनात्मक मजकूर व स्पष्टीकरणात्मक मजकूर यातील फरक पुढीलप्रमाणे सांगता येईल.

वर्णनात्मक मजकूर	*स्पष्टीकरणात्मक मजकूर*
१. एखाद्या व्यक्तीचे किंवा गोष्टीचे अथवा एखादी गोष्ट कशी घडली त्याचे शब्दात वर्णन	१. एखाद्या गोष्टीचे, संकल्पनेचे किंवा एखादी गोष्ट अशी का घडली या बद्दल खुलासा करणे, समजावून सांगणे, आरोपाला उत्तर देणे, मुद्दा समजावून सांगणे, स्पष्टीकरण देणे.
२. वर्णनविषय विविध प्रकारचे : गावातला चौक, रेल्वे प्लॅटफार्म, कोकिळेचे गायन, पारितोषिक वितरण समारंभ, निसर्गरम्य ठिकाण, मिळकतीचे वर्णन, गोड बाळ, भयंकर स्वप्न, नदीचे कोरडे पात्र, भिकारी इ.	२. याची कारण मीमांसा करावी लागेल, बाजूने किंवा विरूद्ध चर्चा करावी लागेल. मुद्दा मांडून तो पटवून द्यावा लागतो., खुलासा करावा लागतो, स्पष्टीकरण करावे लागेल, मनात गोंधळ करणारी गोष्ट समजावून सांगावी लागते असे सर्व विषय: मानसिक ताण-तणाव, पर्यावरणाचा ऱ्हास, ग्लोबल वॉर्मिंग, तो असा का वागला, मेमो, नोटीस, खरेदी-विक्री, आरोग्याची हानी, पोळी का करपली, ती घरी उशिरा का आली इत्यादी.
३. सहज म्हणून वाचू शकतो. वर्णन विषय फार गंभीर असत नाही.	३. बारकाईने, लक्षपूर्वक, जबाबदारीने व नीट समजून घेवून जाणीवपूर्वक वाचन करावे लागते.
४. वर्णनात्मक मजकूर वाचनात भावनिक गुंतवणूक जास्त असते.	४. स्पष्टीकरणात्मक मजकूर वाचनात मानसिक, वैचारिक, बुद्धिला चालना देणारे घटक जास्त असतात.
५. लेखकाशी कळत नकळत संवाद होत राहतो.	५. वाचकाशी लेखकाचा अभावानेच संवाद होऊ शकतो.
६. मजकूर व्यक्तिनिष्ठ असतो. त्यामुळे वाचकाचा वाचन मजकूरात सहभाग असतो.	६. मजकूर वस्तुनिष्ठ असतो, तटस्थपणे किंवा त्रयस्थाच्या भूमिकेतून मांडलेला असतो. त्यामुळे मजकूरात वाचकाचा सहभाग फारसा नसतो.
७. शब्दांची निवड, वाक्यांची फेक, भाषेचा फुलोरा, लेखकाचे निरीक्षण, भाषेचे अलंकार यांना महत्त्व असते.	७. शब्दांचा विशिष्ट वापर (specific vocabulary) मांडणी, मुद्देसुदपणा, युक्तिवाद, दिलेली कारणे यांना महत्त्व असते. शिवाय संबंधित ज्ञानशाखेच्या संकेतांनुसारच भाषा असावी लागते उदाहरण कायदा, विज्ञान, संस्कृती इत्यादी
८. वर्णनात्मक वाचन मजकूरामुळे होणारे विमर्षण बऱ्याच अंशी मुक्त असते.	८. स्पष्टीकरणात्मक मजकूरामुळे होणारे विमर्षण संबंधित विषयामुळे बऱ्याच अंशी बंदिस्त असू शकते.

लक्षात ठेवा

(१) वाचन साहित्य म्हणजे : वाचनासाठी जे जे उपलब्ध होऊ शकते. पुस्तके, मासिके, वृत्तपत्रे, निवेदने, परिपत्रके, संस्थेचे माहितीपत्रक, कार, मोबाईल, औषध इत्यादीचे माहितीपत्रक असे सर्व काही.

(२) वाचन मजकूर म्हणजे : वाचन साहित्यामधून आपल्याला हवे ते म्हणजे आपण जे जे वाचू इच्छितो, वाचू शकतो, वाचतो तो वाचनमजकूर असतो. वाचत साहित्याचा प्रकार किंवा विषय एकच असला तरी वाचनमजकूर वेगवेगळा असू शकतो.

(३) वाचन मजकूराचे स्वरूप व आशय संबंध : वाचनमजकूराच्या स्वरूपातून (मांडणीतून) त्याचा आशय उलगडत जातो आणि वाचनमजकूराचा आशय वाचनमजकूराची मांडणी ठरवतो.

(४) वर्णनात्मक मजकूर म्हणजे : एखाद्या गोष्टीचे, व्यक्तीचे किंवा घटनेचे अनुभवाचे शब्दातून, वाक्यातून दिसणारे प्रतिबिंब म्हणजे वर्णनात्मक मजकूर.

(५) स्पष्टीकरणात्मक मजकूर म्हणजे : ज्यात स्पष्टीकरण आहे, एखादी गोष्ट समजून सांगण्यासाठी कारणमीमांसा केली आहे. एखादा मुद्दा पटवून दिला आहे किंवा एखादी संकल्पना विशद केली आहे त्याला स्पष्टीकरणात्मक मजकूर म्हणता येईल.

(ग) संक्रमणात्मक विरूद्ध चिंतनात्मक स्वरूप

संक्रमण म्हणजे बदल, एका अवस्थेतून दुसऱ्या अवस्थेत जाणे. प्रसिद्ध होणारा किंवा आपण वाचतो तो मजकूर बऱ्याच वेळा तात्कालिक आणि विशिष्ट वेळेपुरता महत्त्वाचा असतो. तो चिरंतन स्वरूपाचा नसतो आणि काळाच्या ओघात विसरलाही जातो. विविध प्रकारचा पत्रव्यवहार, सरकारी यंत्रणेतील परिपत्रके, उपकरणे व यंत्रे यांची माहिती देणारा मजकूर, वृत्तपत्रीय मजकूराचा मोठा भाग इत्यादी किती तरी मजकूर त्या त्या वेळी महत्त्वाचा वाटला तरी ती वेळ गेल्यावर शिळा होतो आणि स्मरणातूनही हद्दपार होतो. पुढील बातमीचा मजकूर पाहा.

''भरधाव बुलेट घसरल्याने या अपघातात जखमी झालेल्या बुलेट चालकाचा मृत्यू झाला. मंगळवारी (दि. ८) इंदिरानगर बोगदा येथे हा अपघात घडला होता. रुग्णालयात उपचार घेत असतानाच त्याचा मृत्यू झाला.

या प्रकरणी सुरेश जाधव यांनी दिलेल्या तक्रारीनुसार इंदिरानगर जॉगिंग ट्रॅक येथून भाऊ रामनाथ जाधव (नावे बदललेली) हा विना नंबरच्या बुलेटवरून साईनाथ चौफुलीकडून इंदिरानगर बोगद्याकडे जात असताना बुलेट घसरली. डोक्यास मार लागून तो गंभीर जखमी झाला. त्यास खाजगी रुग्णालयात दाखल केले असता उपचारादरम्यान त्याचा मृत्यू झाला. या प्रकरणी मुंबई नाका पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.''

दैनंदिन जीवनात घडणाऱ्या एका दुर्दैवी घटनेची एका वृत्तपत्राने घेतलेली ही नोंद आहे. बातमी महत्त्वाची असली तरी थोड्या काळासाठीच ती लक्षात राहील. मजकूर चिंता करायला लावणारा असला तरी चिंतन करायला लावणारा नाही.

विवाह संस्था, भारतीय शिक्षण पद्धती, तरुणाईची सध्याची विचारसरणी, बदलती जीवनशैली, वाहतुकीचे प्रश्न, मोर्चे आणि राजकारण इत्यादी अनेक विषयांवर रोज लिखाण होत असते. शेकडो पुस्तके प्रसिद्ध होतात आणि त्यातील बरीचशी कालांतराने रद्दीत जातात.

संक्रमणावस्थेतील लिखाणाला फार आयुष्य नसते कारण ते त्या त्या वेळेपुरते संबंधित असते. एखाद्या चौफुलीवरील रहदारीला अडथळे करणारे वृक्ष नगरपालिकेने तोडावेत किंवा नाही यावर वृत्तपत्रात बरेच काही प्रसिद्ध होऊ शकते. विविध दृष्टिकोन व्यक्त होऊ शकतात. पण हे सर्व तात्कालिक समस्येशी संबंधित असतात आणि त्या संदर्भात त्याला तेवढेच महत्त्व असते. ती समस्या संपली की त्या संबंधीच्या लेखनाला फारसा अर्थ उरत नाही.

छापून आलेले, प्रसिद्ध झालेले, पुस्तक रूपाने आलेले सर्वच लेखन चीरकाल टिकणारे नसते. खरे म्हणजे जास्त काळ टिकणारा मजकूर संक्रमणात्मक मजकूराच्या तुलनेने फार नसतो. मात्र काळाच्या ओघात टिकणाऱ्या मजकूराला वाचकांकडून नेहमीच दाद मिळत असते. असा मजकूर वाचक नेहमी सादर करताना दिसून येतात.

साने गुरुजींच्या 'श्यामची आई' या पुस्तकाचे उदाहरण देता येईल. पुस्तक प्रसिद्ध होऊन १०-१२ दशके झाली तरी त्याला आजही वाचकांकडून मागणी कमी झालेली नाही. शेकडो वर्षानंतर शेक्सपियरचे 'हॅम्लेट' तेवढेच लोकप्रिय आहे. वि. स. खांडेकरांची 'ययाती' आजची तरुण पिढीदेखील आनंदाने वाचते. महात्मा फुलेंनी लिहिलेले लेख आजही वाचावेसे वाटतात. महात्मा गांधीजींचे 'माझे सत्याचे प्रयोग' जगभर वाचले जातात. अशी आणखी अनेक उदाहरणे देता येतील. अशा लेखनाच्या लोकप्रियतेचे कारण म्हणजे ते विचार करायला लावते. वाचकाला ते अंतर्मुख करते. चिंतन करायला लावते. चिंतनात्मक स्वरूपाचा मजकूर फक्त वाचकाचे मनोरंजन करीत नाही तर त्यांच्या मनाला एक नवी आशा दाखवतो, नवीन स्वप्न निर्माण करते. विचारमग्न करते. कारण असा मजकूर मानवी मूल्यांशी, जीवनातील प्रश्नांशी खूप जवळचे नाते ठेवून असतो. रामायण, महाभारत, गीता, ज्ञानेश्वरी, वेद आणि पुराणे, संत साहित्य ही सर्व चिंतनात्मक स्वरूपाच्या मजकूराची उत्कृष्ट उदाहरणे म्हणता येतील यात शंका नाही.

काळाच्या ओघात त्या त्या वेळी अनेक गोष्टी घडत असतात आणि त्यासंबंधीचे वाचन लोक त्या त्या वेळी करीत असतात. उदाहरण

- ★ एखादी व्यक्ती एव्हरेस्टवर जाण्याची स्वप्ने पाहत असते. प्रयत्न करीत असते आणि एक दिवस ती यशस्वी होते. त्यासंबंधीचा वृत्तांत वृत्तपत्रात प्रसिद्ध होतो आणि आपण तो उत्सुकतेपोटी वाचतो. कालांतराने विसरून जातो.
- ★ भाविकांचा एक ग्रुप मानस सरोवराची यात्रा करतो. तेथील सौंदर्य, पावित्र्य, खडतर प्रवास, नवनवीन अनुभव इत्यादी संबंधी आपल्या वाचनात येते. वाचकाला एक वेगळी अनुभूती येते. हळूहळू अशा वाचन अनुभवाचा बराचसा भाग विस्मृतीत जातो.
- ★ एखाद्या गरीब, निरक्षर आदिवासी स्त्रीने आपण डोंगर पाड्यावर कसे आयुष्य काढले आणि सर्व अडचणी सहन करून वारली चित्रकलेत कसे नैप्यून्य मिळवले आणि ती व तिची कला प्रसिद्धीस कशी आली याचे रसभरीत वर्णन आपल्या वाचनात येते. आपल्याला अशा स्त्रीचे कौतुक वाटते. पण अशी व्यक्ती आपल्या स्मरणात कायमची राहील असे होत नाही.
- ★ एखाद्या डॉक्टरने एखाद्या रुग्णाचे अत्यंत जोखमीचे ऑपरेशन केले व त्यामुळे रुग्णाला नवीन आयुष्य लाभले याबद्दलची भरपूर प्रसिद्धी झाली व तुम्हीही त्यासंबंधी वाचले. या प्रकारच्या अनेक घटनांपैकी ही एक महत्त्वाची व मोलाची घटना होती. ती आपल्याला महत्त्वाची वाटते. काही दिवसांत आपल्या मनाच्या पटलावरून ती पुसली जाते.
- ★ दरवर्षी १० वी १२ वीच्या यशस्वी विद्यार्थ्यांच्या फोटोंनी वृत्तपत्राची पाने भरून येतात. टॉपर्सच्या मुलाखती छापून येतात. ही दरवर्षीचीच कहाणी असल्याने आपण ती वाचून नंतर सोडून देतो.

'एव्हरेस्टवर चढाई', 'मानस सरोवर यात्रा', 'वारली चित्रकलेची प्रणेती', 'डॉक्टर म्हणजे परमेश्वर', 'माझी यशोगाथा' अशी पुस्तके किंवा लेख वर दिलेल्या घटनांवर प्रसिद्ध होतील आणि काळाच्या ओघात हरवूनही जातील.

या उलट एकलव्य नावाच्या तरुणाने धनुर्विद्येत मिळविलेले असामान्य यश आणि श्रद्धेने, निष्ठेने केलेली विद्येची जोपासना असंख्य वाचकांच्या पिढ्यान्‌पिढ्या लक्षात राहते. ज्यांनी आपल्याला प्रवेश नाकारला त्या द्रोणाचार्यांच्या सर्वात प्रिय असलेल्या शिष्यांपेक्षाही अर्जुनापेक्षाही धनुर्विद्येत एकलव्य पारंगत होतो, तेही फक्त प्रवेश नाकारलेल्या गुरुवरील श्रद्धेपोटी व स्वतःच्या प्रयत्नामुळे आकाशाऐवढे यश मिळूनही त्याचे पायमात्र जमिनीवरच राहिले आणि आचार्यांनी मागितलेली गुरुदक्षिणा, उजव्या हाताचा अंगठा, कुठल्याही प्रकारचा विचार मनात न आणता त्याने देऊन टाकला.

एकलव्याची त्या काळात घडलेली अत्यंत साधी कथा आहे. पण वाचक ती विसरू शकत नाही कारण त्या घटनेला, कथेला एक चिरंतन मानवी मूल्य आहे. 'असिम्न श्रद्धा' आणि 'अविरत प्रयत्न' यांच्या साह्याने आपण कुठलीही गोष्ट साध्य करू शकतो हे चिरंतन सत्य. चिंतनात्मक मजकूराला असा चिरंतन सत्याचा भक्कम पाया असतो. कितीही संक्रमणे झाली तरी असे साहित्य अनेकांना पिढ्यान्‌पिढ्या स्फूर्ती देत असते, अनेकांच्या जीवनाला नवी उमेद आणि स्वप्नांना पंख देत असते.

चिंतनात्मक वाचन मजकूराचे वैशिष्ट म्हणजे ते सदैव, सदासर्वकाळ वाचकाच्या हृदयाला आणि बुद्धिला भुरळ घालीत असते. जीवनाचे नग्नसत्य (naked truth) किंवा निखळ सत्य दाखविण्याचे धैर्य त्याच्यात असते.

तात्कालिक किंवा संक्रमणात्मक वाचन मजकूर आणि चिंतनात्मक वाचन मजकूर यातील फरक आता तुमच्या लक्षात आला असेल.

या ठिकाणी हेही लक्षात घ्यायला हवे की, जे लेखन किंवा वाचन-साहित्य किंवा वाचन मजकूर त्या त्या काळी संक्रमणात्मक किंवा तात्कालिक वाटतो त्यातूनची जो चिंतनीय व चिरंतन असतो तो मजकूर टिकतो. याचाच अर्थ असा की, आज जो वाचन मजकूर तात्कालिक वाटतो त्याला वाचनमूल्य, जीवनमूल्य असेल तर तो चिरंतन कालपर्यंत लोकप्रिय होतो. कारण चिंतन विचार करण्यासारखे बरेच काही त्यात असते. बहिणाबाई चौधरी कुठल्या महाविद्यालयात गेलेल्या नव्हत्या. पण त्यांच्या अत्यंत सोप्या आणि सुंदर मराठीतील गाणी आपल्या दैनंदिन जीनवाविषयी चिंतन करायला लावतात. तीच गोष्ट रामदासांची 'मनाचे श्लोक' आजही आपल्याला भारावून टाकतात आणि मानसशास्त्रज्ञालादेखील विचार करायला लावू शकतात. मीरेची भजने, कबिराचे दोहे, खलील जिब्रानचे साहित्य म्हणजे चिंतनात्मक मजकूराची अप्रतिम उदाहरणे आहेत.

लक्षात ठेवा

- ★ संक्रमणात्मक वाचन मजकूर तात्कालिक घटना किंवा व्यक्ती अथवा विषय यांच्याबद्दल असतो.
- ★ बदलत्या काळानुसार ज्या मजकूरात जीवनाशी संबंधित चीरकालापर्यंत चिंतन करण्यासारख्या गोष्टी असतात त्या टिकून राहतात.
- ★ संक्रमणात्मक मजकूर अल्पकाल टिकणारा आणि वाचकाच्या स्मरणात फार काळ न राहणारा असतो तर चिंतनात्मक मजकूर दीर्घकाल टिकणारा व वाचकाच्या कायम स्मरणात राहणारा असतो.

थोड़क्यात

★ तात्कालिक विषयावर जे लेखन असते व काळाच्या ओघात निसटते त्याला 'संक्रमणात्मक वाचन मजकूर' म्हणता येईल.

★ चिंतनात्मक मजकूराला एक वैचारिक मूल्य असते. म्हणजे असा मजकूर विचारांना चालना देतो, बुद्धी सतेज करतो आणि जीवनाबद्दलची आपली समज वाढीस लावतो.

★ नाही कारण असा मजकूर व्यक्तीगत पातळीवरचा किंवा व्यक्तिगत संबंधातून निर्माण झालेला असतो. त्याला सार्वत्रिक किंवा वैश्विक मूल्य (universal value) नसते त्यामुळे त्याला चिंतनात्मक मजकूर म्हणता येणार नाही.

★ मजकूर सादा, सोपा वाटला, सहज वाचावासा वाटला तरी तो वाचकाला प्रिय असतो कारण त्याचा पाया जीवन मूल्यांवर आधारित असतो आणि तो जीवनाविषयी वाचकाला विचार चिंतन करायला लावणारा असतो.

★ नाही, चिंतनात्मक मजकूर अत्यंत साध्या, सामान्य विषयावर व सोप्या भाषेत असू शकतो. उदा. 'श्यामची आई'

(घ) स्कीमा : उपपत्ती अर्थ, स्वरूप, उपयोजन

★ **स्कीम अर्थ**

लिखित किंवा छापील स्वरूपाचे जे काही वाचनासाठी म्हणून असेल त्याला आपण 'मजकूर' म्हटले आहे.

मजकूराचा विचार आपल्याला दोन बाजूंनी करायला हवा. मजकूरात दोन घटक असतात, किंवा मजकूराला दोन पैलू असतात. मजकूराचे पहिले रूप दृष्य असते. म्हणजे मजकूर आपण डोळ्यांनी पाहू शकतो, वाचू शकतो. हे दृष्य स्वरूप शब्द, शब्दसमूह, वाक्ये, परिच्छेद इत्यादींनी तयार झालेले असतात. आपण मजकूर जोपर्यंत वाचत नाही, तोपर्यंत तो निर्जिव असतो. आपण मजकूर वाचू लागल्यावर तो आपल्या मनःपटलावर जिवंत होतो.

आपण मजकूर जेव्हा लिहीत असतो त्या वेळी तो शब्द, वाक्ये इत्यादींनी एक आकार घेत असतो.

दृष्य मजकूर प्रत्यक्ष साकार होण्यासाठी लेखकाच्या मनात एक अदृष्य व्यवस्था असते. मजकूर दृष्य स्वरूपात येण्यासाठी या अदृश्य संरचनेचे कार्य फार महत्त्वाचे असते.

दृष्य मजकूराची बांधणी करण्यासाठी जी अदृष्य संरचना कार्यरत असते तिला

Longman Dictionary of Applied Linguistics मध्ये स्किमा असे म्हणतात (Schema) ची व्याख्या पुढीलप्रमाणे दिली आहे.

Schema is the underlying structure which accounts for the organization of a text or discourse.

या व्याख्येत तीन गोष्टी महत्त्वाच्या आहेत.

(1) The organization of a text.

(2) The underlying structure

(3) Accounts for

स्किमा ही मजकूराच्या तळाशी असलेली एक संरचना (The underlying structure) आहे. या संरचनेमुळे (accounts for) मजकूराला सुसूत्रता येते आणि जे आपल्याला दिसते त्या स्वरूपात त्याची बांधणी होते.

कृती १

'सकाळ'च्या संपादकांना एका वाचकाने लिहिलेले पत्र खाली दिले आहे. ते वाचा. त्या पत्राच्या दृष्यस्वरूपाबद्दल काय सांगता येईल त्याचा विचार करा. या पत्राचा स्किमा काय असू शकेल?

संपादक महोदय

दि. २० मे च्या रविवार सकाळमधील ''शिक्षण पद्धती बदलण्याची गरज'' हे आपले 'संपादकीय विचार', करायला लावणारे आहे.

सध्याच्या शिक्षण पद्धतीत आमूलाग्र बदल व्हायला हवा यात शंकाच नाही. जगाने नोंद घ्यावी असे एकही संशोधन गेल्या ७० वर्षांत आपण जगाला देऊ शकलो नाही. तसेच जगातील प्रथम १०० विद्यापीठांत आपले एकही विद्यापीठ नाही ही दुर्दैवाची गोष्ट आहे.

याचे मुख्य कारण म्हणजे कालबाह्य अभ्यासक्रम, रद्दी शैक्षणिक पुस्तके, कंटाळवाणी अध्यापन पद्धती आणि निरर्थक परीक्षा पद्धती यामुळे शाळा व महाविद्यालये तरुण मुलामुलींचे कोंडवाडे झाले आहेत. परीक्षेत पास होणे, भरपूर मार्क मिळविणे आणि कोणत्याही मार्गाने डिग्री हस्तगत करणे म्हणजे शिक्षण अशी अनेकांची समजूत आहे. चिंतन, संशोधन, नवी दृष्टी, नवी स्वप्न, नवा विचार, नवी क्षितिजे यांना आपण केव्हाच हद्दपार केले आहे.

शिपायापासून ते पंतप्रधानांपर्यंत आणि रस्त्यावरील माणसांपासून थोर विचारवंतांपर्यंत सगळेच म्हणतात की, आपली शिक्षणपद्धती सर्वार्थाने लवकरात लवकर बदलणे गरजेचे आहे. पण संपादक महोदय, हे करणार कोण?

पोरकट, नादान आणि विचारशून्य राजकारणी, वांझोटे विचारवंत आणि असाह्य जनता यातून कोणती सशक्त शिक्षण पद्धती बाळसे धरणार आहे?

असो. विचारांना खाद्य देणारे संपादकीय लिहिल्याबद्दल धन्यवाद.

आपला वाचक

मोहन विचारे

दृष्य मजकूराची रचना

पहिला परिच्छेद : वृत्तपत्राचे नाव, दिनांक व संपादकीय विषयाचा उल्लेख व त्याबद्दलची प्रतिक्रिया ('आपले संपादकीय विचार करायला लावणारे आहे')

दुसरा परिच्छेद : संपादकाच्या विचाराशी सहमती. आपल्या शिक्षण पद्धतीत नवे संशोधन नाही. तसेच जगाच्या क्रमवारीत आपण कोठेही नाही हे सत्य अधोरेखित.

तिसरा परिच्छेद : कुजलेली शिक्षण पद्धती व नव्या दृष्टीचा अभाव यांना थोडक्यात स्पर्श.

चौथा परिच्छेद : संपादक महोदयांना प्रश्न.

शेवटचा परिच्छेद : सध्या परिस्थितीत शिक्षण व्यवस्थेत बदल कसा होणार याविषयीची चिंता.

शेवटी संपादकाचे आभार

पत्रामधील मजकूराच्या मांडणीत प्रत्येक परिच्छेद सहजपणे पुढील परिच्छेदाला जन्माला घालतो आणि प्रत्येक नवीन परिच्छेद अगोदरच्या परिच्छेदाला भक्कम आधार देतो आणि त्याच्यातील विचार किंवा भावना अधिक गडद करतो.

कालबाह्य अभ्यासक्रम, रद्दी शैक्षणिक पुस्तके इत्यादी आणि चिंतन, संशोधन इत्यादी यांचा विरोधाभास तिसऱ्या परिच्छेदात उभा करून त्यापुढील परिच्छेदात चिंता वाढवणारा प्रश्न मांडला आहे.

शब्दांची निवड परिणामकारक आहे. 'कालबाह्य' (अभ्यासक्रम), रद्दी (शैक्षणिक पुस्तके), कंटाळवाणी (अध्यापन पद्धती), निरर्थक (परीक्षा पद्धती) ही विशेषणे वाचकाच्या मनाला खणत जातात. चिंतन, संशोधन, नवी दृष्टी, नवे स्वप्ने, नवा विचार, नवी क्षितीजे आपले मन उसवण्याची तीव्रता वाढवत जातात.

नेमक्या निवडलेल्या शब्दातून लेखकाला जे काही सांगायचे आहे. ते सर्व निश्चित विचारांनी पक्के बांधले आहे. ''परीक्षेत पास होणे. भरपूर मार्क मिळविणे आणि कोणत्याही मार्गाने डिग्री हस्तगत करणे म्हणजे शिक्षण अशी अनेकांची समजूत आहे.'' लेखकाचा हा विचार वाचकाला अक्षरशः घायाळ करतो. शिक्षणाचा खरा अर्थ काय किंवा अर्थपूर्ण शिक्षण म्हणजे काय या विचाराने आपण अस्वस्थ होतो.

''शिपायापासून पंतप्रधानांपर्यंत आणि रस्त्यावरील माणसापासून थोर विचारवंत'' या प्रचंड परीघाभोवती बदलाचा भुंगा फिरत असतो पण कणभरही बदल होत नाही. याची खंत लेखक उपाहासाने व्यक्त करतो.

राग व्यक्त करण्यासाठी पत्रलेखक एक सरळसोट टिपण्णीही करतो : ''पोरकट, नादात आणि विचारशून्य राजकारणी, वांझोटे विचारवंत आणि असाह्य जनता'' हे वाचताना आपल्याला हेही माहिती असते की, सगळेच राजकारणी किंवा विचारवंत लेखक म्हणतो तसे नसतात. ज्यांच्याकडे आदराने पाहावे असे राजकारणी व विचारवंत आहेत. पण या ठिकाणी नवीन बदलासाठी सध्याची राजकीय, सामाजिक व वैचारिक परिस्थिती कशी प्रतिकूल आहे. या बद्दलचा असंतोष प्रकट करण्यासाठी लेखक खूप कठोर होतो. पण ती कठोरपणाची, कोरडेपणाची भावना वाचकाने समजावून घेणे गृहीत असते.

दृष्य (पत्राच्या) मजकूराला आशयाच्या पायावर मांडले आहे. माहिती, विचार, प्रतिक्रिया, राग यांनी आशय समृद्ध झाला आहे.

(ख) स्किमाचे स्वरूप

मजकूर लिखित स्वरूपात लेखनीतून बाहेर पडण्यापूर्वी लेखकाच्या मनात एक अदृष्य 'स्किमा' तयार झाला आणि त्या स्किमातून पत्राचे दृष्य स्वरूप तयार झाले. या मजकूराच्या स्किमाची काही वैशिष्ट्ये किंवा घटक पुढीलप्रमाणे सांगता येतील.

★ संबंधित मजकूराचे वाचन

वाचलेल्या संपादकीय मजकूराला प्रतिक्रियात्मक उत्तर देण्यासाठी तयार कराव्या लागणाऱ्या मजकूरासाठी मूळ मजकूराचे वाचन ही पूर्वअट

वाचलेल्या मजकूरावर प्रतिक्रिया लिहायची असल्याने अशा स्वरूपाचा मजकूर निर्मितीसाठी वाचनक्रिया आवश्यकच. किंबहुना वाचनामुळेच मजकूर निर्मितीची प्रक्रिया सुरू होते.

★ **वाचनातून विमर्षण**

विमर्षण ही वाचनातून निर्माण होणारी एक अपरिहार्य प्रक्रिया आहे. संपादकीय मजकूर वाचताना आणि वाचनानंतर मनात विचारप्रवाह सुरू झाले. सह शिक्षण पद्धतीचा सांगोपांग, खोलवर, जबाबदारीने व गांभीर्याने विचार.

★ **विमर्षणातून प्रतिक्रिया व्यक्त करण्याची इच्छा होणे**

वाचनामुळे 'विमर्षण होणे' हा एक भाग झाला. पण झालेले विमर्षण स्वतःपुरते मर्यादित न ठेवता किंवा मनात न ठेवता त्याला व्यक्त करण्याची इच्छा होणे महत्त्वाचे. अशी इच्छा झाली नाही तर संबंधित मजकूराच्या जन्मकळा निर्माण होणार नाहीत.

★ **विमर्षण विस्तार आणि मजकूराच्या मर्यादा**

विमर्षणाचा विस्तार कितीही असला तरी प्रतिक्रिया म्हणून जे व्यक्त करायचे आणि जे वृत्तपत्रात छापले जाणे अपेक्षित आहे त्याला मर्यादा आहेत. त्यामुळे विचार कितीही असले तरी त्याची थोडक्यात, मोजकी व नेमकी मांडणी हवी.

★ **मजकूराच्या निर्मितीची प्रक्रिया**

मजकूराची मर्यादा लक्षात घेतल्यानंतर त्यासाठी काही निर्णय घ्यावे लागतील.

(अ) कुठले विचार, भावना व्यक्त करायच्या?

(ब) नेमक्या अभिव्यक्तीसाठी कुठल्या शब्दांची, वाक्यांची निवड करायची?

(क) ही सगळी मांडणी करतांना लेखक म्हणून आपली भूमिका सकारात्मक ठेवायची की नकारात्मक?

★ **मजकूर मांडणीच्या परंपरा (**Conventions**) लक्षात घेणे**

मजकूराचे स्वरूप पत्राचे असल्याने ते कसे असावे याचे काही संकेत लक्षात घ्यावे लागतील. उदाहरण प्रमाण, अभिवादन, पत्राचा मुख्य गाभा आणि समारोप.

★ **प्रत्यक्ष मजकूर नर्मिती**

वरील सर्व प्रक्रियांचा परिपाक म्हणून पत्र-लेखन सुरू होणे आणि त्या विशिष्ट स्वरूपाचा मजकूर निर्मितीला प्रारंभ होणे.

प्रतिक्रियात्मक किंवा प्रतिसाद म्हणून लिहावयाच्या दृष्य मजकूराच्या तळाशी असे स्किमा तयार होत राहतात आणि हा स्किमा किंवा अदृश्य रचना स्वतः आकार घेत असताना किंवा साकारत असताना दृष्य मजकूराच्या निर्मितीला गती देण्याचे कार्य करीत असते.

झाड जेवढे आपल्याला दिसते तेवढेच नसते. जेवढे झाड दिसते त्याही पेक्षा त्याचा मोठा भाग जमिनीत असतो आणि जमिनीत आपल्या डोळ्यांना न दिसणारा त्याचा जो पसारा असतो त्यावरच त्याचा वरचा डोलारा किंवा डौलदारपणा अवलंबून असतो.

स्किमा व्यवस्थानिर्मिती आणि वाचन मजकूर निर्मिती या अशा रितीने एकमेकांना पूरक प्रक्रिया असतात.

प्रत्येक झाडाच्या वरच्या विस्तारानुसार त्याचा जमिनीखालचा विस्तार असतो. हे मान्य केले तरी विशिष्ट प्रजातीनुसार प्रजातीचा वरचा विस्तार आणि जमिनीखालचा विस्तार यांचा अंदाज करता येऊ शकतो. त्याचप्रमाणे प्रत्येक मजकूराच्या स्वरूपानुसार त्याचा स्किमा विशिष्ट स्वरूपाचा असतो. सारख्या स्वरूपातील

मजकूराच्या स्किमामध्ये बरीच साम्य स्थळे आढळून येतात. उदाहरण प्रत्येक कथा किंवा कादंबरी मजकूराचा स्किमा वेगळा असला तरी कथा किंवा कादंबरी किंवा तत्सम कुठल्याही मजकूर स्वरूपाच्या स्किमामध्ये काही गोष्टी सारख्या असू शकतात. उदाहरण कथा / कादंबरी. स्किमा : पार्श्वभूमी (setting/backgraound) यात काळ / वेळ (time), स्थळ (location) आणि त्या जगात वावरणारी माणसे म्हणजे पात्रे (characters) यांचा समावेश होतो. + घटना (episodes), प्रसंग (events/happenings) + संघर्ष (conflict)

अशा स्वरूपाचा मजकूर निर्मितीत हाताळलेला विषय (issue/theme), त्या विषयाची नावीन्यपूर्ण मांडणी (presentation), लेखकाचा दृष्टिकोन किंवा लेखकाची भूमिका (stance) हेदेखील तेवढेच महत्त्वाचे असतात.

एवढ्या चर्चेनंतर वाचत मजकूराच्या स्वरूपानुसार (पत्र, प्रवास वर्णन, निवेदन, रिपोर्ट, अनुभव कथन इत्यादी) त्याच्या स्किमा संबंधी तुम्हाला नक्कीच विचार करता येईल.

उपयोजन

मजकूर उपलब्ध असताना, तो दिसत असताना किंवा आपण वाचू शकत असताना त्याच्या स्किमाचा विचार आपण कशासाठी करायचा असा विचार तुमच्या मनात कदाचित आला असेल किंवा येऊ शकतो.

मजकूराच्या स्किमाचा शोध घेतल्यास वाचक म्हणून आपल्याला पुढील लाभ होऊ शकतात.

- ★ मजकूराचा हेतू लक्षात येतो. हे महत्त्वाचे आहे कारण हेतू (Purpose, goal) किंवा (interntion, aim) हा कुठल्याही मजकूराचा पाया असतो. हेतू हा मजकूराचा केंद्रबिंदु असतो. हा केंद्रबिंदु व्यक्त होण्यासाठी मजकूर त्याच्याभोवती फिरत असतो.
- ★ हेतू स्पष्ट करण्यासाठी लेखकाने केलेली योजना (plan) तसेच विचारांची, प्रसंगांची, भावनांची मांडणी लक्षात येते.
- ★ शब्द, शब्दसमूह, वाक्ये, परिच्छेद यामागील स्किमाद्रव्य लक्षात येते.
- ★ अनुभव, संघर्ष, प्रखर वास्तव किंवा वस्तुस्थिती (raeality) यांची तीव्रता (intensity) जाणवते.
- ★ या सगळ्यांचा मिळून होणारा फायदा म्हणजे मजकूर सर्वांगांनी समजतो.
- ★ मजकूराबद्दलची समज (understanding) जेवढी जास्त तेवढा विमर्षणाचा अस्सलपणा जास्त
- ★ मजकूराच्या मांडणीतील कल्पकता आणि कलात्मकता मनाला भिडते आणि सौंदर्यानुभव देते.
- ★ दृष्य मजकूराच्या पलिकडे अनेक गोष्टी दिसून येतात. म्हणजेच तुम्ही नुसत्या ओळीच नाही तर दोन ओळींच्या मध्ये काय आहे तेही वाचू शकता आणि ओळींच्या पलिकडचेही वाचू शकता (you can read the line read between the lines and also read beyond the lines)
- ★ साहित्यातील कलाकृतीचे श्रेष्ठत्व तर तिच्या स्किमावरच अवलंबून असते असे म्हटले तरी चालेल.
- ★ दैनंदिन जीवनातील मजकूर आपण अधिक डोळसपणे आणि सजगतेने वाचू शकतो.

लक्षात ठेवा

(अ) वाचन मजकूराचे घटक / पैलू / रूपे



स्किमा	दृष्य मजकूर
दृष्य मजकूर (Physical form) साकार होण्यासाठी आवश्यक असणारी अदृष्य व्यवस्था किंवा संघटना (structure)	शब्द, शब्द समूह, वाक्ये परिच्छेद इत्यादी आपल्या डोळ्यांना दिसणारा मजकूर

(ब) स्किमाची वैशिष्ट्ये

- ★ स्किमा ही एक अदृष्य (वाचकाला प्रत्यक्ष न दिसणारी) व्यवस्था (system) किंवा संरचना (structure) असून ती मजकूराच्या तळाशी असते.
- ★ स्किमानुसार मजकूर साकार होतो किंवा शब्द, शब्दसमूह, वाक्ये इत्यादीच्या माध्यमातून आकार घेतो.
- ★ मजकूराच्या विषयानुसार (subject matter) किंवा आशया (content) नुसार स्किमा तयार होतो व स्किमाला अनुसरून मजकूर तयार होतो अमुक एका मजकूराचे स्वरूप असेच का याचे उत्तर त्याच्या स्किमात सापडते.

(क) स्किमा प्रक्रियेचे टप्पे / पायऱ्या (stages)

- ★ जो मजकूर व्यक्त होणार आहे, त्याच्या विषय/आशयाबद्दल विचार / चिंतन
- ★ वाचन मजकूरा विषयी आशयाची व्याप्ती आणि मर्यादा
- ★ व्यक्त करावयाच्या वाचन मजकूराची अभिव्यक्ती परंपरा (conventions of expression). उदा. नाटक, कादंबरी, परिपत्रक, नोटीस इत्यादीची समज.
- ★ अभिव्यक्तीसाठी लागणारी भाषिक सामग्री (language forms) तयारी (Preparation for writing).
- ★ स्किमाचा आकार / प्रकार निश्चित होणे.
- ★ स्किमानुसार वाचन मजकूराची रचना होणे.

(ड) वाचन मजकूराचा स्किमा लक्षात घेण्याचे फायदे

- ★ वाचन मजकूराची विशिष्ट रचना, त्यामागील हेतू व योजना समजते.
- ★ विचार, भावना, अनुभव, वास्तव यांची मांडणी (presentation), तीव्रता (intensity) आणि भाषिक सौंदर्य (शब्द, वाक्य रचना, भाषिक अलंकार इत्यादी) लक्षात येते.
- ★ मजुकरातील कल्पना (ideas), कल्पकता (imagination) आणि कलात्मकता (artistic structure) तसेच जीवनाकडे बघण्याचा दृष्टिकोन (attitude to life) यांचा एकत्रितपणाने (integration) वाचकाला सौंदर्यानुभव (aesthetic joy) येतो.
- ★ वाचन मजकूर सर्वांगांनी किंवा सर्वार्थाने समजल्याने वाचकाचा जीवनाविषयाचा समज वाढतो व त्याचे विचार भावना अधिक प्रगल्भ होतात.

कृती

पुढील मुद्दे स्पष्ट करा.

(१) 'स्किमा' म्हणजे

(२) स्किमा व वाचन मजकूराचा संबंध

(३) दृष्य वाचन मजकूराच्या मांडणीचे घटक

(४) 'मजकूर मांडणीच्या परंपरा (conventions)

(५) स्किमा लक्षात घेण्याचे दोन महत्त्वाचे फायदे

थोडक्यात

दृष्य मजकूराला साकार करण्यासाठी आवश्यक असलेली एक अदृष्य व्यवस्था (system) किंवा संरचना (structure) म्हणजे स्किमा होय. वाचन मजकूराचे स्वरूप किंवा मांडणी त्याच्या स्किमावर अवलंबून असतो. वाचन मजकूराच्या मांडणीत

★ शब्द, शब्दसमूह, वाक्ये, परिच्छेद, भाषालंकार इत्यादी

★ आशय किंवा मजकूराचा विषय (content, theme)

★ विषयानुरूप मांडणीच्या पंरपरा (conventions)

किंवा संकेत

★ लेखकाची भूमिका (stance) किंवा दृष्टिकोन (attitude)

या घटकांचा विचार होतो. 'मजकूर मांडणीच्या परंपरा' म्हणजे कुठल्या प्रकारचा मजकूर कसा मांडावा, लिहावा, असावा यासंबंधीचे लिखित किंवा अलिखित नियम, संकेत किंवा परंपरा उदाहरणार्थ, वैयक्तिक पत्रे (personal letters) औपचारिक पत्रे (formal letters), कथा, कविता, निवेदन, जाहिरात, प्रवासवर्णन, विविध प्रकारच्या नोटीसा, बैठकीचा अजेंडा इत्यादीचे लेखन, रचना, मांडणी करताना ती कशी करावी किंवा असावी ते गृहीत धरलेले असते.

वाचकाने स्किमा लक्षात घेण्याचे दोन महत्त्वाचे मुद्दे आहेत ते म्हणजे वाचनमजकूराच्या मागे असलेली अदृष्य स्वरूपातील व्यवस्था (स्किमा) व तिचा प्रत्यक्ष दिसणारा किंवा आपण वाचत असलेला मजकूर याच्यावरील प्रभाव यांचा संबंध लक्षात आल्यामुळे मजकूराची केलेली रचना, त्यातील आशय, लेखकाचा हेतू, दृष्टिकोन समजायला मदत होते आणि मजकूर नीट समजल्याने विमर्षण कसदार होते, वाचनाचा दर्जा सुधारतो, वाचकाची जीवनाविषयीची समज वाढीस लागते व व्यक्तिमत्त्व समृद्ध होते.

३.२.७ आशय रचना

कुठल्याही गोष्टीकडे तिचा आकार रचना व त्यातील आशय, व्यापार किंवा कार्य या दृष्टीने बघता येते. उदाहरणार्थ, मानवी शरीराची रचना डोके (मेंदू), छाती (फुफ्फसे), पोट (पचन संस्था) हात, पाय, कान, डोळे, तोंड, इत्यादींनी तयार होते. या रचनेतील प्रत्येक अवयव विशिष्ट कार्य करतो. त्यानुरूप श्वासोच्छ्वास, रक्ताभिसरण, मनोव्यापार इत्यादी कार्ये अव्याहतपणे सुरू असतात.

घराच्या रचनेचा विचार केला तर आपल्याला विविध घटक दिसतील. बैठकीची रूम, स्वयंपाक घर, स्नानगृह, गॅलरी इत्यादी. आपले घरात राहणे हे घराचे कार्य, म्हणून तर घर आणि घरपण असा फरक आपण करतो. घर, दगड, विटा, सिमेंट, भिंती, खोल्या इत्यादींचे असते. घरातील माणसांच्या नात्यांचे, जिव्हाळ्याचे, प्रेमाचे मिळून घरपण होते. घराची रचना सुंदर असली म्हणजे त्यात घरपण नांदत असेलच असे नाही आणि जेथे घरपण आहे त्या घराची रचना झोपडीवजाही असू शकते.

हे सर्व सांगण्याचे कारण असे की, मानवी शरीर किंवा घर यांचा विचार आपण रचना आणि कार्य या दृष्टीने बघू शकतो. त्याचप्रमाणे शब्द, वाक्य, परिच्छेद, लेखन प्रकार यांचा विचार रचना आणि आशय (form and function) या दृष्टीने करता येईल. 'घंटा' हा एक शब्द आहे. पण 'घंटा वाजली' हे वाक्य स्वतःचा वेगळा अर्थ दर्शवतो. 'तिला कॉफी आवडते' ही एक रचना आहे आणि त्याला एक अर्थ आहे कारण या रचनेतील शब्द शिस्तबद्ध पद्धतीने एकत्र उभे राहून एक विशिष्ट अर्थ ध्वनीत करतात. ही रचना थोडी जरी बदलली तर तिचा अर्थ बदलेल. उदाहरण 'तिला कॉफी आवडते का?'

मजकूरालाही एक रचना असते. या रचनेतून विशिष्ट आशय व्यक्त होतो. किंबहुना लेखकाला अभिप्रेत असलेला आशय व्यक्त करण्याच्या हेतूनेच शब्दाची विशिष्ट रचना केली जाते.

उपरोक्त चर्चेतून रचना आणि त्यातून व्यक्त होणारा अर्थ किंवा आशय यांचा परस्पर संबंध तुमच्या लक्षात आला असलेच.

खरं म्हणजे रचना आणि आशय वेगळे करता येत नाही. अभ्यासाच्या सोयीसाठी आपण तसे विभाजन करतो. मानवी शरीररचना आणि तिचे कार्य किंवा एखादी कविता आणि तिच्यातून व्यक्त होणाऱ्या भावना, हे वेगळे करता येणार नाही. कारण ते एकमेकात इतके मिसळून गेलेले असतात की, त्यांचा वेगळा विचार करणे कठीण असते.


रचने (form) शिवाय आशय (function) व्यक्त होऊ शकत नाही आणि नुसत्या रचनेला आशयाशिवाय फारसा अर्थ उरत नाही हेही तुमच्या लक्षात आले असेल.

(क) आशय रचना : अर्थ व स्वरूप

मजकूराच्या संदर्भात रचना (= विविध भागांना एकत्र करून केलेली बांधणी) आणि त्यातून व्यक्त होणारा आशय (= हेतू विषय, अर्थ) यांचा संबंध असतो हे लक्षात घेतल्यानंतर आशयाची रचना म्हणजे काय व त्याचे स्वरूप काय ते पुढे मांडले आहे.

चहाचा कप म्हणजे रचना त्या कपातील चहा म्हणजे आशय सुंदरशी पर्स म्हणजे रचना, त्यातील वस्तू म्हणजे आशय. कविता ही रचना तर त्यातील भावना हा आशय, अहवाल/वृत्तान्त/वार्तांकन ही रचना झाली तर त्यात दिलेली माहिती म्हणजे आशय. मजकूर ही रचना तर त्यातील विचार हा त्या मजकूराचा आशय.

आशयामध्ये पुढील गोष्टींचा समावेश करता येईल. माहिती, विचार, भावना, दृष्टिकोन किंवा लेखकाला जे काही सांगायचे ते सर्वकाही. आशय म्हणजे काय हे पुढीलप्रमाणे दाखवता येईल.



आकृती : आशय म्हणजे काय?

मजकूरातील आशयाची रचना आशयाच्या स्वरूपावर अवलंबून असणार हे उघड आहे.

चहासाठी आपण कप किंवा मग वापरू, जेवणासाठी ताट-वाटी असेल, भाज्या घेण्यासाठी पिशवी वापरू तर भेट देण्यासाठी बॉक्स किंवा पाकीट वापरू हे जरी खरे असले तरी कपातल्या चहाला चहापण येण्यासाठी चहा पावडर, साखर, दूध इत्यादी योग्य मिश्रण करून तो तयार करावा लागेल. ताटातील पदार्थांचीही

योग्य मांडणी करावी लागेल. पिशवीत भाज्या भरताना कशाही भरता येणार नाहीत. बॉक्स किंवा पाकिटातील भेटवस्तू आपण कशी ठेवतो याला महत्त्व असतेच. त्याचप्रमाणे मजकूरातील आशयालादेखील एक रचना असते. आशयाची मांडणी मजकूराच्या रचनेला कलात्मकतेला मुलामा देण्याचे काम करते.

मजकूराची दृष्य रचना उदा. शब्द, शब्दसमूह, वाक्ये, परिच्छेद इत्यादी आणि त्यातील आशय उदा. माहिती, विचार, भावना इत्यादी. याचा अभ्यास आपण वाचकाने संपादकाला लिहिलेल्या प्रतिक्रियात्मक पत्राचे विश्लेषण करताना केला आहे.

आता पुढील उतारे वाचा व त्यातील आशय रचनेचा किंवा आशय मांडणीचा विचार करा.

उदाहरण १

''कोकणची किनारपट्टी म्हणजे परमेश्वराने महाराष्ट्राला दिलेली एक स्वर्गीय देणगी आहे. लांबवर पसरलेल्या आंब्यांच्या बागा, सुपारी, पोफळीच्या बागा, सर्वत्र हिरवीगार झाडी, त्यातून जाणारे वळणा वळणाचे तांबडे रस्ते आणि बाजूला पसरलेला अथांग समुद्र, अलिबागहून आपण निघालो की रेवदंडा, मुरूड, दिवे आगार, हरिहरेश्वर, हर्णे, गुहागर त्यानंतर गणपतीपुळे, रत्नागिरी, मालवण आणि वेंगुर्ले असा समुद्राच्या सोबतीने प्रवास हा जीवनातील एक चिरंतन अनुभव असतो. दररोज जेवायला ताजी मासळी म्हणजे 'सोनेमे सुगंध' पावसाळ्यात तर कोकणाचे रूप काही वेगळेच असते. डोंगर टेकड्यांवरून खळाळत येणारे पांढरेशुभ्र धबधबे, असंख्य रानफुलांचे ताटवे आणि वेगवेगळ्या पक्षांचे आवाज मनाला मोहून टाकतात. कोकणाचं हे निसर्गसौंदर्य अबाधित राहील याची आपण सर्वांनी काळजी घ्यायला हवी. कोकणाला भेट देताना आपल्यातला जबाबदार पर्यटक नेहमी जागरूक हवा.''

या उताऱ्यातील आशय रचनेच्या काही नोंदी पुढीलप्रमाणे करता येतील.

(अ) लेखकाला जे काही सांगायचे तो मजकूराचा आशय : कोकण किनारपट्टीचे सौंदर्य

- ★ कोकण किनारपट्टी = एक स्वर्गीय देणगी
- ★ निसर्ग सौंदर्य असलेल्या गोष्टींची यादी
- ★ किनारपट्टीवरील ठिकाणांना भेटी देत प्रवास
- ★ प्रवासाला वैयक्तिक प्रतिसाद
- ★ कोकणचे खास वैशिष्ट्य : ताजी मासळी
- ★ कोकणाचे पावसाळ्यातील रूप
- ★ लेखकाचा इशारा : हे सौंदर्य जपायला हवे.

(ब) मजकूरातील आशय फक्त निसर्ग वर्णन नाही. या निसर्गसौंदर्याला जबाबदारीची जोड आवश्यक आहे या विचाराने वर्णनाचे गांभीर्य जाणवते.

(क) वर्णनातील जीवंतपणा कोकणाचे सौंदर्य डोळ्यासमोर उभे करतो.

(ड) 'अलिबागहून आपण निघालो ...' '..... याची आपण सर्वांनी काळजी घ्यायला हवी.....' 'आपल्यातला जबाबदार पर्यटक नेहमी जागरुक हवा.'

यातील 'आपण सर्वांनी' हे शब्द वाचकाला संबोधतात. त्यामुळे वाचकदेखील वर्णनाचा भाग होतो.

(इ) मजकूराच्या शेवटी जाता जाता सहज केलेली सूचना वाचकाच्या विमर्षणात महत्त्वाची भूमिका करते.

(फ) निसर्गाचे सौंदर्य वर्णन करताना केलेली शब्द योजना आशयाला एक वेगळे परिमाण देते.

आता पुढील मजकूर पाहा.

उदाहरण २

''नोकरी-व्यवसाय किंवा रोजगार यांची सध्याची अवस्था चिंता करायला लावणारी आहे. सरकारी नोकऱ्या तर जवळजवळ नाहीतच. मोठ्या उद्योगांमध्ये यांत्रिकीकरण वाढल्यामुळे त्यांच्यातील नोकऱ्या मर्यादित झाल्या. अनेक उद्योगांनी 'आऊट सोर्सिंग' केल्यामुळे 'कायम' नोकऱ्यांची संख्या कमी झाली. नवीन उद्योगधंदे सुरू होत नसल्याने रोजगार निर्मिती नाही. ज्या नोकऱ्या आहेत त्यात नियमितपणा नाही. पुरेसा पगार नाही. एका नोकरीसाठी प्रचंड स्पर्धा आहे.

खरी परिस्थिती आणखी वेगळी आहे. असे म्हटले जाते की, भारत हा रोजगार, नोकऱ्या नसलेल्यांचा देश नाही; तर रोजगार नोकरीला लायक नसलेल्या लोकांचा देश आहे, आणि हे बऱ्याच प्रमाणात खरे आहे. उद्योगातील अधिकारी व्यक्ती सांगतात की, नोकऱ्या आहेत पण त्यासाठी लागणारे पात्रता असलेले मनुष्यबळ नाही. तरुणांकडे मोठमोठ्या पदव्या असतात पण त्यांनी कोणतेही कौशल्य आत्मसात केलेले नसते. कंपनी, उद्योग व्यवसायात काम करणाऱ्या व्यक्तींकडे पदव्यांपेक्षा कौशल्याची गरज असते.

भारत तरुणांचा देश जरूर आहे. तथापी या तारुण्याला कौशल्याची जोड दिली तर भारत हा एक बलवान देश झाल्याशिवाय राहणार नाही.

या मजकूराच्या आशयाची रचना पुढीलप्रमाणे सांगता येईल.

(अ) मजकूराचा आशय : देशातील नोकरी-व्यवसायाची अवस्था

(ब) सद्यःस्थितीचे निरीक्षण : परिस्थिती चिंताजनक

(क) नोकऱ्या नसण्याची कारणे : सत्यस्थिती

(ड) दुसऱ्या परिच्छेदाची सुरुवात... 'खरी परिस्थिती....' आशयाची तीव्रता वाढविणारी.

(इ) उपलब्ध नोकऱ्या व त्यासाठी लागणारे पात्र मनुष्यबळ यातील विरोधाभास. पदवी आणि कौशल्य यातील तफावत.

(फ) लेखकाचे मतप्रदर्शन

- ★ आशयाच्या माहितीचा क्रम असा दिला आहे की, मजकूराच्या शेवटी लेखक सांगतो तो मुद्दा वाचकाला पटतो.
- ★ शेवटच्या वाक्यामुळे आपण मनातल्या मनात पूर्ण आशयाचा विचार करतो.
- ★ आशय रचनेच्या आणखीही तपशीलाचा विचार करता येईल.
- ★ या दोन उताऱ्यांच्या वाचनानंतर तुमच्या लक्षात आले असेल की, आशयाचे स्वरूप व लेखकाचा हेतू आशयाची रचना ठरवतो.

(ख) आकलनात्मक वाचनाची तंत्रे

मजकूर सर्वार्थाने किंवा हवा तेवढा अथवा आवश्यक तेवढा समजण्यासाठी जे वाचन केले जाते त्याला आकलनात्मक वाचन म्हणता येईल. आकलन म्हणजे समज. ज्या वाचनाने मजकूराबद्दलचा आपला समज वाढतो ते आकलनात्मक वाचन होय.

वाचन हे एक भाषिक कौशल्य आहे. कौशल्य जन्मजात नसते. ते आपल्याला प्रयत्नाने, अभ्यासाने आणि सरावाने आत्मसात करता येते. कौशल्य आपोआप येत नाही ते शिकावे लागते.

आजच्या ज्ञानाधिष्ठित आणि वेगवान जगात वाचन-मजकूराचा स्फोट झाला आहे. कोट्यवधी पाने भरतील किंवा लाखो पुस्तके छापता येतील एवढ्या प्रचंड प्रमाणात वाचनासाठीचा मजकूर उपलब्ध आहे. त्यातील आपल्या आवडीचा मजकूर वाचायचा ठरवला तर उभा जन्म पुरेसा होणार नाही.

कमी वेळात जास्त वाचणे, वाचल्यावर लगेच आकलन होणे आणि आकलन जे झाले त्याची दैनंदिन जीवनातील उपयोगीता लक्षात घेणे ही काळाची गरज आहे. वृत्तपत्रे, गुगल, इंटरनेटवरच्या विविध वेबसाईट्स आणि अगणित पुस्तके, संदर्भसाहित्य यातून आपल्याला आवश्यक ती माहिती वाचावी लागते. त्यासाठी वाचनाचा वेग आणि त्याचबरोबर तितक्याच वेगाने आकलन आवश्यक झाले आहे. चार पाने दोन तास वाचणे, किंवा शंभर पाने वाचूनही त्याचे फारसे आकलन न होणे हे अतिशय थंडपणाचे लक्षण आहे आणि अशा वाचकांना आजच्या जीवघेण्या शर्यतीत स्थान नाही.

यासाठी तुम्हाला वाचनाची विविध तंत्रे समजावून घ्यायला हवीत आणि प्रयत्नांनी ती आत्मसात करावी लागतील. तुमचे व्यक्तिमत्त्व समृद्ध व्हायलाही त्याचा उपयोग होईल.

वाचन तंत्रे

I. स्किमिंग आणि स्कॅनिंग

बऱ्याचदा आपल्याला एखाद्या गोष्टीचा फक्त गोषवारा समजून घ्यायचा असतो किंवा एखादा विषय काय आहे किंवा मजकूराचा थोडक्यात आशय काय आहे याची माहिती हवी असते. शिवाय वेळही कमी असतो. अशा परिस्थितीत मजकूराचा शब्दान्‌शब्द वाचण्याची गरज नसते किंवा तपशिलामध्येही डोके घालण्याची आवश्यकता नसते. मुख्य विषय समजण्यासाठी किंवा त्याची रूपरेषा लक्षात येण्यासाठी बारकाईने न वाचता मजकूर भरभर चाळणे महत्त्वाचे असते. अशा पद्धतीच्या वाचनाला 'स्किमिंग' म्हणतात. To skim म्हणजे द्रवाच्या पृष्ठभागावरील तवंग काढून टाकणे; उदा. दुधावरची साय काढणे म्हणजे दुधातील स्निग्ध व महत्त्वाचा भाग काढणे (उदा. मिळविणे, खाणे, उपयोगात आणणे, ज्या दुधाची साय किंवा मलई काढलेली असते त्याला skimmed milk म्हणतात. त्याचप्रमाणे भरभर वाचून मजकूरातील 'मखसद्' (= मुख्य विषय, गोषवारा) समजून घेण्याऱ्या वाचन प्रक्रियेस स्किमिंग म्हणतात.

या उलट स्कॅनिंग किंवा रीडिंग म्हणजे तुम्हाला हवे ते सापडेपर्यंत मजकूराचा प्रत्येक भाग बारकाईने पाहणे किंवा भरभर तपासणे होय. समजा तुमच्या समोर छत्रपती शिवाजी महाराजांबद्दलचा उतारा आहे. पण तुम्हाला त्यांची जन्मतारीख हवी आहे. तर ''महाराजांचा जन्म १९ फेब्रुवारी १६३० झाला'' अशी माहिती देणाऱ्या वाक्याच्या आणि त्यातील तारखेच्या शोधात तुमची नजर राहील. उर्वरित मजकूरात रस नसल्यामुळे त्यावरून तुम्ही फक्त एक धावती नजर टाकाल. असा प्रसंग अनेकदा येतो. महात्मा गांधींचे पूर्ण नाव 'मोहनदास करमचंद गांधी' हे आहे हे तुम्हाला माहीत असते पण तुम्हाला खात्री करायची आहे. त्यासाठी तुम्ही संबंधित मजकूर मिळवता पण तो सर्व बारकाईने वाचण्याची गरज नसते. त्यामुळे मजकूरावरून तुम्ही भरभर नजर फिरवाल कारण पूर्ण मजकूर वाचणे तुम्हाला गरजेचे नसते. त्यातील नेमकी माहिती हवी असते. सवयीने तुम्ही स्कॅनिंगचे कौशल्य मिळवायला हवे.

II. द्रुतवाचन

वाचन याचा अर्थ लिखित किंवा छापील मजकूर पाहाणे आणि त्याचा अर्थ समजणे. आपण वाचतो म्हणजे शब्द, चिन्हे, वाक्ये इत्यादींनी तयार झालेल्या मजकूराला डोळ्याने पाहतो आणि जे पाहतो त्यातून निर्माण होणारा अर्थ समजावून घेण्याचा प्रयत्न करतो. नुसतेच डोळे मजकूरावरून फिरवणे आणि अर्थ काहीच कळला नाही तर ते वाचन नव्हे. कारण ते निरर्थक आहे. अर्थबोधासह वाचन म्हणजे वाचन. अर्थाशिवाय वाचन हे वाचन नसते.

थोडक्यात, तुम्ही जे वाचता त्याचा अर्थ समजावून घेणे आवश्यक आहे. मजकूरावरून नुसती नजर फिरविणे किंवा मजकूर पाहणे म्हणजे वेळेचा अपव्यय म्हणावा लागेल.

अर्थासह वाचन होणे आवश्यक आहेच; पण अर्थ शोधण्यातच बराच वेळ गेला तर फार वाचन होणार नाही. म्हणून अर्थपूर्ण वाचनाबरोबरच वाचनाला वेग हवा. आजच्या जगात तर आपल्या वाचनाला आवश्यक तेवढी गती असणे महत्त्वाचे आहे. 'आपले म्हणणे थोडक्यात सांगा' हे कौशल्य बोलण्याच्या बाबतीत अपेक्षित

असते तसेच 'मजकूर भरभर वाचा' असेही म्हणता येईल. सर्वसाधारणपणे वाचनाचा वेग पुढील गोष्टींवर अवलंबून असतो.

★ **वाचनाचा हेतू**
- (अ) वेळ घालविणे
- (ब) सहज चाळणे
- (क) अभ्यास करणे
- (ड) मजकूर नीट समजून घेणे

★ **मजकुराचा प्रकार**
- (अ) वृत्तपत्रीय बातम्या, जाहिराती इत्यादी
- (ब) वर्णनात्मक, मनोरंजनात्मक
- (क) सरकारी परिपत्रके, कायदेशीर मजकूर
- (ड) सामाजिक, शैक्षणिक, सांस्कृतिक, वैज्ञानिक इत्यादी विषयासंबंधी

★ **भाषिक काठीण्य**
- (अ) सोपे शब्द, छोटी वाक्ये, सुलभ रचना
- (ब) शब्द बंबाळ, लांबलचक वाक्ये, दुर्बोध वाक्ये
- (क) त्या त्या विषया / आशयानुरूप भाषा उदा. विज्ञान, भूगोल, पाककला इत्यादी

★ **वाचकाची भाषेवरील हुकुमत किंवा वर्चस्व**
- (अ) वाचकाची विविध प्रकारचे वाचन करण्याची सवय
- (ब) शब्दसंग्रह

★ **वाचकाचे वाचन कौशल्य**
- (अ) वाचकाने अनुभवाने वाचन कौशल्य जाणीवपूर्वक बसविलेले असणे
- (ब) शैक्षणिक जीवनात वाचकाला वाचावे कसे याचे शिक्षण मिळालेले असणे

★ **परिस्थितीजन्य घटक**
- (अ) वाचकाचे वय, प्रगल्भता, अनुभव, समज
- (ब) वेळ, स्थळ, बसण्याची सोय, प्रकाश, आजूबाजूचा आवाज
- (क) वाचकाची त्या वेळची मानसिक स्थिती
- (ड) मजकूराचा प्रिंट
- (इ) मजकूर माध्यम : इलेक्ट्रॉनिक, छापील, लिखित

वाचनाचा वेग आणि पर्यायाने आकलन कमी होण्याची कारणे

(अ) प्रत्येक शब्द वाचणे
(ब) वाचताना तोंडातल्या तोंडात पुटपुटणे
(क) एकच वाक्य, परिच्छेद, पान पुन्हा पुन्हा वाचणे
(ड) वाचताना मनातल्या मनात मोठ्याने वाचणे
(इ) ओळींवर बोट किंवा पेन पेन्सिल ठेवत वाचणे
(फ) सलग वाचन न करणे, थोडे वाचले की थांबणे
(स) आपण काय वाचतो, कशासाठी वाचतो यावर नियंत्रण नसणे

वाचनाचा वेग, आकलन आणि दृष्टिक्षेप

वृत्तपत्र वाचनाच्या तुलनेने अभ्यासविषयक, चिंतनात्मक किंवा कठीण विषयाचे वाचन करताना वाचनाचा वेग कमी असणार हे उघड आहे. पम वाचनवेग कमी असला तर आकलन जास्त असते असा आपला गैरसमज

असतो. वाचनाचा वेग जेवढा जास्त तेवढे आकलनही जास्त असते असे संशोधनाने सिद्ध झाले आहे. त्यामुळे हळू, निवांत, शब्दन्‌शब्द, सावकाश, पुन्हा पुन्हा वाचणे म्हणजे मजकूर जास्त चांगला समजणे हे डोक्यातून काढून टाका. चांगले वाचन म्हणजे जास्तीतजास्त वेग आणि जास्तीतजास्त आकलन हे लक्षात ठेवा.

एका दृष्टिक्षेपात आपण किती शब्द पाहू शकतो. त्याला दृष्टिक्षेत्र म्हणतात. ही क्षमता प्रत्येकाची वेगळी असते. काही वाचक एका नजरेत एका वेळी एकच शब्द वाचतात तर काहींची क्षमता त्यापेक्षा जास्त असते. दृष्टिक्षेत्र पुढीलप्रमाणे दाखवता येईल.

★ मंद गतीचे वाचन : एका नजरेत फक्त एकच शब्द

जगात	असा	एकही	प्रश्न	नाही	की	ज्याला	किमान	दोन	उत्तरे	नाही.

★ द्रुतगती वाचन : एका नजरेत एकापेक्षा अधिक शब्द

जगात असा एकही प्रश्न नाही	की त्याला किमान दोन उत्तरे नाहीत.

लक्षात ठेवा

★ वाचनाचा वेग जेवढा अधिक तेवढे आकलन अधिक

★ सवयीने वाचनवेग प्रत्येकाला वाढवता येतो.

★ वेगाने वाचणे नेहमी फायद्याचेच असते.

३ स्तंभवाचन

वृत्तपत्रीय मजकूर उभ्या स्तंभात विभागलेला असतो हे तुम्ही जाणतात. आडव्या मजकूराच्या तुलनेने उभ्या स्तंभाचे लेखन भरभर वाचता येते. कारण दृष्टीची हालचाल भरभर होऊ शकते. उभ्या स्तंभाचे वाचन करताना आपले दृष्टिक्षेत्र, स्तंभामुळे नियंत्रित आणि नियमित होते. असे वाचन सोईचेही वाटते कारण पानभर मजकूरासाठी नजरेची करावी लागणारी ओढाताण या ठिकाणी नसते.

वृत्तपत्रातील स्तंभ वाचनाचे कौशल्य आपण आठवा. आडव्या मजकूराची प्रत्येक ओळ शेवटपर्यंत वाचण्याऐवजी नजरेत उभ्या स्तंभाचा जेवढा मजकूर मावेल तेवढाच मजकूर भरभर वाचला तर मजकूराचा आशय निश्चितच लक्षात येऊ शकतो. बारीकसारीक तपशील कदाचित लक्षात येणार नाही पण मुख्य विषय समजू शकतो.

स्तंभवाचन हे कौशल्य आहे आणि तुम्ही अशा वाचनाचा सराव केला तर तो तुमच्या सवयीचा भाग होईल. अर्थात स्तंभवाचन ही नेहमीच करावी लागणारी गोष्ट नाही. वेळेचा अभाव असेल, मजकूर वाचून लगेच परत लिहायचा असेल, किंवा मजकूरात तुम्हाला फारसा रस नसेल पण सहज म्हणून तो कशाबद्दल आहे हे समजून घ्यायचे असेल त्याच वेळी आपण स्तंभवाचन करतो. एरव्ही नेहेमीप्रमाणेच वाचन करतो.

४. कळीचे मुद्दे वाचन

'कळीचे मुद्दे' म्हणजे महत्त्वाचे मुद्दे' तथापि कुठले मुद्दे कळीचे हे कोण ठरवणार?

वाचन मजकूरातील मुद्दे कळीचे आहेत की नाही हे दोन गोष्टींवर अवलंबून असते.

(१) मजुकराच्या आशयानुसार व मांडणीनुसार त्यातील काही मुद्दे महत्त्वाचे असतात, कारण मजकूरातील विचारांचा ते भाग असतात. म्हणजे लेखकाला जे विचार भावना व्यक्त करायच्या आहेत किंवा माहिती द्यायची आहे, अनुभव शेअर करावयाचे आहेत त्यादृष्टीने त्याने मांडलेले मुद्दे महत्त्वाचे असू शकतात.

उदा. ''चुका प्रत्येकाकडून होतात. चुका न करणारी व्यक्ती शोधूनही सापडणार नाही. ज्याच्या हातून चुका होत नाहीत किंवा होणारच नाहीत असे कोण असू शकते? इंग्रजीत एक म्हण आहे. To err is human, to forgive, devine! म्हणजे चुक करणे माणसाचा धर्म आहे आणि क्षमा करणे हा माणसाचा मोठेपणा आहे. खरं म्हणजे जे काम करतात तेच चुकाही करतात. काहीच केले नाही तर चुका करण्याचा किंवा चुका होण्याचा प्रश्नच नाही. जो चालत राहतो तोच रस्ताही चुकू शकतो. जो बाहेर पडत नाही कोठेच जात नाही तो रस्ता चुकण्याचा काय प्रश्न आहे? चुका करणे हे क्रमप्राप्त असले तरी त्या समजून घेणे, त्यात सुधारणा करणे व त्या पुन्हा होऊ न देणे हे आपण करायला हवे. जो चुकांपासून शिकतो, त्या पुन्हा होणार नाही याची काळजी घेतो तो आयुष्यात पुढे जातो.''

या उताऱ्यात मजकूराच्या रचनेच्या दृष्टीने प्रत्येक मुद्दा महत्त्वाचा आहे. कारण एका मुद्यातून दुसरा मुद्दा निघतो व तो अगोदरच्या मुद्याशी निगडित असतो. 'चुका प्रत्येकाकडून होतात.' यातूनच पुढचा मुद्दा निघतो 'चुका न करणारी व्यक्ती शोधूनही सापडणार नाही.' आणि हा मुद्दा पहिल्या मुद्याशी निगडित आहे. त्याचप्रमाणे 'खरं म्हणजे जे काम करतात तेच चुकाही करतात' आणि त्यापुढील मुद्दा. अर्थात मजकूराच्या आशयानुसार व मांडणीनुसार सगळेच मुद्दे महत्त्वाचे असतील असेही नाही.

या ठिकाणी तुम्ही लक्षात ठेवायला हवे की, मजकूराच्या आशयानुसार मजकूराच्या मांडणीत काही मुद्दे कळीचे असतात. प्रत्येक ओळ महत्त्वाची असेल असे नाही.

(२) वाचकाच्या वाचनाचा हेतू काय यावरही कुठला मुद्दा कळीचा हे अवलंबून असते. एखाद्याने हे सहज म्हणून वाचले आणि लेखकाला काय सांगायचे आहे किंवा त्याने काय विचार व्यक्त केले आहे याबद्दल फारशी चिंता केली नाही तर त्याला काहीच महत्त्वाचे वाटणार नाही. वाचकाच्या स्वतःबद्दलच्या काय कल्पना आहेत हेही महत्त्वाचे असते. 'मी कधीच चुकत नाही' किंवा 'मी करतो ते सगळे बरोबरच असते' असे मानणारा वाचक या मजकूराबद्दल काय विचार करील? वाचकाला या मजुकराचे किती आकलन होते याला तर खूपच महत्त्व आहे. मजकूरच नीट समजला नाही आणि लेखकाला काय म्हणायचे आहे हेच नीट समजले नाही तर कळीचा मुद्दा कोणता हे समजण्याचे काही कारण नाही.

एकंदरित, वाचकाची प्रगल्भता, अनुभव, आवडी-निवडी, शिक्षण, दृष्टिकोन यावर त्याचे आकलन अवलंबून असेल. त्यामुळे आशय आणि त्याची मांडणी यांच्या दृष्टीने काही मुद्दे महत्त्वाचे असले तरी वाचकाला ते किती समजतात यावर बरेच काही अवलंबून असते.

बऱ्याच वेळा वैज्ञानिक काय सांगतात? विचारवंत काय म्हणतात? सरकारी प्रतिनिधी काय म्हणतात? त्या त्या विषयातील किंवा क्षेत्रातील व्यक्ती काय म्हणतात? हे आपल्यापैकी सर्वांनाच समजते असे नाही. अल्बर्ट आईस्टाईन एका ठिकाणी म्हणतात 'ज्या दिवशी शेवटच्या मधमाशीचा मृत्यू झालेला असेल त्या दिवशी या पृथ्वीचा विनाश झालेला असेल'. एखाद्या मजकूरात हा किती प्रचंड कळीचा मुद्दा असायला हवा. पण तो समजेल तरच ना? किंवा स्टिफन हॉकिन्स म्हणतात 'अजून फार तर शंभर वर्षे पृथ्वी राहण्यासारखी (liveable) असेल.' त्यांच्या लिखाणातला हा फारच मोठा कळीचा मुद्दा आहे. पण वाचकाला तो कळायला हवा.

जो मुद्दा, जो विचार आशयाच्या दृष्टीने महत्त्वाचा असेल, वाचन मजकूराच्या मांडणीत तर्कसंगत असेल, अनेकांच्या दृष्टीने तोलामोलाचा असेल तो एखाद्या वाचकाला फारसा महत्त्वाचा वाटेलच असे नाही.

बऱ्याचदा कळीचा मुद्दा मजकूराच्या पलीकडे असतो आणि वाचकाला तो अनुमानाने (infrerence) शोधावा लागतो किंवा कल्पनेने, मनाने समजावून घ्यावा लागतो. (through perception).

कुलकर्णी काका : पिंटू, माझ्याकडे सहा पेरू आहेत. त्यातील दोन खाऊन टाकले तर किती शिल्लक राहतील?

पिंटू : मला नाही सांगता येणार.

कुलकर्णी काका : का रे?

पिंटू : कारण आमच्या शाळेतील बाई अंजिर किंवा सफरचंद गणितात वापरतात. पेरू नाही!

या अत्यंत साध्या, सोप्या, बालीश वाटणाऱ्या मजकूरातून आपल्याला आपल्या शिक्षणाची विदारक स्थिती दिसायला हवी. यातून लेखकाने शिक्षणावर जे भाष्य केले आहे, उपहासाने विनोदाने जे काही म्हटले आहे ते कळण्याइतकी पात्रता वाचकाकडे असली पाहिजे.

वाचन करताना मजकूरातील सर्वांत महत्त्वाचा मुद्दा (central point) कोणता, त्याच्या संबंधीचे आणखी महत्त्वाचे मुद्दे कोणते, लेखकाला काय म्हणायचे आहे याचा विचार करण्याचे आणि मुद्देसुद वाचन करण्याचे कौशल्य तुम्ही आत्मसात करायला हवे. यासाठी मन लावून वाचणे व थोडेसे वाचून झाल्यावर आपण काय वाचले असे स्वतःला विचारणे, यात महत्त्वाचा मुद्दा कोणता आहे याचा विचार करणे गरजेचे आहे. अर्थबोध लक्षात न घेता केलेले वाचन म्हणजे वेळेचा अपव्यय असतो.

वाचताना तुम्हाला जे महत्त्वाचे वाटते त्याची नोंद करून ठेवणेही फायद्याचे असते. काही वाचक मजकूरावरच पेनने किंवा पेन्सिलने त्यांना महत्त्वाच्या वाटणाऱ्या शब्दांखाली किंवा वाक्यांखाली रेषा ओढून ठेवतात. असे करणे म्हणजे पुस्तकाबद्दल, लेखकाबद्दल, मजकूराबद्दल अनादर दाखविणे होय.

लक्षात ठेवा

- ★ आशयरचना व मजकूराची रचना यांचा संबंध
- ★ आशयरचनेचे घटक
- ★ आकलनात्मक वाचनाची तंत्रे
- ★ 'दृष्टीक्षेत्र' संकल्पनेचा अर्थ
- ★ वाचताना कळीचे मुद्दे लक्षात घेण्याचे कौशल्य कसे आत्मसात कराल?

थोडक्यात

आशयरचना व्यक्त होण्याच्या दृष्टीने मजकूराची रचना केली जाते. त्यामुळे मजकूराची विशिष्ट रचना ही आशयाची रचना कशी करायची यावर अवलंबून असते. माहिती, विचार, भावना, दृष्टिकोन, लेखकाचा किंवा लेखनाचा हेतू व रचनेतून व्यक्त होणारे सर्व आशय रचनेचे घटक असतात.

स्किमिंग (वरवरचे वाचन), स्कॅनिंग (सखोल वाचन), द्रुत वाचन, स्तंभ वाचन, कळीचे वाचन ही सर्व आकलनात्मक वाचनाची तंत्रे होत.

एका दृष्टिक्षेपात आपण किती शब्द पाहू शकतो त्याला दृष्टिक्षेत्र म्हणतात. वाचकांना कळीचे मुद्दे लक्षात येण्यासाठीचे कौशल्य आत्मसात करण्यासाठी मजकूर व्यवस्थित वाचून नीट समजून घ्यावा, थोडेसे वाचून झाल्यावर थोडा वेळ (pause) थांबून आपण काय वाचले याचा विचार करावा. आपण जे वाचले त्यातील महत्त्वाचे मुद्दे, विचार, भावना कोणत्या याचा विचार करावा. शक्यतो महत्त्वाचे मुद्दे लिहून ठेवावेत.

३.२.८ वाचन व लेखनातील संबंध जोडणी

वाचन आणि लेखन यांचा जवळचा संबंध आहे. आपण जे वाचतो त्यामुळे आपल्या मनात विचारतरंग निर्माण होतात. वाचनमजकूरातील काही गोष्टींचा आपण खोलवर जाऊन बारकाईने विचारही करतो. या चिकित्सापूर्ण व सर्वस्पर्शी विचार प्रक्रियेलाच विमर्शण म्हणतात. विमर्शणात अनेक पैलू असतात. त्यापैकी एक

पैलू म्हणजे वाचकाला लेखनप्रवृत्त करणे. वाचल्यानंतर त्याबद्दल किंवा त्यासंबंधीच्या विषयावर किंवा विचारावर, अनुभवावर, घटनेवर लिहिण्याची इच्छा होणे हा विमर्शणाचाच परिणाम असतो. जे लेखन केले जाते ते वाचन संस्कृतीचा भाग होऊन राहते. जे लिहिले ते कधी तरी, कुणीतरी वाचणारच आणि जो त्याचे वाचन वरील त्याच्या मनात विचारांचे वादळ, विचारांचे काहूर, विचारांचा महापूर, विचारांचे सुंदर पीक किंवा विचारांची, भावनांची प्रसन्नता येतच राहणार.

वाचन व लेखन यांचा संबंध समजून घेणे तुम्हाला नक्कीच आवडेल. वाचनाने लेखनाला चौफेरपणा येतो व लेखन समृद्ध होत जाते लेखनामुळे वाचकांच्या वाचन अभिरुचीची वाढ होत राहते. लेखन किती कसदार आहे आणि त्याला खरेपणाचा किती स्पर्श झालेला आहे यावर वाचनाची पातळी अवलंबून असते.

(क) वाचन व लेखन सहसंबंध

वृत्तपत्रीय लिखाण वाचून वाचकांनी केलेला पत्रव्यवहार हे वाचन व लेखन सहसंबंध दाखविणारे एक चांगले, नेहमीचे व सर्वांच्या परिचित असे उदाहरण म्हणता येईल. मासिकामधील लेख, कथा इत्यादी वाचून वाचक आपली प्रतिक्रिया लेखकाना, प्रकाशकाला कळवीत असतात. वाचनामुळे वाचनमजकुरासंबंधी वाचकाला जे वाटते किंवा त्याच्या मनात जी प्रतिक्रिया उमटते ती लेखन स्वरूपात प्रतिसाद म्हणून कळविणे अशी अनेकांची इच्छा असली तरी प्रत्यक्षात लिहिण्याचे काम फारच थोडे वाचक करतात असा सार्वत्रिक अनुभव आहे. वाचन केल्यावर त्यावर प्रतिक्रिया किंवा प्रतिसाद लिहून काढणे हे सोप वाटत असले तरी त्याला प्रचंड मानसिक ताकद लागते. त्यामुळेच वाचन सगळेच करतात पण लेखन करणाऱ्यांची संख्या फारशी नसते.

व्हॉटस्ॲपवर आपल्याला दिवसाकाठी अनेक सुंदर विचार, सुविचार, विनोद, छोट्या-मोठ्या गोष्टी, माहितीपर लिखाण प्राप्त येते. त्यातील वेळ मिळेल तसे काही वाचतो. त्यासंबंधी आपण विचारही करतो. वाचन केले की विचार आलेच. पण त्यावर प्रतिक्रिया कळविण्याच्या ऐवजी आलेला मेसेज तसाच पुढे फॉरवर्ड करतो. लिखित स्वरूपात अशा प्रकारच्या लेखनाला प्रतिसाद देणारे फारसे कुणी नसतात. पण अशा प्रकारच्या वाचनाने लिखाणाची ऊर्मी येते हेही तितकेच खरे.

'आनंदी जगण्याची कला' या विषयावर (वृत्तपत्रात किंवा मासिकात मजकूर तुम्ही वाचला तर काय होईल? या लिखाणातील पुढील मजकूराकडे तुम्ही जास्त आकर्षित झालात असे समजा.

''आनंदी असणे हा जीवनाचा पाया आहे. तुम्ही कपडे किती उंचीचे वापरता, तुमचा मोबाईल किती किमतीचा आहे, तुमचे बूट कोणत्या कंपनीचे आहेत किंवा तुमची दुचाकी किती महागडी आहे यापेक्षा तुमचे मन किती आनंदी आहे हे महत्त्वाचे रात्री तुम्ही समाधानी शांत मनाने सोप घेऊ शकता का? हे तुमच्या आनंदी जीवनाचे गुपित असते.''

यावर तुम्ही विचार करता. कळत नकळत स्वतःची चाचपणी करता. तपासणी करता. विचारांची एक शृंखला तुमच्याही मनात गुंफण घेऊ लागते. लेखातला विचार तुम्हाला पटतो. यासंबंधीचा आपल्या मनातील विचारही आपण इतरांना सांगावा अशी तीव्र इच्छा होते व तो विचार तुम्ही लिहिता.

संपादक महोदय

'आनंदी जगण्याची कला' हा लेख खूप आवडला. खरं म्हणजे कुठल्याही गोष्टीपासून मिळणारा आनंद क्षणिकच असतो. पण त्यापासून मिळणारे समाधान चिरंतन असते. जेवणाचा आनंद आपण सर्वच घेतो पण त्यापासून समाधान मिळणारे किती असतात? शेवटी काय जाताना आपण आपल्या अंगावरचा कपडाही नेऊ शकत नाही. म्हणून माझ्या मते मला काय मिळवायचे आहे त्या आनंदात न राहता माझ्याजवळ या क्षणी काय आहे त्यात समाधानी असणे हे खरे आनंदी जगण्याचे लक्षण आहे.'

तुमच्यात लिखाणाची जी ऊर्जा आहे ती वाचनामुळे सक्रिय झाली आणि तुमच्या मनातल्या भावना, विचार तुम्ही शब्दबद्ध केले. तुम्ही वाचन किती मनापासून करता, सहृदयतेने करता यावर तुमचा प्रतिसाद अवलंबून असतो. तुमची प्रतिसादाची भावना किती तीव्र आहे यावर तुमचे लिहिणे अवलंबून असते.

जे लिखाण तुमच्या मनाचा ठाव घेते, तुमच्या भावनांना हात घालते, विचारांना साद घालते ते लिखाण तुम्हाला भावते. त्याचबरोबर तुमच्या वाचनाची अभिरुची वाढवते. वाचन आणि लिखाण एकमेकांना पूरक असते.

वाचन व लेखन यांचा फक्त 'संबंध' नसतो तर तो 'सहसंबंध' असतो. लेखनाच्या अस्सलपणावर वाचकांची भिस्त असते. अस्सल, प्रामाणिक, जिवंत लेखन वाचकांना आकर्षित करते. त्याचप्रमाणे मनापासून केलेले वाचन लिखाणाला प्रवृत्त करते तसेच लिखाणाची दिशाही ठरवते.

(ख) प्रक्रिया लेखन, अर्थ व स्वरूप

प्रक्रिया (process) म्हणजे विशिष्ट हेतूने तुम्ही केलेल्या गोष्टींची मालिका वाचन केल्यावर किंवा वाचन करीत असताना आपल्या मनात विचारप्रक्रिया सुरू होते. या विचार प्रक्रियेतून जे लेखन जन्माला येते त्याला 'प्रक्रिया लेखन' म्हणता येईल. वाचनाने निर्माण होणाऱ्या प्रक्रियेत पुढील गोष्टींचा समावेश होतो.

- ★ मिळालेली माहिती, अनुभव इत्यादी समजावून घेणे
- ★ त्यांची छाननी करणे किंवा विश्लेषण करणे
- ★ स्वतःच्या माहितीशी, अनुभवाशी त्याची तुलना करणे
- ★ सकारात्मक किंवा नकारात्मक प्रतिसाद मनात तयार होणे
- ★ प्रतिसाद शब्दबद्ध करणे

वरील प्रक्रियेतून (process) जे लिखाण निर्माण होते त्याला आपण प्रक्रिया लेखन म्हणतो.

दैनंदिन जीवनामध्ये आपल्याला विविध प्रकारचे प्रक्रिया लेखन करावे लागते. उदाहरण लाईट बिल आले की आपण ते प्रथम वाचतो किती रुपये बिल आले? आलेले बिल हे किती युनिटस्साठी आहे? फक्त विजेच्या वापराचे बिल वगळता इतर कोणकोणत्या गोष्टींसाठी पैशाची आकारणी केली आहे? बिलावर दिलेली माहिती आपण समजावून घेतो. मनातल्या मनात त्या माहितीची शहानिशा करतो. 'बिल फारच आले, पण उन्हाळा ाला की, फॅनस्, कुलर्स इत्यादी भरपूर वापरले जातात. सुटीनिमित्त पाहुणे असल्याने ग्राइंडर, ओव्हन, वॉशिंग मशीन, पाण्याची मोटार, दिवे यांचाही वापर वाढतो. अंदाजाने आपण विजेच्या वापराची छाननी करतो व बिल भरण्याच्या तयारीचा प्रतिसाद तयार करतो व शेवटी प्रत्यक्ष रांगेत उभे राहून किंवा पेटीयमच्या सहाय्याने भरणा करतो. इथे लिखाणाचा संबंध नाही पण या उदाहरणाने एखादी गोष्ट वाचली तर प्रतिसादाची प्रक्रिया कशी सुरू होते हे तुमच्या लक्षात येईल.

तुमच्या घरासंबंधी तुम्हाला नगरपालिका किंवा ग्रामपंचायतीची नोटीस आली किंवा कर्जासंबंधी बँकेचे पत्र आले किंवा तुमच्या पाल्यासंबंधी शाळेचे काही पत्र आले तर ते नीट वाचून संबंधित माहिती लक्षात घेऊन तुमचा प्रतिसाद तुम्हाला काळजीपूर्वक व जबाबदारीने नोंदवावा लागेल तुम्ही जे लिहाल त्यावर बरेच काही अवलंबून असेल. काही प्रसंगी लिहिण्यापूर्वी तुम्हाला एखाद्या माहितगाराचा सल्ला घ्यावा लागेल. पोलीस, गुन्हा, कोर्ट-कचेरी यासंबंधीचे लिखाण तर आपल्याला वकिलाच्या सल्ल्याने करणे श्रेयस्कर असते. कारण या सगळ्या प्रकारच्या लेखनापूर्वी एक प्रक्रिया घडत असते. ही प्रक्रिया कशी घडते यावरच त्यासंबंधीचे लिखाण अवलंबून असते.

प्रक्रिया लेखनाचा अर्थ व स्वरूप स्पष्ट करणारी आणखी काही उदाहरणे पाहू. कल्पना करा की, तुम्हाला मराठी-इंग्रजी शब्दकोश तयार करायचा आहे. अर्थात असा शब्दकोश निर्माण करायला अनेक कौशल्ये अंगी असण्याची आवश्यकता असते. उदा. अशा व्यक्तीचे मराठी व इंग्रजी या दोन्ही भाषांवर प्रभुत्व हवे. भाषेबद्दलची माहिती हवी. उदाहरण बोलीभाषा, प्रमाणभाषा इत्यादी. शब्दांचे बारकावे, त्यांची रचना याबद्दल ज्ञान हवे. कुठला शब्द किंवा शब्दसमूह याचा वापर कुठल्या संदर्भात कसा केला जातो याबद्दलचे निरीक्षण हवे.

सगळ्यात महत्त्वाचे म्हणजे यासाठी प्रचंड वाचन करावे लागेल. त्या वाचनातून शब्दकोशासाठी प्रक्रिया लेखन होईल. म्हणजे शब्दकोशाच्या लेखनापूर्वी वाचनाकडे जावे लागेल. ह्या वाचनाला एक हेतू असेल, एक दिशा असेल आणि हे वाचन निवडक असेल. शब्दकोशाचे लेखन करण्यासाठी तुम्हाला पुढील गोष्टींसंबंधीचे वाचन करावे लागेल. त्यात काही तात्त्विक किंवा सैद्धांतिक तसेच व्यवहार्य गोष्टींचाही समावेश असेल.

- ★ शब्दकोश म्हणजे काय?
- ★ तो तयार करण्याच्या प्रचलित पद्धती कोणत्या?
- ★ तो किती मोठा असावा? किती पानांचा?
- ★ किमान किती शब्दांचा समावेश असावा?
- ★ कोणत्या शब्दांचा समावेश असावा?

शब्दकोश हा संदर्भग्रंथच असल्यामुळे बाजारामध्ये या स्वरूपाचे कोणते शब्दकोश आहेत? त्यांचे सर्वेक्षण करावे लागेल. अभ्यास, वाचन करावे लागेल. त्यानंतर काही निश्चित निर्णय घ्यावे लागतील की, कोणत्या शब्दांना शब्दकोशात स्थान द्यावे लागेल.

शब्दकोशाची निर्मिती ही एक प्रक्रिया असेल आणि या प्रक्रियेत वरील अनेक गोष्टींचा समावेश असेल. त्यात अखंड व निवडक वाचनाचा भाग मोठा असेल. या ठिकाणी शब्दकोश तोही द्वैभाषिक शब्दकोश निर्मितीच्या इतर तपशिलात जाण्याची आवश्यकता नाही. तुम्ही एवढेच लक्षात ठेवायला हवे की, एका विशिष्ट प्रक्रियेतून लेखननिर्मिती होते आणि असे लेखन करण्याची, वाचनाची नितांत गरज असते. वाचन आणि लेखन यांचा संबंध किती परस्परपूरक असतो हे तुमच्या लक्षात आले असेलच.

आणखी एक उदाहरण पाहू. खरं म्हणजे तुम्ही हा प्रयोग करून पाहायला हरकत नाही. यातून वाचन व लेखन यांचा संबंध तसेच प्रक्रियालेखन म्हणजे काय हे तुमच्या लक्षात येईल. तुमच्या जन्मगावाविषयी तुम्हाला एक छोटे पुस्तक लिहायचे आहे अशी कल्पना करा. मनात आले आणि पुस्तक तयार झाले असे तर होणार नाही. त्यासाठी केवळ विचार करून भागणार नाही तर अनेक गोष्टींचा अभ्यास करावा लागेल. वाचन करावे लागेल. तुमच्या गावाबद्दल यापूर्वी कुणी काही लिहिले आहे का हे पाहावे लागेल. त्याला काही ऐतिहासिक महत्त्व असेल तर इतिहासाची पाने चाळावी लागतील. त्याचा भूगोल समजून घ्यावा लागेल. सामाजिक, परंपरा, प्रथा, यांचा शोध घ्यावा लागेल. थोडक्यात, तुमच्या गावासंबंधीची लिखित माहिती मिळवून ती वाचावी लागेल. धार्मिक, सामाजिक, राजकीय संदर्भांचा अभ्यास करावा लागेल. वाचन करावे लागेल. बरेच वाचन केल्यावर तुमच्या मनात आपल्या गावाबद्दलच्या पुस्तकलेखनाची प्रक्रिया सुरू होईल. या प्रक्रियेत पुस्तकाची रूपरेषा तयार होईल तसेच लेखनाचा अंदाजही येईल. विविध गोष्टींच्या सततच्या वाचनातून जी प्रक्रिया सुरू होईल त्यातून लेखनाच्या पुढील बाजू आकार घेऊ लागतील.

- ★ गावाचे नाव कसे पडले? त्याचा अर्थ काय? त्याला काही ऐतिहासिक, सामाजिक किंवा धार्मिक संदर्भ आहे काय?
- ★ गावाची रचना : घरकुलांची संख्या, लोकसंख्या, सामाजिक सलोखा, धार्मिक कार्यक्रम इत्यादी
- ★ होऊन गेलेली मोठी माणसं, महत्त्वाच्या संस्था
- ★ महत्त्वाची ठिकाणं – धार्मिक, ऐतिहासिक इत्यादी
- ★ गावाची वैशिष्ट्ये, गावाचं वेगळेपण
- ★ भविष्यातील गाव

वरील सर्व गोष्टी लेखनापूर्वीच्या पण लेखनासाठीच्या प्रक्रियेतून निर्माण झालेल्या असतील. त्यासाठी तुम्ही आवश्यक ते सर्व संदर्भ चाळलेले असतील, अनेक गोष्टींचे वाचन केलेले असेल, त्यामुळे तुमच्या मनात पुस्तकासंबंधी प्रक्रिया सुरू झालेली असेल. जे पुस्तक तुम्ही लिहाल ते या प्रक्रियेमुळे अस्तित्वात आलेले असेल.

सुरुवातीला सांगितल्याप्रमाणे वाचनातून प्रक्रिया सुरू होते व या प्रक्रियेचे पुढे लिखाणात रूपांतर होते. प्रक्रियेतून लेखन तयार होते आणि प्रक्रियेसाठी वाचनाची आवश्यकता असते. मराठी-इंग्रजी शब्दकोश व तुमच्या जन्मगावाबद्दलचे पुस्तक यांच्या उदाहरणावरून तुमच्या लक्षात आले असेल की, जाणीवपूर्वक लिखाण करायचे असेल तर त्यासाठी जाणीवपूर्वक, योजनाबद्ध रितीने वाचन करावे लागते. त्या वाचनातून आपल्याला जे लिहायचे त्याची प्रक्रिया मनात सुरू व्हावी लागते. या प्रक्रियेत आपल्याला करावयाच्या लेखनाची रूपरेषा तयार होते व प्रत्यक्ष लेखन हे अशा प्रक्रियेचा शेवट असतो.

३.२.९ सहेतुक लेखन

(क) सहेतुक लेखन : अर्थ व स्वरूप

जाणीवपूर्वक विशिष्ट हेतू मनात ठेवून केलेल्या लेखनाला सहेतुक लेखन म्हणता येईल.

काही ना काही लिहिण्याचे प्रसंग आपल्यावर नेहमीच येतात. कुणीही सहसा विनाकारण लिहीत नाही. आपण जे लिहितो त्याला काहीतरी कारण असते. आपण आपला पत्ता जरी लिहिला तरी त्याला कारण असते. तो कुणालातरी द्यायचा असतो. जेवढे एकूण लिखाण केले जाते त्यातील बहुतांश लिखाण हे सहेतुक असते. त्या तुलनेने कलात्मक लिखाणाचे प्रमाण फार कमी असते. कलात्मक लिखाणात कथा, कांदबऱ्या, नाटके इत्यादींदेखील काहीतरी हेतू असतो.

सहेतुक लेखनाचे स्वरूप व प्रकार

★ शैक्षणिक लेखन

शैक्षणिक क्षेत्रात अध्ययन आणि अध्यापनासाठी म्हणून जे काही लेखन केले जाते त्यामागे एक विशिष्ट शैक्षणिक हेतू असतो. शालेय, महाविद्यालयीन किंवा उच्च शिक्षणासंबंधीच्या सर्व लिखाणात एक उद्देश्य असतो. इतिहास, भूगोल, विज्ञान, गणित, मानव्यशास्त्रे इत्यादी संबंधीच्या सर्व लेखनामागे काही प्रयोजन असते. पाठ्यक्रमात या उद्देश्यांचा उल्लेख केलेला असतो व त्यानुसारच पाठ्यपुस्तके, स्वयं-अध्ययनासाठीची पुस्तके इत्यादी लेखन केले जाते. उद्देशविरहित लेखन शिक्षणक्षेत्रात सहसा सापडणार नाही.

★ सरकारी कचेऱ्या आणि उद्योगव्यवसाय क्षेत्रातील लिखाण

ग्रामपंचायती, नगरपालिकांपासून दिल्लीतील कचेऱ्या, त्यातील परिपत्रके, निवेदने इत्यादी सर्व औपचारिक लेखनामागे निश्चित असा हेतू असतो. उद्योगजगतातील प्रकाशित साहित्य, माहितीपत्रके इत्यादी सर्वकाही व्यावसायिक हेतूनेच केले जाते. सरकारी यंत्रणा, त्यासंबंधीचे प्रशासन, उद्योगांचे व्यापारांचे व्यवस्थापन, कायदे-कानून, कोर्ट-कचेऱ्या, बँका, पोस्ट ऑफिस इत्यादी मध्ये होणारे सर्व लेखन हेतूतःच केलेले असते हे तुमच्या एव्हाना लक्षात आले असेल.

★ वृत्तपत्रीय लेखन

ठिकठिकाणच्या बातम्या लोकांपर्यंत पोचविण्याच्या हेतूने वृत्तपत्रातील प्रत्येक गोष्टीचे लेखन केले जाते. संपादकीय, विशिष्ट विषयावरील लेख, माहितीवजा लेखन, संपादकांना लिहिलेली पत्रे, जाहिराती या प्रत्येक लेखनाचे एक विशिष्ट प्रयोजन असते. सहज म्हणून कुणी काही छापत नाही.

★ साहित्यिक लेखन

साहित्यातील बहुतेक लिखाण हे प्रतिभासंपन्न व अनुभवी व्यक्तींनी केलेले असते. कथा, काव्य कादंबऱ्या किंवा नाटके यात 'मला काही सांगायचे' असा लेखकाचा सरळ-सरळ हेतू नसला तरी 'मला जो अनुभव आला तो तुमच्याशी 'शेअर' करावा' असा हेतू असतोच. अनुभवाचे सादरीकरण करताना लेखक तो अनुभव कलात्मक पातळीवर घेऊन जातो कारण कलाकृतीची निर्मिती परिणामकारक होणे त्याच्या दृष्टीने महत्त्वाचे असते. त्यामुळे कुणाला काही सांगायचे किंवा शिकवायचे हा मुद्दा अतिशय गौण ठरतो. 'साहित्यातून

समाजप्रबोधन' काही लेखकांच्या बाबतीत शक्य आहे पण हे सर्वच लेखक, कवी, नाटककार यांना लागू होणार नाही. 'नटसम्राट'मधील बेलवलकरांचे स्वगत, 'कुणी घर देता का घर' चा अनुभव कुसुमाग्रज इतक्या काव्यात्मक पद्धतीने मांडतात की, तो आपल्या हृदयाला पीळ पाडतो. त्यातून काय शिकायचे ते वाचक किंवा प्रेक्षक न कळत शिकतही असेल पण लेखकाचा मात्र असे काही शिकविण्याचा हेतू नसतो.

तथापि साहित्यातील काही वाङ्मय प्रकार विशिष्ट हेतूने हाताळले जाऊ शकतात किंवा ज्या लेखनामागे काही हेतू असू शकतो. उदाहरण चरित्रे, आत्मचरित्रे, प्रवासवर्णने, संत वाङ्मय किंवा धार्मिक लेखनात लोककल्याणाचा हेतू निश्चितच असतो. अगदी बालवाङ्मयाचा हेतूदेखील लहान मुलांचे मनोरंजन करणे व त्यातून त्यांना काही गोष्टी शिकवणे, मार्गदर्शन करणे असा असतो. कुठल्याही साहित्यिक कलाकृतींचे वाचन केल्याने आपले मनोरंजन होते. आपल्याला माहितीचा खजिना मिळतो तसेच जीवनाकडे बघण्याची आपली दृष्टी अधिक व्यापक होते व आपण अनुभवसंपन्न होतो. त्याचबरोबर साहित्याचा हेतूही सफल होतो.

ह्या सर्व चर्चेनंतर तुमच्या लक्षात आले असेलच की, कुठल्याही लेखनाचे स्वरूप हे त्याच्या हेतूवर अवलंबून असते. मुलांना चांगले मराठी यावे या हेतूने मराठीच्या पाठ्यपुस्तकातील धडे व त्यासंबंधीचे अभ्याससाहित्य तयार केलेले असते. खाद्य पदार्थांची विक्री करायची असेल तर आमच्याकडे कोणते पदार्थ आहेत, ते किती चवदार व स्वस्त आहेत अशी जाहिरातवजा मांडणी केली जाते. सहलीला जाण्यापूर्वी विद्यार्थ्यांनी कुठल्या गोष्टी लक्षात घेतल्या पाहिजे हे सांगण्यासाठी 'सूचनापत्रक' तयार करावे लागते. वाचकांनी वृत्तपत्र वाचायचे असेल तर सनसनाटी बातम्या कशा तयार कराव्यात याचेदेखील 'ट्रेनिंग' घ्यावे लागते. नाटकाला, टीव्ही. मालिकेला, प्रेक्षक मिळायचे असतील तर त्यांच्या संहितेचे लिखाण काळजीपूर्वक करावे लागते. पृथ्वी आणि सूर्य यांच्यातील प्रेयसी आणि प्रियकर या नात्यांची अनुभूती घेताना 'पृथ्वीचे प्रेमगीत' हे अजरामर काव्य जन्माला येते. अत्यंत गरिबांची परिस्थिती असताना सर्वसामान्य वाटणाऱ्या माझ्या वडिलांनी मला कसे घडविले हा असामान्य अनुभव मांडतांना नरेंद्र जाधव 'आमचा बाप आन् आम्ही' या कलाकृतीची निर्मिती करतात.

हेतूनुसार कुठल्याही लिखाणाची मांडणी केली जाते हे उपरोक्त चर्चेनुसार तुम्हाला समजले असेल. प्रश्न नुसत्या मांडणीचा नाही, भाषाशैलीही लेखनाच्या हेतूनुसार वेगवेगळी असते. सरकारी परिपत्रक, जाहिरात, जगप्रवासाचे माहितीपत्रक, कविता, वैचारिक लेख, कादंबरी या सर्वांची भाषा वेगळी आसणारच ही गोष्ट तुम्ही लक्षात घ्यायला हवी. लेखनाची प्रवृत्ती, शब्दयोजना, वाक्यरचना, विषयाची मांडणी, लेखकाची लेखनातील उपस्थिती यांचे स्वरूप लेखनाच्या किंवा लिहिणाऱ्याच्या हेतूवर अवलंबून असते.

लक्षात ठेवा

(१) वाचनामुळे विमर्शण होते. वाचकाला लेखनप्रवृत्त करण्यासाठी विमर्षण कारणीभूत ठरू शकते. उदा. वृत्तपत्र, लेख इत्यादी वाचून केलेला वाचकांचा पत्रव्यवहार.

(२) 'प्रक्रिया' (process) म्हणजे विशिष्ट हेतूने केलेल्या गोष्टींची मालिका. वाचनाने आपल्या मनात विचार प्रक्रिया सुरू होते. या विचार-प्रक्रियेतून जे लिखाण जन्माला येते त्याला 'प्रक्रिया लेखन' म्हणतात.

(३) मजकूर वाचल्यानंतर संबंधित मजकूरासंबंधी विचार प्रक्रिया सुरू होऊन किंवा झाल्यावरच प्रतिसाद म्हणून लेखन केले जाते हे दाखविणारी उदाहरणे पुढीलप्रमाणे : तुमच्या पाल्याचा अभ्यास फारच कच्चा आहे म्हणून तुम्हाला शाळेचे पत्र, कर्जाचे हप्ते वेळेवर भरले नाही म्हणून आलेले बँकेचे पत्र, एखाद्या पुस्तकाचे परीक्षण वाचल्यावर त्यासाठी मागणीपत्र तयार केलेले एखादा लेख, कथा, वाचल्यावर लेखकाला किंवा प्रकाशकाला पत्र लिहिणे, एखादे चरित्र वाचून स्वतःचे आत्मचरित्र लिहायला प्रवृत्त होणे.

(४) जे लिहायचे त्याबद्दल भरपूर वाचन करणे, अचूक उपयुक्त माहिती मिळविणे महत्त्वाचे असते.

(५) मनात विशिष्ट हेतू ठेवून केलेल्या लिखाणाला सहेतुक लिखाण म्हणतात. उदा. शैक्षणिक लेखन, सरकारी कचेऱ्यातील लेखन उद्योग व्यवसायातील लेखन, वृत्तपत्र लेखन, साहित्यिक लेखन, धार्मिक लेखन, निवेदने, सूचना, नियम, अभिनंदनपर पत्रे इत्यादी.

३.३ सारांश

लिहिताना किंवा वाचताना बऱ्याचदा आपल्याला विशिष्ट माहिती हवी असते. त्यालाच आपण संदर्भ म्हणतो. विविध विषयांसंबंधी अचूक, विश्वसनीय, नेमकी व थोडक्यात माहिती देणारे खास ग्रंथ असतात. त्यांना संदर्भग्रंथ म्हणतात. संदर्भग्रंथ पाठ्यपुस्तक किंवा कादंबरीसारखे सलग वाचण्यासाठी नसतात. तुम्हाला जी माहिती हवी असेल. जो संदर्भ शोधायचा असेल तेवढ्यापुरते वाचन आवश्यक असते. ग्रंथालयात 'संदर्भग्रंथ' असा स्वतंत्र विभाग असतो आणि संदर्भग्रंथ ग्रंथालयातच बघायचे असतात. ते बाहेर नेता येत नाहीत. त्यांची रचना विशिष्ट प्रकारची असते आणि त्यांचे ज्ञानमूल्य प्रचंड असते. काही संदर्भग्रंथ दुर्मीळ असतात. तुम्ही संदर्भग्रंथ कसे पाहावे? हे शिकायला हवे आणि वेळोवेळी आवश्यकतेनुसार संदर्भशोधही करायला हवे. संदर्भग्रंथ म्हणजे ज्ञानाचे अफाट भांडार असते किंवा माहितीचा महासागर असतो. उदा. 'मराठी विश्वकोशाचे' हल्ली बरेचसे संदर्भग्रंथ ऑनलाईन असल्याने तुम्हाला त्याचा फायदा घेता येईल. 'गुगल', तर माहिती आणि ज्ञानाचे महान विश्व आहे. ज्याची माहिती मिळू शकणार नाही असे गुगलवर काही असणे कठीण आहे. वाचन प्रक्रियेतून विमर्षण प्रक्रिया निर्माण होणे अपरिहार्य आहे. संदर्भग्रंथ माहिती (information) आणि सत्यता (facts) यावर भर असल्याने त्यातून निर्माण होणाऱ्या विमर्षणात भाव-भावनांचा भाग कमी असतो आणि विमर्शण त्यासंबंधीत मर्यादित असते. विमर्षण म्हणजे एखाद्या गोष्टीचा खोलवर, सर्वांगीण, दूरवरचा सर्वस्पर्शी विचार करणे. म्हणजेच वाचन हे उद्दिपकाचे (stimulus) काम करते तर त्या कारणाने लिहिला जाणारा मजकूर त्या उद्दीपकाची प्रतिक्रिया किंवा प्रतिसाद असतो. हा प्रतिसाद सकारात्मक किंवा नकारात्मक, दीर्घकालीन किंवा अल्पकालीन असतो. संदर्भमजकूराचे वाचन, त्यातील माहितीनुसार डोळ्यासमोर उभे राहणारे चित्र, स्वतःच्या विचाराने, कल्पना शक्तीने त्याचा झालेला विस्तार, त्यानिमित्त आपण घेतलेला आपल्या परिसराचा (environment, Surrounding, set up) आढावा, स्वतःच्या अनुभवांचा पडताळा हे विमर्शण प्रक्रियेचे घटक आहेत. विमर्शणामुळे वाचन डोळसपणे होते, संशोधकवृत्ती तयार होते, आकलन शक्ती वाढते, जीवनाबद्दलची आपली समज वाढते आणि आपले व्यक्तिमत्त्व समृद्ध होते. मजकूराचा आशय, मांडणी, भाषिक काठीण्य, वाचकाची पार्श्वभूमी, मानसिक व वैचारिक जडण-घडण जीवनाकडे बघण्याची दृष्टी यावर विमर्शणाची गुणवत्ता (quality) अवलंबून असते. नकारात्मक बेजबाबदार (irresponsible) आणि दिशाहीन (aimless) विमर्शण फारसे उपयोगाचे नसते. जे जे छापील, लिखित अथवा इलेक्ट्रॉनिक माध्यमात वाचनासाठी उपलब्ध असते त्याला वाचनसाहित्य म्हणता येईल. उदा. पुस्तके, मासिके, अर्ज, सूचनापत्रके, जाहिराती, निवेदने, कादंबऱ्या, फेसबुक, वॉट्सॲपवर येणारे सर्वकाही वाचन साहित्य जे आपण वाचतो किंवा वाचू शकतो तो सर्व वाचन मजकूर. म्हणजेच वाचन साहित्य वाचन मजकूराचे तयार झालेले असते आणि वाचनमजकूर वाचनसाहित्याचा अविभाज्य भाग असतो. विषयानुरूप वाचन मजकूराची मांडणी असते आणि ही मांडणी कशी असावी यात काही संकेत किंवा परंपरा (conventions) असतात. उदा. पत्र कसे लिहावे? निवेदन कसे तयार करावे? बैठकीचा वृत्तांत कसा लिहावा? कथा, कवितेची रचना कशी असावी? इत्यादी. मजकूराचे स्वरूप व मांडणी त्याच्या आशयावर अवलंबून असते हे तुम्ही लक्षात ठेवले पाहिजे. वर्णनात्मक मजकूरात व्यक्ती,

विषय, अनुभव, घटना यांचे वर्णन असते आणि त्यात व्यक्ती, विषय, अनुभव, घटना यांचे वर्णन असते. आणि त्यात व्यक्तिनिष्ठ (subjective) मांडणी असू शकते. स्पष्टीकरणात्मक मजकूरात कठीण विषय, संकल्पना सोप्या करून सांगण्याचा किंवा एखादा मुद्दा समजावून सांगण्याचा प्रयत्न असतो. यात तर्कसंगतीला महत्त्व असते. सोपे करून सांगणे, आकडेवारी देणे, पुन्हा पुन्हा सांगणे (पुनरावृत्ती) एकच गोष्ट दुसऱ्या शब्दात सांगणे, दोन समान गोष्टींची तुलना करणे, संबंधित मजकूराबद्दल स्वतःला प्रश्न विचारणे, आकृती, चित्रे, आलेख, नकाशा देऊन स्पष्टीकरण करणे ही स्पष्टीकरणात्मक मजकूराची वैशिष्ट्ये म्हणता येईल. स्पष्टीकरणात्मक मजकूरात भाव-भावनांचा भाग कमी असतो. कारण मांडणी वस्तुनिष्ठ (objective) असते.

दृष्य मजकूराची रचना शब्द, शब्दसमूह, वाक्ये, परिच्छेद इत्यादीनी झालेली असते. या मांडणीतून वाचकाला त्यातील आशयाबद्दल समजते. दृष्यमजकूराच्या पलीकडे दृष्यमजकूराच्या मांडणीला कारणीभूत होणारी जी एक अदृष्य रचना (structure) किंवा संरचना (system) असते. तिला स्किमा म्हणतात. वास्तूची ब्लूप्रिंट पाहिल्यावर आपल्याला वास्तूचे अनेक बारकावे चांगले समजतात. त्याचप्रमाणे मजकूरामागचा स्किमा लक्षात घेतला तर मजकूराबद्दलची आपली समज वाढते. मजकूराचे सर्व पैलू लक्षात येतात. मजकूराची अशी मांडणी का? त्यामांडणीची पूर्व अट कोणती? लिहिण्याचा हेतू काय? मांडणीचे विशिष्ट मागणी काय? या सर्व गोष्टी समजू शकतात.

मजकूराच्या दृष्य मांडणीची एक विशिष्ट रचना असते. ही रचना त्या मजकूर प्रकाराच्या मांडणी संकेतावर आधारित असते. मजकूराप्रमाणे त्यातील आशयालाही रचना असते. मजकूराची मांडणी व त्यातील आशय हे एकमेकात पूर्ण मिसळून गेलेले असतात. मजकूर मांडणी आशय उलगडत जाते आणि आशयानुरूप मांडणी आकार घेते. विचार, दृष्टिकोन, माहिती, भावना, लेखनाचा, लेखकाचा हेतू, लेखनातून परावर्तीत होणारे सर्व काही म्हणजे आशय.

वाचनाने आकलनशक्ती वाढीस लागते. आकलन सर्वांगीण (comprehensive) व्हायचे असेल तर वाचनाची तंत्रे आत्मसात करायला हवी. स्किमिंग (वरवरचे वाचन), स्कॅनिंग (खोलवरचे वाचन), द्रुत वाचन, स्तंभ वाचन, कळीचे वाचन ही कौशल्य शिकायला हवीत.

'वाचन' याचा अर्थ जास्तीतजास्त गतीने व जास्तीतजास्त आकलन करीत वाचन मजकूर वाचून संपविणे. वाचन = वेग + समज त्यासाठी आपले दृष्टीक्षेत्रही वाढवायला हवे.

वाचन व लेखन एकमेकांना पूरक आहेत. वाचनामुळे आपली लेखन करण्याची इच्छा जागरूक होते. वाचन आपल्याला निश्चितच लेखन प्रवृत्त करु शकते. त्याचप्रमाणे शिस्तबद्ध लिखाणाचे नियोजन केले तर त्यासाठी वाचनही करावे लागते. एखाद्या विषयासंबंधी कुणी काय लिहिले हे समजून घेतल्याशिवाय आपण त्यावर लेखन करू शकत नाही. म्हणजेच आवश्यक ते वाचन ही लिखाणाची पूर्वअट असते. असे म्हणता येईल. प्रक्रिया (process) म्हणजे विशिष्ट हेतूने केलेल्या गोष्टींची मालिका. वाचनाने मनात विचारप्रक्रिया सुरू होते. या प्रक्रियेतून लिहिण्याची प्रवृत्ती होते. हे प्रक्रिया लेखन म्हणजे वाचनाने निर्माण झालेल्या विचारप्रक्रियेतून होणारे लेखन. प्रक्रिया लेखनाचे स्वरूपात पहिली पायरी म्हणजे मिळालेली, वाचलेली माहिती, अनुभव इत्यादी समजावून घेणे, त्याची छाननी किंवा विश्लेषण करणे, ती खरी आहे याची खात्री करणे, स्वतःच्या अनुभवाशी पडताळून पाहणे, त्यातून त्यासंबंधी प्रतिसाद तयार करणे आणि तो सकारात्मक किंवा नकारात्मक प्रतिसाद शब्दबद्ध करणे.

लिखाणामागे काहीतरी हेतू असतोच. उदा. मुलांसाठी गोष्ट लिहिली तरी त्यातून काही सांगायचे असते. विनोदी प्रसंग सांगितला तर हसवायचे असते हा हेतू दोन गोष्टींवर अवलंबून असतो एक म्हणजे मजकूर मांडणीतील अपरिहार्यता आणि दुसरा लेखनकर्त्याचा स्वतःचा हेतू. हेतूविरहित कुठलेही लिखाण सहसा नसते. कथा, आत्मनिवेदन, अर्ज, जाहिरात, पत्रव्यवहार, नोटीस, मेमो, माहितीपत्र, कादंबरी इ. या प्रत्येकाला हेतू असतो. काहीतरी कारण असते.

३.४ पारिभाषिक शब्द, शब्दार्थ

संदर्भग्रंथ	:	एखाद्या विषयासंबंधी किंवा एकाच वेळी अनेक विषयांसंबंधी विशिष्ट माहिती थोडक्यात, नेमकी, अचूक व खात्रीशीर दिलेली असते त्याला संदर्भग्रंथ म्हणतात. संदर्भग्रंथ इतर पुस्तकाप्रमाणे संपूर्ण किंवा पान न पान वाचावयाचा नसतो. आपल्याला हवा तो संदर्भ हवा तेव्हा शोधून घ्यायचा. संदर्भग्रंथ ग्रंथालयाबाहेर नेता येत नाही. आता ऑनलाईन देखील उपलब्ध असतो. उदा. मराठी विश्वकोश
विमर्शण	:	एखाद्या गोष्टीचा खोलवर, सांगोपांग व सर्वस्पर्शी विचार करणे. वाचनाने विमर्शण प्रक्रिया सुरू होते.
उद्दीपक	:	(Stimulus) चेतक, प्रेरणा, कृती, उत्साह निर्माण करणारी गोष्ट
प्रतिसाद	:	(response, reaction) प्रतिक्रिया, एखाद्या गोष्टीला दिलेले उत्तर
वाचनसाहित्य	:	(reading material) वाचन मजकूर असलेले सर्वकाही वृत्तपत्र, मासिके, कथा, कादंबऱ्या, धार्मिकग्रंथ, पाककला, आरोग्य, आनंदी जीवन, तत्त्वज्ञान, जाहिराती इत्यादी
वाचन मजकूर	:	(reading matter) आपण जे काही वाचतो किंवा वाचू शकतो ते सर्व.
वर्णनात्मक मजकूर	:	एखाद्या गोष्टीचे शब्दांनी रेखाटलेले चित्र असा मजकूर व्यक्तिनिष्ठ (subjective) असतो.
स्पष्टीकरणात्मक मजकूर	:	ज्यात एखादी गोष्ट स्पष्ट केलेली असते असा मजकूर, हा मजकूर वस्तुनिष्ठ (objective) असतो.
संक्रमणात्मक मजकूर	:	तात्कालिक विषय, व्यक्ती किंवा घटना याबद्दलचा अल्पकाळ टिकणारा मजकूर
चिंतनात्मक मजकूर	:	एखाद्या विषयाबद्दल, गोष्टीबद्दलचा विचार करायला लावणारा व दीर्घकाल टिकणारा मजकूर.
स्किमा (Schema)	:	दृष्य मजकूर साकार होण्यासाठी कारणीभूत ठरणारी त्यामागची अदृष्य व्यवस्था (system) किंवा संरचना (structure)
आशय (content)	:	वाचन मजकूराचा विषय.
आशय रचना	:	(content structure) वाचन मजकूरातील विचार, विषयाची मांडणी
वाचन मजकूर रचना	:	मजकूराची मांडणी, सादरीकरण विशिष्ट वाचन मजकूराची मांडणी कशी असावी याच्या काही परंपरा (conventions) असू शकतात. उदाहरण कादंबरी, पत्र, नोटीस, निवदेन, पोथी इत्यादी.
स्किमिंग	:	एखाद्या मजकूराचा गोषवारा समजून घेण्यासाठी केलेले वरवरचे वाचन.
स्कॅनिंग	:	विशिष्ट माहिती शोधण्यासाठी बारकाईने किंवा खोलवर केलेले वाचन.

द्रुतवाचन	:	जलद गतीने केलेले वाचन.
स्तंभवाचन	:	आडव्या मजकूराचे उभ्या स्तंभाच्या स्वरूपात केलेले वाचन.
दृष्टीक्षेत्र	:	एका दृष्टीक्षेपात किती शब्द आपण पाहू शकतो तेवढे क्षेत्र.
कळीचे मुद्दे वाचन	:	विषयानुरूप महत्त्वाचे किंवा वाचकाला महत्त्वाच्या वाटणाऱ्या मुद्यांचे वाचन.
वाचन व लेखनातील संबंध जोडणी	:	वाचन केल्याने लेखन करण्याला प्रवृत्त होणे व लेखन करण्यासाठी आवश्यक ते वाचन करणे.
प्रक्रिया लेखन	:	वाचन करताना किंवा केल्यावर होणाऱ्या प्रक्रियेतून निर्माण होणारे लेखन.
सहेतुक लेखन	:	ज्या लेखनात लेखनकर्त्याचा काहीतरी हेतू आहे असे लेखन. कुठल्याही लेखनाचा, किंवा लेखनात हेतू असतोच. उदाहरण विनोदी किस्सा– हसवण्याचा हेतू.

३.५ क्षेत्रीय कार्य

(१) ग्रंथालयाला भेट द्या. शक्य असेल तर आपल्या य.च.म.मुक्त विद्यापीठाच्या ग्रंथालयाला भेट द्या. तो एक वेगळा अनुभव असेल. त्यातील संदर्भग्रंथ विभागातील संदर्भग्रंथ पाहा. त्यांची यादी करा. संदर्भग्रंथाची रचना कशी असते हे संदर्भग्रंथ बसून समजावून घ्या. तुमच्या निरीक्षणांची नोंद करा.

(२) तुमच्या गावाजवळच्या ऐतिहासिक, धार्मिक, निसर्गसुंदर स्थळासंबंधी माहितीपत्रक तयार करण्याचे नियोजन करा. त्यासाठी कोणते संदर्भ शोधावे लागतील. ते कोठे मिळतील. पूरक माहिती काय मिळवावी लागेल त्यासाठी काय वाचन करावे लागेल याची टीप्पणी तयार करा.

(३) एखादी साधी– सोपी कविता, गाणे, गोष्ट, कथा वाचा. त्यातील मजकूराची मांडणी व आशयाची मांडणी याचा अभ्यास करा. स्किमा समजावून घ्या. त्याबद्दलची तुमची निरीक्षणे नोंदवा.

(४) जास्तीतजास्त आकलनासहित (with maximum comprehension) द्रुतवाचनाचे (speed reading) कौशल्य आत्मसात करा. त्याबद्दलची सैद्धांतिक माहिती (theroretical knowledge) समजावून घ्या, त्याबरोबर कृती (practical) देखील करा. एका महिन्यात तुमच्या वाचनाच्या गतीत आणि आकलनात काय फरक पडतो याचे निरीक्षण करा.

(५) वाचनासाठी वेळ काढा. जे वाचाल त्याला प्रतिसाद म्हणून छोट्या नोंदी करा. त्यातून अधिक लेखनाची तुम्हाला इच्छा होऊ शकते.

(६) अध्यापन पद्धतीवर (teaching methodology) प्रचंड लेखन झालेले आहे. त्यातील निवडक वाचन करून तुमच्या स्वतःच्या अध्यापन पद्धतीवर लेखन करा.

(७) वर्षभरात किमान पाच पुस्तके वाचायची असा निश्चय करा. प्रत्येक पुस्तकाचा विषय, हेतू, मांडणी, रचना याबद्दलचा अभ्यास करा व त्यांच्या नोंदी करून ठेवा.

(८) अर्ज, औपचारिक पत्र, माहितीपत्र, निवेदन, मेमो, नोटीस, सूचनापत्र कार्यक्रम पत्रिका, इत्यादीच्या रचनेबद्दल काय संकेत असतात ते लिहून काढा.

३.६ अधिक वाचनासाठी पुस्तके

(१) जगताप, ह. ना. (२०१०), *'शिक्षणातील नवप्रवाह आणि नवप्रवर्तने'*. पुणे. नित्यनूतन प्रकाशन.

(२) सप्रे, निलिमा. आणि पाटील, प्रिती, *'शिक्षणातील विचार प्रवाह'* कोल्हापूर. फडके प्रकाशन.

(३) तापकीर, दत्तात्रय. आणि लोंढे, गौतम. (२००९), *'विद्यमान शिक्षणातील नवविचार प्रवाह'*. संघमित्रा प्रकाशन; मिरज.

(४) गोडबोले, अच्युत्त. (२०१४). *'मनात'*. पुणे; मनोविकास प्रकाशन.

(५) तुपे, टी. एन., (२०१०). *'शिक्षण संक्रमण'*, पुणे; माध्यमिक राज्य माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ.

(६) झांबरे, स. ध., (२००१). *'आपला राष्ट्रध्वज व आपली राष्ट्रमुद्रा'*. औरंगाबाद; साकेत प्रकाशन.

(७) पानसे र. (२०१०). *'रचनावादी शिक्षण'*. सातारा; रा. प्रकाशन.

(८) जगताप, ह.ना., (२०१६). *'अध्ययन आणि अध्यापन'*. पुणे; सुविचार प्रकाशन.

(९) बाम, रा. कोलटकर. (२०१८). *'मैत्री ज्ञानरचनावादानी'*. पुणे; निराळी प्रकाशन.